CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, २१ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९१ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघकार्य रचनात्मक आहे, राष्ट्रभक्तीने ओतप्रोत आहे, चारित्र्यसंपन्न, स्वाभिमानी हिंदू समाज निर्माणाचे आहे आणि ते वाढल्यानेच वेदांची प्रतिष्ठा, वेदांत ग्रंथांमध्ये चर्चिल्या गेलेल्या जीवनाची महानता तथा भारतीय संस्कृतीच्या पावित्र्याचे रक्षण केले जाऊ शकते.

**बच्छराज व्यास**
भारतीय जनसंघाचे पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष

## शालिनीताई पाटील यांचे निधन



**मुंबई** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी तथा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. त्यांनी मुंबईतील माहिम येथील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धाडसी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. शालिनीताई पाटील गत काही महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर माहिम येथील त्यांच्या राहत्या घरीच उपचार सुरू होते. शनिवारी दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# मंगळवेढ्यात ६९.७७ % मतदान

## नगरपरिषद व नगर पंचायत निवडणूक ● आज मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

**सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा नगरपरिषदेसाठी ६९.७७ टक्के, पंढरपूर नगरपरिषदेसाठी ६०.८१ टक्के, मोहोळ नगरपरिषदेसाठी ६६.९९ टक्के मतदान झाले. दरम्यान अनगर (ता.मोहोळ) नगरपरिषदेची निवडणूक बिनविरोध झाली.**

### २८८ परिषदा-पंचायतींचा आज निकाल
### दहा वाजतापासून सुरू होणार मतमोजणी

**मुंबई** : न्यायालयात अपील दाखल झाल्याने पुढे ढकलण्यात आलेल्या राज्यातील २४ परिषदा आणि पंचायतींमध्ये शनिवारी शांततेत मतदान पार पडले. २ डिसेंबरला २६४ जागांसाठी मतदान झाले. उद्या सकाळी दहा वाजतापासूनच मतमोजणीला सुरूवात होणार असून २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे निकाल जाहीर होणार आहेत. राज्यात सरासरी ६६ ते ६७ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे.

नागपूर जिल्ह्यातील कामठी, रामटेक व नरखेड या तीन नगरपालिकांमधील नगरसेवकांच्या सात जागांसाठी ६०.९१ टक्के मतदान झाले. तर, कोंढाळी नगरपंचायततील दोन प्रभागांत दोन जागांसाठी ६९ टक्के मतदान झाले.

अकोला : बाळापूर, वाशीम व रिसोड आणि शेगाव तसेच खामगाव, देउळगावराजा व जळगाव जामोद येथे न.प.निवडणुकीसाठी मतदान झाले. २५ नगरसेवक आणि अध्यक्षपदासाठी बाळापूर येथे मतदान झाले.

**वाशीम जिल्ह्यात ६५, रिसोड ७० टक्के**

वाशीम नगरपरिषदेसाठी ८१ मतदान केंद्रांवर काही ठिकाणी किरकोळ वाद वगळता मतदान शांततेत पार पडले. सरासरी ६५ टक्के मतदान झाले. ८ अध्यक्ष व ३२ नगरसेवक पदासाठी निवडणूक पार पडली असून, मंगरुळनाथ, कारंजा, मालेगाव नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांसाठी सरासरी ६५ टक्के मतदान झाले. रिसोड नगरपरिषदेसाठी ७० टक्के मतदान झाले. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगरपरिषदेच्या दोन जागांसाठी मतदान झाले. ६९.६६ टक्के मतदान झाल्याची माहिती आहे. शिवाय, जळगाव जामोद न.प.निवडणुकीत ६५.५३ टक्के मतदान झाल्याची माहिती आहे.

**चार जागांसाठी ४७.३४ टक्के मतदान**

**गोंदिया** : जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा नगरपरिषदेच्या एकूण चार जागांसाठी मतदान झाले.

**चार न.प. प्रभागासाठी ४२.४२ टक्के मतदान**

**यवतमाळ** : आक्षेपांमुळे लांबणीवर पडलेल्या यवतमाळ नगरपरिषदेत नगराध्यक्षांसह ५८ नगरसेवकांसाठी तसेच पांढरकवडा, दिग्रस व वणी येथील नगरसेवकांच्या ६ जागांसाठी मतदान पार पडले. यवतमाळ शहरात अनेक ठिकाणी गोंधळ उडाला होता. ध्रुव प्राथमिक शाळेत मशिनमध्ये तांत्रिक अडचण आल्याने काही काळ मतदान प्रक्रिया खोळंबली होती. तर राज इंग्लिश शाळेत निवडणूक प्रतिनिधी ज्योती राऊत यांच्या नावानेच बोगस मतदान झाल्याचे उघडकीस आले. वार्ड क्र. १५ मध्ये दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. यात एकाच्या डोळ्याला इजा झाली असून, दोन जण गंभीर जखमी झाले.

**वर्धेत २८ जागांसाठी मतदान**

**वर्धा** : वर्धा, पुलगाव, हिंगणघाट येथील काही प्रभाग तर देवळी येथील संपूर्ण निवडणूक रद्द करण्यात आली होती. आज या नगरपालिकांतील एक नगराध्यक्ष आणि २७ नगरसेवकांसाठी मतदान पार पडले. देवळीत मतदार याद्यांमध्ये घोळ कायम असल्याने मतदान प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. सायंकाळपर्यंत वर्धा येथे ५६.५ टक्के, हिंगणघाट ५९.८७, पुलगाव येथे ५७.६६ तर देवळी येथे ६२ असे सरासरी ५९ टक्के मतदान झाले

**अमरावती जिल्ह्यात ७० टक्के मतदान**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्ष व २८ सदस्यांसाठी मतदान झाले. सायंकाळपर्यंत ७० टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. याशिवाय दर्यापूर नगरपरिषदेतील जागा क्रमांक २ अ, अचलपूर नगरपरिषदेच्या जागा क्र. १० अ, जागा क्र. १९ ब, वरुड नगरपरिषदेच्या जागा क्र. १२ अ, धारणी नगरपंचायतच्या प्रभाग क्र. १४, प्रभाग क्र. १६ अशा आठ ठिकाणी मतदान झाले.

**चंद्रपुरात ५२ टक्के**

घुग्घुस वगळता जिल्ह्यातील उर्वरित ९ नगरपालिका व एका नगरपंचायतसाठी २ डिसेंबरला मतदान पार पडले होते. घुग्घुस नगरपालिकेसाठी शनिवारी ५२ टक्के मतदान झाले. घुग्घुससोबतच बल्लारपूर, मूल, वरोडा व गडचांदूर नगरपालिकांमधील प्रत्येकी एका प्रभागाची निवडणूकही शनिवारी पार पडली. (सविस्तर वृत्त पान ८ वर)




मतदानासाठी रात्री उशिरापर्यंत लागलेली रांग

# मुंबईत काँग्रेसचा 'उबाठा'ला दणका

## महापालिका स्वबळावर लढविण्याची घोषणा ● महाविकास आघाडीत फाटाफूट





◆ **मुंबई, २० डिसेंबर**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक महाविकास आघाडीत राहून लढणाऱ्या काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई महानगर पालिकेत मागील काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून, आम्ही त्याविरोधात 'उबाठा'च्या विरुध्द निवडणूक लढणार असल्याची घोषणा काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे. काँग्रेसने घेतलेली ही भूमिका उध्दव ठाकरेंना हा मोठा धक्का मानला जात आहे.

महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची काँग्रेसची अधिकृत घोषणा महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत केली. यावेळी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड उपस्थित होत्या.




महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या 'उबाठा' विरोधात लढू, अशी घोषणा आघाडीतीलच प्रमुख घटक पक्षाकडून झाल्याने महाविकास आघाडीत फूट पडल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीने राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाविरोधात मोर्चा उघडला. दुबार मतदार आणि व्होटचोरीचा मुद्दा घेऊन काँग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष तसेच त्यांच्यासोबत राज ठाकरे यांच्या मनसेनेही या विरोधात आवाज उठवला. तेव्हापासून महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीत मनसे हा नवा साथीदार सहभागी होणार, अशी चर्चा होती. मात्र, शनिवारी काँग्रेसने मुंबई महापालिकेत स्वबळाचा नारा दिला आणि देशभक्त, धर्मनिरपेक्ष लोकांनी आमच्या सोबत यावे, असे आवाहनदेखील यावेळी करण्यात आले. *(तभा वृत्तसेवा)*

### मनसेवर अप्रत्यक्ष टीका



मुंबईच्या विकासावर बोलणारी मंडळी आम्ही आहोत. मुंबईत सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा आमचा विचार आहे. भारतीय संविधानावर आमचा विश्वास आहे, मुंबईवर सर्वांनी एकत्र येऊन बोलण्याची गरज आहे. मात्र, काही पक्षांकडून सातत्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जातो. मारहाण केली जाते आणि जी भाषा वापरली जाते, ती आमच्या संस्कृतीला जुळणारी भाषा नाही. त्यामुळे आम्ही स्वतंत्र निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे खा. वर्षा गायकवाड यांनी यावेळी सांगितले. गायकवाड यांचे हे वक्तव्य म्हणजे नाव न घेता मनसेवर केलेली टीका होय.

## गुरसाळेजवळ अपघातात बाप, लेकाचा मृत्यू

- मोटारसायकलला टिपरची धडक
- अवैध वाळू वाहतुकीचा ठरला दुर्दैवी बळी

**पंढरपूर, दि.२० डिसेंबर-**

पंढरपूर-अहमदनगर रोडवरील गुरसाळे या गावाजवळ बिगर नंबरच्या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिपरने समोरुन जोरदार धडक दिल्याने बाप आणि लेक यांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा दुर्दैवी अपघात शनिवार (दि.२०डिसेंबर) रोजी दुपारी २ वाजता झाला.

या अपघाताची सविस्तर माहिती अशी की, माढा तालुक्यातील उजनी गावातील रघुनाथ उत्तम लोकरे (वय-४२, रा.उजनी, ता.माढा) आणि त्यांचा मुलगा नरसिंग रघुनाथ लोकरे (वय-१३) हे आपल्या एम.एच.४५, ए.एच. ०२५४ या क्रमांकाच्या मोटारसायकलवरुन गावाकडे जात होते. साखर कारखान्याकडून भरघाव वेगाने येणाऱ्या टिपरने त्यांना धडक देऊन चिरडले.

या अपघातात बाप-लेकराचा जागीच मृत्यू झाला. अपघात झाल्यावर शाळेत शिकणाऱ्या नरसिंग लोकरे याची पुस्तके रस्त्यावर पडली होती. अपघाताचे हे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. दरम्यान, अपघातानंतर टिपर चालक गाडी सोडून पळून गेला आहे. पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तैय्यब मुजावर अधिक तपास करीत आहेत.

## मानवी अवयव तस्करी प्रकरणी एसआयटी

**चंद्रपूर, २० डिसेंबर**

अवैध सावकारी कर्जातून नागभीड तालुक्यातील रोशन कुळे या शेतकऱ्याला आठ लाखांत किडनी विकावी लागली. हे प्रकरण उघडकीस येताच, त्याचे अन्य कांगोरेही पुढे येऊ लागले. किडनी विक्री प्रकरणी आंतरराष्ट्रीय संबंधाचे धागेदोरे गवसले असले, तरी सारी सूत्रे जोवर जुळत नाही, तोवर कुठल्याच निष्कर्षावर पोहोचता येत नाही. कुणाच्या खात्यातून कुणाच्या खात्यात किती पैसे आले, यावरून प्रकरणाची सत्यता तपासणे सुरू आहे. विशेष तपास पथक (एसआयटी) गठित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्क्क सुदर्शन यांनी दिली.

या एसआयटीत अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या नेतृत्वात ब्रह्मपुरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी सत्यजीत आमले, पोलिस निरीक्षक अमोल कचोरे व दोन पोलिस अधिकारी, सायबर पोलिस निरीक्षक सुनील गाडे, ब्रह्मपुरीचे पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले आदींचा समावेश आहे. कोलकाता येथील डॉ. कृष्णाच्या माध्यमातून कंबोडिया येथे जाऊन किडनी विकल्याचे रोशन कुळे सांगत आहे. शिवाय तेथे त्याने एका कॉल सेंटरमध्ये कामही केल्याचे तो सांगतो. मात्र, या साऱ्या गोष्टींचा तपास आणि त्याची सुसूत्रता स्पष्ट होत नाही, तोवर भाष्य करता येत नाही, असे मुमक्का यांनी सांगितले. याबाबत तपास सुरू असून, वैद्यकीय कागदपत्रे आणि संपर्क साखळीची पडताळणी केली जात आहे.






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत


https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### प्राध्यापक जी. डी. यादव यांचा सन्मान

**नागपूर :** 'लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी' च्या गव्हर्निंग बोर्डचे अध्यक्ष, पद्मश्री प्राध्यापक जी. डी. यादव यांना या आठवड्यात तीन प्रतिष्ठित सन्मान प्राप्त झाले आहेत. प्राध्यापक यादव हे माजी कुलगुरू आहेत. भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने त्यांची हायड्रोकार्बन विषयक वैज्ञानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच गुजरात सरकारने त्यांची गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठाच्या गव्हर्निंग बोर्डचे सदस्य म्हणून नामनिर्देशन केले आहे. याशिवाय, जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगळुरू या प्रतिष्ठित संस्थेने त्यांना मानद प्राध्यापकपद प्रदान केले आहे. हे सन्मान विज्ञान, तंत्रज्ञान, उच्च शिक्षण आणि राष्ट्रीय धोरणनिर्मितीतील प्राध्यापक यादव यांच्या उल्लेखनीय योगदानाचे प्रतीक आहेत.



### बनावट औषधे बनवणाऱ्या रॅकेटच्या सूत्रधाला अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी बनावट औषध निर्मिती करणाऱ्या रॅकेटच्या कथित सूत्रधार प्रमोद कुमार गुप्ता याला अटक केली. आरोपीला हजरत निजामुद्दीन परिसरातून अटक करण्यात आली. काही दिवसांपूर्वी पोलिसांनी बनावट औषधे बनवणाऱ्या कारखान्याचा छडा लावला होता. यापूर्वी दोन जणांना अटक करण्यात आली होती, असे पोलिस उपायुक्त आदित्य गौतम यांनी पत्रपरिषदेत सांगितले. सतत केलेल्या पाठपुराव्यादरम्यान, पोलिसांनी पुरवठा साखळीचा शोध घेत दुसऱ्या उत्पादन युनिटपर्यंत पोहोचले. तिथे बेटनोव्हेट हे औषध बेकायदेशीरपणे तयार करून उत्तर भारतात पुरवले जात होते. गुप्ता हा कारखाना चालवत होता आणि या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार होता, असे पोलिसांनी सांगितले. परिसरातून मोठ्या प्रमाणात कच्चा माल जप्त करण्यात आला. तो ५० हजारांपेक्षा जास्त बनावट बेटनोव्हेटच्या युनिट्सच्या निर्मितीसाठी पुरेसा होता. बनावट औषधांव्यतिरिक्त, पोलिसांनी मोठ्या संख्येने बनावट सौंदर्यप्रसाधने देखील जप्त केली. छाप्यांदरम्यान बनावट फेअर अँड लव्हली क्रीमच्या सुमारे ७०० ट्यूब आणि बनावट वीट हेअर रिमूव्हल क्रीमच्या अंदाजे ८०० ट्यूब जप्त करण्यात आल्या.

### भारतीय परिचारिकेला लागला २.४ कोटींचा जॅकपॉट

**नवी दिल्ली :** केरळमधील एका परिचारिकेला यूएईमध्ये लॉटरी लागून तिने मोठी रक्कम जिंकली आहे. अजमानमध्ये वास्तव्यास असलेली परिचारिका टिंटू जेसमोन हिने बिग तिकीट ड्रॉ सीरिज २८१ मध्ये एक लाख यूएई दिरहम म्हणजेच सुमारे २.४ कोटी रुपयांचा जॅकपॉट पटकावला आहे. टिंटू जेसमोन मागील पंधरा वर्षांपासून यूएईमध्ये कार्यरत आहे. ३० नोव्हेंबर रोजी तिने दहा जणांच्या गटासह एकत्रितपणे विजेते तिकीट खरेदी केले होते. बिग तिकीटमध्ये सामूहिक तिकीट खरेदी करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून, यामुळे सहभागींना तिकिटाची किंमत तसेच जिंकलेली रक्कम एकमेकांत वाटून घेता येते. आपण लॉटरी जिंकल्याचे समजताच जेसमोनच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मागील पाच वर्षांपासून ती सातत्याने बिग तिकीटमध्ये सहभागी होत होती.




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३२,२०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,०३,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.७ | १२.३ |
| अमरावती | २९.८ | १०.५ |
| भंडारा | ३०.० | -.- |
| बुलडाणा | ३०.० | ११.५ |
| चंद्रपूर | २९.६ | ११.६ |
| गडचिरोली | २८.६ | १०.० |
| गोंदिया | २६.५ | ८.२ |
| नागपूर | २८.६ | ८.६ |
| वर्धा | २८.६ | ९.६ |
| वाशीम | ३१.४ | ११.० |
| यवतमाळ | ३१.० | ९.० |

# कापूस पीक पाहणीच्या नावावर शेतकऱ्यांना हेलपाटे

## जमाबंदी आयुक्तांच्या सूचना ३० पट वेळखाऊ

## कवडीमोल भावाने विकावा लागू शकतो कापूस

◆ **यवतमाळ, २० डिसेंबर**

कापूस 'ई-पीक' पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची 'ऑफलाईन' पाहणी करण्यासाठी भूमी अभिलेखच्या जमाबंदी आयुक्तांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांमुळे खासकरून विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेलपाटे खावे लागत असून वेळकाढूपणा करणाऱ्याच आहेत, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे.

'ऑफलाईन' कापूस पीक पाहणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाने १४ डिसेंबर रोजी शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयाला अनुसरून त्याच दिवशी भूमी अभिलेख खात्याने 'ऑफलाईन' प्रक्रिया कशी पार पाडायची, याबाबत दिशानिर्देश दिले.

ई-पीक नोंदणीच्या तुलनेत ही प्रक्रिया कमीत कमी ३० पट अधिक वेळखाऊ ठरणार आहे. ई-पीक नोंदणी एका दिवसात होणाऱ्या प्रक्रियेसाठी या दिशानिर्देशांनी ३० दिवसांचे अधिकृत वेळापत्रकच दिले आहे. आपल्या प्रचलित सरकारी कार्यपद्धतीनुसार १७ डिसेंबर ते १५ जानेवारी या अधिकृत ३० दिवसांच्या कामाला ५० ते ६० दिवस सहज लागू शकतात.

कापूस पिकाच्या ऑफलाईन नोंदणीसाठी मंडळ अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेत ४ सदस्यांची समिती १७ डिसेंबरपासून कामाला लागावी, असे भूमी अभिलेख खात्याला अपेक्षित आहे. त्यासाठी २४ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करायचे आहेत. त्यानंतर २५ डिसेंबर ते ७ जानेवारी या समितीने संयुक्तपणे जाऊन प्रत्यक्ष स्थळपाहणी करायची आहे. या 'स्थळपाहणी'पूर्वी या समितीने संबंधित आणि आजूबाजूच्या किमान ४-५ शेतकऱ्यांना 'लेखी' पूर्वकल्पना द्यायची आहे. ही स्थळपाहणी करताना शेतकऱ्याने २०-२५ च्या खरीप हंगामात प्रत्यक्ष लागवड केलेले पीक, त्याची स्थानीय चौकशी, वस्तुस्थितीदर्शक पंचनामा, आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे जबाब, लागवडीसाठी खरेदी केलेले बियाणे, खतांच्या खरेदी पावत्या, गेल्या वर्षीच्या खरीप हंगामाची नोंद आणि ही सारी चौकशी झाल्यानंतर पिकांचे नाव आणि क्षेत्र यांचा पंचनामा अशी वेळकाढू आणि किचकट कार्यपद्धती दिली आहे.

त्यानंतरही हा स्थळपाहणी अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वातील समितीला १२ जानेवारीपर्यंत सादर करणे, त्यात खातेदार, खाते क्रमांक, गट, क्षेत्र, पिकांची नावे, त्यांचे प्रत्येकी क्षेत्र, इत्यादी सोपस्कार पार पाडायचे आहेतच. याला १५ जानेवारी ही मुदत दिली असली, तरी हे काम फेब्रुवारी अखेरपर्यंत सहज रेंगाळू शकते, असे पूर्वानुभव सांगतो आहे. (तभा वृत्तसेवा)



### हे तर शेतकऱ्यांना झटकेच

हे सारे सरकारी दिशानिर्देश म्हणजे आज प्रामुख्याने शेतकऱ्याजवळ विकण्यासाठी तयार असलेल्या कापसाला आणखी महिनाभर तरी पडूनच ठेवावे लागणार आहे. ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी शेतकऱ्याला काय काय झेलावे लागणार, कुठे कुठे खिसा मोकळा करावा लागणार, हे तर आहेच. एकूणच शेतकऱ्यांना आपल्या शेतातील कापूस कदाचित कवडीमोल भावात विकावा लागण्याची शक्यता अधिक आहे. संबंधित यंत्रणेने ही प्रक्रिया अधिक सुटसुटीत न केल्यास कापूस उत्पादकांना योग्य भाव न मिळण्यासाठी केलेले हे 'कारस्थान' आहे, असेच म्हणावे लागेल, अशी संतप्त प्रतिक्रिया कापूस उत्पादक शेतकरी राजन भागवत व राहुल माळवे यांनी दिली आहे.



बांगलादेशमधील अशांततेची परिस्थिती पाहता सीमेवरून घुसखोरी होऊ नये म्हणून अगरतळा राज्यातील बांगलादेश सीमेवर सीमा सुरक्षा दलाने गस्त वाढविली आहे

# बच्चू कडू यांच्या भेटीत रोशन कुळे गहिवरले!

## जानेवारीला मिंथुर ते नागभीड 'लाँगमार्च' काढणार

◆ **चंद्रपूर, २० डिसेंबर**

प्रहार संघटनेचे संस्थापक तथा माजी आमदार बच्चू कडू यांनी शनिवार, २० डिसेंबर रोजी शेतकरी रोशन कुळे यांची भेट घेतली. नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रहिवासी कुळे यांना सावकारी कर्जाची परतफेड करण्यासाठी स्वत:ची किडनी विकावी लागली होती. हे प्रकरण प्रकाश झोतात येताच, साऱ्याचे लक्ष आता मिंथुर गावाकडे लागले आहे. कुळे यांच्या भेटीला बच्चूकडे मिंथुर येथे आले होते. या भेटीप्रसंगी रोशन कुळे यांना अश्रू अनावर झाले.

रोशन यांनी बच्चू कडू यांना आपली आपबिती सांगितली. त्यावर कडू यांनी संताप व्यक्त केला. शेतकऱ्याला कर्जाची परतफेड करण्यासाठी किडनी विकावी लागत असेल, तर पुरोगामी महाराष्ट्र कोणत्या दिशेला चालला आहे, असे ते म्हणाले. हा गंभीर प्रकार असून, ही लढाई एकट्या रोशनची नसून आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी येत्या ३ जानेवारीला मिंथुरपासून नागभीडपर्यंत मोठा 'लाँगमार्च' अशी घोषणाही यावेळी बच्चू कडू यांनी केली.

कडू म्हणाले, कर्जाची परतफेड करण्यासाठी कुळे यांना किडनी विकावी लागली, हा प्रकार अतिशय गंभीर आहे. याची दखल राज्य शासनाने त्वरित घ्यावी. रोशन यांना धमक्यांचे फोन येत होते, त्यांचे अपहरण करण्यात आले आहे. त्यामुळे त्याला किडनी विकावी लागली. त्यासाठी अपहरणाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याचबरोबर फसवणुकीचा गुन्हाही दाखल झाला पाहिजे. तसेच जबर मारहाणीचा गुन्हा दाखल केला नसल्याने तो पण गुन्हा दाखल झाला पाहिजे.

रोशन यांनी कंबोडिया या देशात किडनी विकायला गेला याची 'एसआयटी' चौकशी झाली पाहिजे. राज्यामध्ये सावकरी प्रकरणाचे गुन्हे सर्रास सुरू आहे. त्याबरोबर मायक्रो फायनान्स या कंपन्यांवरसुद्धा बंधने आणली पाहिजे. ही लढाई नागभीडपुरती नाही किंवा एकट्या रोशन पुरती नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राची आणि देशव्यापी आहे. रोशन कुळे या शेतकऱ्याला त्याचे पैसे परत मिळाले पाहिजे. कारण त्याने आजच्या बाजार भावापेक्षा कमी भावाने शेती विकली आहे. ३ जानेवारीला रोशनच्या घरापासून ते नागभीडपर्यंत पायदळ मोर्चा काढला जाणार असून, मागण्या पूर्ण झाल्या नाही तर मोठे आंदोलन करणार असल्याचेही बच्चू कडू यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)



बच्चू कडू यांच्याशी चर्चा करताना रोशन कुळे

# अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व कालातीत : गडकरी

## अशोक टंडन यांच्या 'अटल संस्मरण' पुस्तकाचे प्रकाशन

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**


अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व कालही प्रासंगिक होते, आजही आहे, आणि उद्याही राहील, त्याचे नेतृत्व कालातीत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

ज्येष्ठ पत्रकार आणि पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे माध्यम सल्लागार म्हणून काम केलेल्या अशोक टंडन यांच्या प्रभात प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'अटल संस्मरण' या पुस्तकाचे प्रकाशन करतांना गडकरी बोलत होते. इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात इंडिया टीव्हीचे अध्यक्ष रजत शर्मा आणि लेखक अशोक टंडन उपस्थित होते.

अटलजी एक संवेदनशील नेता होते, लोकशाहीवर त्यांची नितांत श्रध्दा होती. लोकशाहीत परिपूर्ण राजकीय नेता कसा असावा, हे अनेक उदाहरणातून अटलजींनी दाखवून दिले, असे गौरवोद्‌गार गडकरी यांनी काढले. राजकीय पार्श्वभूमीवर अटलजींनी केलेले कार्य तसेच कर्तृत्व आणि नेतृत्वासोबत त्यांचे व्यक्तिगत जीवनही आदर्श होते, असे गडकरी म्हणाले.

अटलजींच्या नेतृत्वाने काम करण्याची प्रेरणा आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिला, याकडे लक्ष वेधत वेधत गडकरी म्हणाले की, मतभेद चालतील पण मनभेद नको, असे अटलजींनी म्हटले होते.

आजही राजकारणात मी अटलजींनी अनेक बाबतीत दिलेल्या सल्ल्यांचे तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न करतो. अटलजी अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी होते, त्यांचे संपूर्ण वर्णन एका पुस्तकातून करणे शक्य नाही, तरी पण अशोक टंडन यांनी तसा प्रयत्न यशस्वीपणे केला, ही आनंदाची बाब आहे, असे इंडिया टीव्हीचे अध्यक्ष रजत शर्मा आपल्या भाषणात म्हणाले. अटलजींसोबतच्या दोनतीन आठवणींचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. लेखक अशोक टंडन यांनी पुस्तकामागची भूमिका मांडली. प्रभात प्रकाशनचे प्रभात कुमार यांनी आभारप्रदर्शन केले. (तभा वृत्तसेवा)




### मल्याळम अभिनेते श्रीनिवासन् यांचे निधन

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

मल्याळम चित्रपटाचे ज्येष्ठ अभिनेते, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते श्रीनिवासन् यांचे शनिवारी वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. ते दीर्घ काळापासून आजारी होते आणि उदयमपेरूर येथील त्यांच्या घरी उपचार घेत होते. शनिवारी प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना त्रिप्पुनिथुरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी सकाळी डॉक्टरांनी त्यांच्या मृत्यूची पुष्टी केली. श्रीनिवासन् यांचा जन्म ६ एप्रिल १९५६ रोजी केरळमधील थालास्सेरी जवळील पट्टयम येथे झाला होता. त्यांनी चेन्नईच्या फिल्म अॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमधून चित्रपटाचे शिक्षण घेतले. (वृत्तसंस्था)

# इटानगर मनपावर भाजपाचा झेंडा

◆ **इटानगर, २० डिसेंबर**

सत्ताधारी भाजपाने शनिवारी निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर २० पैकी १४ जागा जिंकून इटानगर महानगरपालिके (आयएमसी)वर भगवा फडकवला.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव तारू टालो यांनी सांगितले की, पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचल (पीपीए) ने आठपैकी पाच जागी विजय मिळवून पासीघाट नगर परिषदेच्या (पीएमसी) निवडणुका जिंकल्या आहेत. विरोधी काँग्रेसला इटानगर आणि पासीघाट या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकही जागा जिंकता आली नाही. भाजपने एकूण २० पैकी १४ जागी विजय मिळवता. त्यापैकी चार जागी भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. तीन जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने, दोन ठिकाणी लोक जनशक्ती पक्षा (रामविलास)ने, तर अपक्ष उमेदवाराने एक जागा जिंकली. २० सदस्यीय इटानगर महानगरपालिकेत १० ठिकाणी महिला उमेदवारांनी बाजी मारली. आयएमसी आणि पीएमसी निवडणुकांमध्ये ईव्हीएमचा वापर करण्यात आला होता. पासीघाट नगर परिषद निवडणुकीत, पीपीएने आठपैकी पाच वॉर्डात विजय मिळवला. (वृत्तसंस्था)

# १० हजार वर्गांमध्ये लागणार 'एअर प्युरिफायर'

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

विद्यार्थ्यांना स्वच्छ हवा देण्यासाठी १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, अशी घोषणा दिल्लीचे शिक्षणमंत्री आशिष सूद यांनी शुक्रवारी केली. सरकार दीर्घकालीन प्रशासकीय उपाययोजनांद्वारे प्रदूषण समस्येवर मात करण्यासाठी वचनबद्ध आहे. प्रदूषण ही एक दिवसाची समस्या नाही. यासाठी दीर्घकालीन कृती आवश्यक आहे, असे पत्रपरिषदेत सूद म्हणाले.

दिल्लीच्या सरकारी शाळांमध्ये एकूण ३८ हजार वर्गखोल्या आहेत आणि पहिल्या टप्प्यात १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, असे दिल्लीचे मंत्री आशिष सूद म्हणाले. आम्ही आयआयटी पदवी दाखवून सम-विषम किंवा गाडी चालू, गाडी बंद अशा मोहिमा राबवणारे नाही. आम्ही दीर्घकालीन प्रशासकीय पद्धतींद्वारे प्रदूषण समस्येचा सामना करत आहोत, असे आम आदमी पक्षाच्या मागील सरकारवर टीका करताना ते म्हणाले. सरकारला मुलांनी केवळ हुशारीने अभ्यास करावा असे नाही तर स्वच्छ हवा श्वास घ्यावी असे वाटते. पहिल्या टप्प्यात १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, असे त्यांनी सांगितले.

तापमानात घट झाल्यामुळे राजधानीत प्रदूषणाची पातळी वाढत आहे. अनुकूल हवामान असूनही प्रदूषण अत्यंत वाईट श्रेणीत आहे. सकाळची सुरुवात धुक्याने होते. आकाशात धुराचे हलके आवरण देखील दिसते, यामुळे अनेक भागात दृश्यमानता कमी झाली आहे. (वृत्तसंस्था)

# अनिल अंबानींच्या मुलाची सलग दुसऱ्या दिवशी चौकशी

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

कथित बँक घोटाळ्यातील मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी उद्योजक अनिल अंबानी यांचा मुलगा जय अनमोल अंबानीची चौकशी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत शुक्रवारी प्रथमच त्याचे बयाण नोंदवून घेण्यात आले आणि हे सत्र शनिवारीही कायम होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घडामोडीबाबत विचारलेल्या प्रश्नांना रिलायन्स धीरूभाई अंबानी यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

ईडीचा हा तपास येस बँकेशी संबंधित आहे. या बँकेचे रिलायन्स धीरूभाई अंबानी समूहात ३१ मार्च २०१७ पर्यंत जवळपास सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. ते वर्षभरात वाढून दुप्पट म्हणजे जवळपास १३ हजार कोटी रुपये झाले. यामध्ये रिलायन्स होम फायनान्स लि. (आरएचएफएल) आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स लि. या कंपन्यांचा समावेश आहे.

या गुंतवणुकीचा मोठा भाग एनपीआय ठरला आणि या व्यवहारांमुळे बँकेला ३,३०० कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा दावा ईडीने केला आहे. रिलायन्स समूहातील कंपन्यांच्या विरोधातील बँक घोटाळा प्रकरणात यापूर्वी अनिल अंबानी यांचीही चौकशी करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# 'बाहुबली' प्रक्षेपित करणार अमेरिकेचा उपग्रह

## स्मार्टफोनला अंतराळातून मिळणार कनेक्टिव्हिटी ● आतापर्यंतचा सर्वांत जड व्यावसायिक उपग्रह

◆ **श्रीहरिकोटा, २० डिसेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो पुन्हा एकदा पराक्रम दाखवत आतापर्यंतचा सर्वांत जड व्यावसायिक उपग्रह प्रक्षेपण करणार आहे. विशेष म्हणजे हा उपग्रह अमेरिकेचा आहे. २४ डिसेंबरला सकाळी ८.५४ वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरि कोटातील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित करणार आहे. इस्रोच्या एलव्हीएम३ अग्निबाणाची ही सहावी मोहीम आहे.

एलव्हीएम३-एम६/ब्लूबर्ड ब्लॉक-२असे या मोहिमेला नाव देण्यात आले आहे. ही पूर्णपणे व्यावसायिक मोहीम आहे. अमेरिकन कंपनी एएसटी स्पेसमोबाईलचा ब्लूबर्ड ब्लॉक-२ संप्रेषण उपग्रह प्रक्षेपित होणार आहे. ही मोहीम इस्रोच्या व्यावसायिक शाखा न्यूस्पेस इंडिया लिमिटेडच्या माध्यमातून होते आहे. अंदाजे ६.५ टन वजनाचा, ब्लूबर्ड ब्लॉक-२ उपग्रह हा पृथ्वीच्या खालच्या कक्षेत तैनात केलेला आतापर्यंतचा सर्वांत मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह असेल. हा एलव्हीएम ३ अग्निबाणाद्वारे भारतीय भूमीवरून सोडण्यात आलेला आतापर्यंतचा सर्वांत वजनदार पेलोड आहे.



इस्रोने विकसित केलेले आणि पूर्वी जीएसएलव्ही एमके-३ म्हणून ओळखले जाणारे एलव्हीएम ३ हे भारतातील सर्वांत शक्तिशाली अग्निबाण आहे. याला अनेकदा 'बाहुबली' अग्निबाण देखील म्हटले जाते.

या अग्निबाणाची उंची ४३.५ मीटर असून वजन ६४० टन आहे. ते जियोसिंक्रोनस ट्रान्सफर कक्षेत चार टनपर्यंत पेलोड घेऊन जाऊ शकतो. लो अर्थ कक्षेत याची क्षमता १० टन आहे. एलव्हीएम३ ने याआधी अनेक महत्त्वपूर्ण मोहिमा यशस्वी पूर्ण केल्या आहेत. यात चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि दोन वनवेब मोहिमांचा समावेश आहे.

**ब्लूबर्ड ब्लॉक-२ उपग्रहाचे वैशिष्ट्य**

अमेरिकन कंपनी एएसटी स्पेसमोबाईलने बनवलेला हा उपग्रह पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह आहे. याचे सर्वांत उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ते अवकाशातून थेट सामान्य स्मार्टफोनला सेल्युलर ब्रॉडबॅण्ड कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. याचा अर्थ असा की दुर्गम भागात अतिरिक्त उपकरणे किंवा टॉवरशिवाय ४जी/५जी इंटरनेट उपलब्ध होईल. (वृत्तसंस्था)

### पॅरा बॅडमिंटनसाठी प्रशिक्षक विकास कार्यक्रमाचे आयोजन

**रायपूर :** भारतीय बॅडमिंटन संघटनेने (बीएआय) १६ ते २० डिसेंबर दरम्यान येथे पॅरा बॅडमिंटनसाठी (तळागाळातील स्तरावर) आपला पहिला-वहिला प्रशिक्षक विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. देशात या खेळाच्या वाढीस हातभार लावणाऱ्या प्रशिक्षण प्रणालीला बळकट करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या पाच दिवसीय कार्यक्रमात देशभरातील प्रशिक्षक पॅरा बॅडमिंटनमध्ये दीर्घकालीन क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने विशेष प्रशिक्षणासाठी एकत्र आले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दोन सैनिकांच्या बदल्यात इसिसची ७० ठिकाणे उद्ध्वस्त

## कित्येक दहशतवादी ठार; अमेरिकेने घेतला बदला





◆ **वॉशिंग्टन, २० डिसेंबर**

दोन सैनिक आणि एका सहकाऱ्याच्या मृत्यूचा बदला घेताना शनिवारी रात्री अमेरिकेने दहशतवादी संघटना इसिसच्या सीरियातील ७० तळांवर भीषण हल्ले चढविले. यामध्ये अनेक दहशतवादी ठार झाले असून आम्ही सैनिकांच्या मृत्यूचा बदला घेतला, अशी प्रतिक्रीया पेंन्टगॉनने दिली आहे.

गेल्या आठवड्यात इसिसच्या दहशतवाद्यांनी डोव्हेर हवाई तळावर तैनात असलेल्या विलियम हॉवर्ड, एडगर टोव्हार हे दोन सैनिक आणि स्थानिक दुभाषा अयार मन्सूर साकत यांची गोळ्या घालून हत्या केली होती. या घटनेचा बदला घेण्याचा इशारा अमेरिकेने आधीच दिला होता. दहशतवाद्यांसह इसिसचा नायनाट करण्यासाठी 'ऑपरेशन हॉकआय स्ट्राईक' या नावाने मोहीम अमेरिकेने सुरू करीत शुक्रवारपासून हल्ल्यांना प्रारंभ केला. या मोहिमेत एफ-१५, जॉर्डनच्या तळावरील एफ-१६, ए-१० थंडरबोल्ट ही लढाऊ विमाने आणि अपाचे हेलिकॉप्टर सहभागी झाले होते. एकाचवेळी १०० ठिकाणांवर हल्ले चढविण्यात आले. यात इसिसचे तळ पूर्णपणे उद्ध्वस्थ झाले, अशी माहिती अमेरिकन संरक्षण विभागाने दिली आहे.

ही युद्धाची सुरुवात नव्हे तर दहशतवाद्यांचा नायनाट करण्यासाठीची घोषणा होय. अशा दृष्ट शक्तीचा नाश होईपर्यंत डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार शांत बसणार नाही, असे अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेग्सेथ यांनी म्हटले आहे.

अमेरिकन सैनिकांवर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी इसिसने घेतली नसली तरी सीरियान सैनिकांवर इदलिब प्रांतात झालेला हल्ला केल्याची कबुली दिली आहे. अमेरिकेने डेईर इझ झोर आणि रक्का प्रांत आणइ जबाल अल अमोर भागात इसिसच्या तळांवर हल्ले झाल्याची माहिती सीरियाच्या सरकारी टीव्हीने दिली आहे. हल्ल्यात ठार झालेल्यांचा आकडा निश्चित नसला तरी २३ पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे. (वृत्तसंस्था)

### सीरियात अतिरिक्त सैनिक तैनात

इसिसला नष्ट करण्यासाठी सीरियात आणखी सैनिक तैनात करण्यात आले आहेत. सीरियाचे अध्यक्ष अहमद अल शार्रा यांच्या पाठीशी अमेरिका भक्कमपणे उभी आहे. आम्हाला शार्रा सरकारचा पूर्ण पाठिंबा असल्याचे हेग्सेथ यांनी म्हटले आहे.

# 'भाजपा'त भरतीला 'उधाण'






समुद्राला भरती–ओहोटीसाठी काळवेळ आहे. पण 'भाजपा'तील 'भरती'ला मात्र रात्रंदिवस उधाण आलेले आहे. अनेक राजकीय पक्षांना 'ओहोटी' लागली असली तरी ते नेते राजकीय धैर्य दाखवून जोमाने निवडणुकीच्या आवेषात असल्याचे दर्शवून आपल्या उरलेल्या कार्यकर्त्यांना सांभाळण्याचे काम करीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील राजकारण पाहिले असता तूर्तास मित्रपक्ष वगळता इतर सर्वच पक्षातील आजी–माजी खासदार, आमदार आदी दिग्गजांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये येण्यासाठी रांग लावल्याचे चित्र आहे. भाजपामध्ये येणाऱ्यांची रांग पाहिल्यानंतर लक्षात येते की, आपला पक्ष सोडताना संबंधितांच्या हे पुरते लक्षात आलेले दिसते की, भाजपा हा आता जनता जनार्दनाच्या मनातील सर्वाधिक लोकप्रिय राजकीय पक्ष बनला आहे. विश्वगुरु, विकासपुरुष असे ज्यांना अभिमानाने संबोधले जाते ते लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मोदींचे प्रतिरूप म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते असे महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देश आणि महाराष्ट्राच्या विकासाचा लावलेला झपाटा पाहून आता विरोधी पक्षातील अनेकांना भाजपाची भुरळ पडत आहे. निवडणुका असतानाही कोणत्याही अटी व शर्थी न घालता दररोज भाजपात प्रवेश करणाऱ्यांची संख्या बक्कळ आहे. जनता आणि मतदारांचा भाजपावर नित्यनेमाने वाढणारा विश्वास आणि भाजपाची जनमानसातील वाढती लोकप्रियता हे भाजपाच्या यशाचे गमक आहे. याचीच उलट बाजू पाहिली तर जे पक्ष सोडून राजकारणी भाजपात येत आहेत त्या राजकीय पक्षांनी देखील आत्मपरीक्षण करण्याची हीच खरी वेळ आहे. आपलेच लोक आपला पक्ष का सोडत आहेत, याचे आत्मचिंतन होणे काळाची गरज आहे. काँग्रेससह काही विरोधी पक्षांची अवस्था अशी आहे की, रस्सी जल गयी मगर बल नही गया. आपलेच लोक पक्ष सोडत असतानाही संबंधित पक्षाच्या नेत्यांचा अ‍ॅटिट्यूड काही बदलत नसल्याचे दिसून येते. उबाठा, मनसे, काँग्रेस असो की शरद राष्ट्रवादी या पक्षांतून बाहेर पडून भाजपात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या इतकी मोठी आहे, आता या पक्षांसाठी धक्का, खिंडार असे शब्द देखील प्रभावी ठरत नाहीत. दररोज सकाळी या पक्षाकडून पाहिले जात असेल की, आज कोण गेले.

सोलापूरच्या पक्षबदलाच्या राजकारणाला काही वर्षापूर्वीच सुरुवात झाली आहे. एकेकाळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादीचा तर सोलापूर शहर काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २०१४ नंतर आलेल्या मोदी लाटेनंतर दोन्ही काँग्रेसची जिल्ह्यात पुरती वाताहत झाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाताहतीला त्यांच्याच पक्षाचे नेतृत्व जबाबदार आहे. कारण पक्षातंर्गत वाद विकोपाला गेल्यानंतरही राष्ट्रवादीच्या शिर्षनेतृत्वांनी मौन बाळगले. जणू काही पक्ष नेतृत्वाच्या मूकसंमतीनेच पक्षातील वाद पेटते राहिले. कालांतराने राष्ट्रवादीतील अनेक दिग्गज राजकीय घराण्यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला.

काँग्रेसला लागलेली गळती थांबविण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांना फेव्हिक्विक देखील लागू पडत नसल्याने ते हतबल असल्याचे चित्र आहे. सोलापुरात काँग्रेसच्या जिल्हा व शहरातील अनेक पदाधिकारी, माजी आमदार, नगरसेवकांनी भाजपाच्या विकासाच्या जहाजात बसणे पसंत केले आहे.

विशेष म्हणजे काँग्रेस सोडताना काँग्रेसला बुडणारी नाव असे म्हणत ते पक्ष सोडत आहेत. लोकसभेला सोलापूर लोकसभेची एक जागा काँग्रेसने राखली खरी पण त्यामागे भाजपाने उमेदवार देताना केलेली गडबडीच कारणीभूत असल्याचे बोलले जाते. विधानसभा निवडणुकीत तर काँग्रेसला जिल्ह्यात एकही आमदारकी राखता आली नाही.

अनेक काँग्रेसवासियांनी भाजपात प्रवेश केलाय तर काहींनी भाजपाच्या मित्रपक्षांमध्ये जाणे पसंत केले.

विधानसभा निवडणुकीत तर भाजपाचे मित्रपक्ष एकनाथ शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांना सोलापूर जिल्ह्यात शून्य यश मिळाले आहे. त्यामुळे मित्रपक्षांनी देखील भाजपाच्या सहाय्याने महापालिकेत तरी वाटा मिळावा यासाठी महायुती करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. शहरात एकत्रित राष्ट्रवादीची राजकीय स्थिती केविलवाणी होती. गतवेळी महापालिकेत केवळ चार नगरसेवक होते. जागावाटपात सन्मान मिळणार नाही हे ओळखून अजित राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी सोलापुरात एकला चलो रे अशी भूमिका घेतली आहे. पण प्रदेशाध्यक्षांनी मात्र शेवटपर्यंत महायुतीत घुसण्याचा प्रयत्न करण्याचा कानमंत्र स्थानिक नेत्यांना दिल्याचे वृत्त आहे.

कोणी काहीही म्हणा पण आता भाजपातील भरतीला आलेले उधाण काही थांबणार नाही, कारण पक्षातील विरोध धुडकावत पक्ष प्रवेशासाठी सावज शोधणारे पालकमंत्री जयकुमार गोरे हे मुरलेले शिकारी आहेत, हे मात्र नक्की.



कर्नाटकातील होस्पेट येथील शासकीय शाळेत केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन् यांच्या हस्ते शनिवारी प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थिनींशी सीतारामन् यांनी संवाद साधला

# ओटीटी कन्टेन्टवर 'सेन्सॉर बोर्ड'चा अधिकार नाही

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणारा कंटेंट सेन्सॉर बोर्डाच्या अधिकारात येणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी ही माहिती दिली. चित्रपटगृहात दाखवण्यात येणाऱ्या चित्रपटांची तपासणी आणि प्रमाणपत्र देण्याचे काम सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन करते. मात्र, ओटीटी प्लॅटफॉर्मवरील कंटेंटसाठी स्वतंत्र प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. याचे नियमन माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ अंतर्गत केले जाते.

सरकारने ओटीटीवर आक्षेपार्ह मजकुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि प्रेक्षकांच्या तक्रारींना सोडवण्यासाठी त्रिस्तरीय यंत्रणा लागू केली आहे. यामध्ये पहिला स्तर म्हणजे प्रकाशकाद्वारे स्वतःहून केलेले नियमन, तिथे प्रत्येक प्लॅटफॉर्मवर तक्रार निवारण अधिकारी असणे बंधनकारक आहे. दुसरा स्तर प्रकाशकांच्या स्व-नियामक संस्थांद्वारे देखरेख करण्याचे काम करते आणि तिसरा स्तर म्हणजे केंद्र सरकारची देखरेख यंत्रणा जी अंतिम निर्णय घेऊ शकते. आयटी नियम २०२१ नुसार, ओटीटी प्लॅटफॉर्मला त्यांच्या कंटेंटचे वयोगटानुसार वर्गीकरण करणे अनिवार्य आहे तसेच कायदेशीर बंदी असलेला कोणताही मजकूर प्रकाशित करता येणार नाही. तक्रारींच्या निवारण प्रक्रियेबाबत, जर एखाद्या प्रेक्षकाला ओटीटीवरील मजकुराबाबत तक्रार असेल तर ती प्रथम संबंधित प्लॅटफॉर्मच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे पाठवली जाते. (वृत्तसंस्था)

# शरीफ हादीच्या मृत्यूनंतर मोहम्मद युनूस अडचणीत

## हंगामी सरकारला २४ तासांचा निर्वाणीचा इशारा

◆ **ढाका, २० डिसेंबर**

इन्कलाब मंचचा कार्यकर्ता शरीफ उस्मान हादीच्या मृत्यूनंतर बांगलादेशातील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्यासमोरील अडचणी वाढत आहेत. शरीफवर शनिवारी ढाक्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोहम्मद युनूस यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

शरीफ हादीवर ढाक्यातील विजयनगर भागात १२ डिसेंबरला दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. मानेत गोळी घुसल्याने गंभीर जखमी झालेल्या हादीवर सिंगापूरमध्ये उपचार सुरू होते. मात्र, गुरूवारी त्याचा मृत्यू झाला. शनिवारी बांगलादेश विद्यापीठ परिसरात त्याचे दफन करण्यात आले. याप्रसंगी हजारो नागरिक उपस्थित होते. हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूसही उपस्थित होते.




हादीच्या अंत्यसंस्काराला जमलेले नागरिक

हादीच्या मृत्यूनंतर मारेकरी कोण होते ते २४ तासांच्या आता जाहीर करा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशी धमकी हादीचा साथीदार अब्दुल अल जुबेरने दिली आहे. जोपर्यंत बांगलादेशचे अस्तित्व आहे तोपर्यंत हादी सर्वांच्या स्मरणात राहील, असे वक्तव्य त्यांनी केले. दरम्यान, इन्कलाब मंचने हंगामी सरकारला थेट इशारा देताना हादीचे युनूस सरकारवर मोठे दडपण आले आहे. फेब्रुवारी महिन्यात देशात सार्वजनिक निवडणुका होणार असल्याने वातावरण शांत आणि स्थिर ठेवण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

दरम्यान, सार्वजनिक निवडणुका टाळण्यासाठी हादीला मारल्याची शंका शेख हसीना सरकारमध्ये मंत्री राहिलेले मोहिबुल हसन यांनी व्यक्त केली आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### आर्यन खानला मिळाला पहिला पुरस्कार



**मुंबई** : शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला त्याच्या कारकीर्दीतील पहिला पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार त्याला त्याने दिग्दर्शित केलेल्या पहिल्या वेब सीरिज 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड'साठी मिळाला. वडिलांप्रमाणे पुरस्कार आवडतात, असे पुरस्कार स्वीकारताना आर्यन म्हणाला. हा सन्मान मात्र त्याने त्याच्या वडिलांना नाही, तर त्याच्या आईला समर्पित केला. त्याला बेस्ट डेब्यू डायरेक्टर ऑफ द इयरचा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी त्याच्यासोबत त्याची आजी सविता छिब्बरही उपस्थित होती. आर्यनने १८ सप्टेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेब सीरिजमधून दिग्दर्शक म्हणून इंडस्ट्रीत पदार्पण केले. ही सीरिज हिंदी चित्रपटसृष्टीवर आधारित एक उपहासात्मक कथा आहे.

### 'धुरंधर'च्या गाण्यावर थिरकला निक जोनस



**मुंबई** : प्रियांका चोप्राचा पती आणि पॉप सिंगर निक जोनसही आता 'धुरंधर' चित्रपटाच्या फॅन लिस्टमध्ये सामील झाला आहे. निकने शुक्रवारी त्याच्या इंस्टाग्रामवर एक छोटा व्हिडीओ शेअर केला आहे. यात तो चित्रपटाच्या 'शरारत' गाण्यावर नृत्य करताना दिसतो आहे. व्हिडीओमध्ये त्याच्यासोबत त्याचे भाऊही थिरकताना दिसत आहेत. व्हिडीओ शेअर करत निकने नया प्री-शो हाइप सॉन्ग अनलॉक्ड, असे कॅप्शनमध्ये लिहिले आहे. निकची पोस्ट समाज माध्यम युजर्सना खूप आवडत आहे. रणवीरने निकच्या पोस्टवर मजेदार प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धर यांनीही कमेंट केली आहे.

### 'हॅपी पटेल खतरनाक जासूस'चा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई** : बॉलिवूडमध्ये आमिर खान प्रोडक्शन्सचा 'हॅपी पटेल खतरनाक जासूस' चित्रपट येत आहे. या चित्रपटाचा नुकताच एक ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. हा एक स्पाय कॉमेडी चित्रपट आहे. यातील गुप्तहेराची भूमिका वेगळ्या अंदाजात असून ती अनोख्या पद्धतीने सादर करण्यात आली आहे. ट्रेलरमध्ये 'हॅपी पटेल' खतरनाक जासूस आहे. पण त्याची स्टाईल, व्यवहार, विनोदी शैली सर्वकाही खूपच अफलातून आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन वीर दास यांनी केले आहे. चित्रपटात मोना सिंह महत्त्वाच्या भूमिकेत असून आता चित्रपट प्रदर्शित होण्याची उत्सुकता सर्वांना आहे.

# मुस्लिम देशांमध्ये भारतीय अवयवांची तस्करी

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

काही बेकायदेशीर अवयवदान करणाऱ्या टोळ्यांनी भारतीय नागरिकांचे अवयव मुस्लिम देशांमध्ये विकले आहेत, असे केरळमध्ये सुरू असलेल्या एका प्रकरणाच्या चौकशीत राष्ट्रीय तपास संस्थेला आढळले. या वर्षी ओडिशाहून दोन लोकांना इराणव्यतिरिक्त ताजिकिस्तानला पाठवण्यात आले. तिथे श्रीमंत व्यक्तींवर त्यांचे मूत्रपिंड प्रत्यारोपित केले गेले, असे एनआयएने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात उघड झाले. या प्रकरणाची सुरुवात १८ मे २०२४ रोजी झाली. कोची विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी साजिथ नावाच्या व्यक्तीला संघटित अवयव तस्करीत भाग असल्याच्या संशयावर ताब्यात घेतले.

विजयवाड्यातील रहिवासी साजिथ आणि बेल्लमकोंडा राम प्रसाद यांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी मधु जयकुमार आहे. तो एक वर्षाहून अधिक काळ फरार होता. त्याला ७ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली विमानतळावर अटक करण्यात आली. एनआयएच्या प्रतिज्ञापत्रानुसार, चौकशी दरम्यान जयकुमारने इराणमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण केलेल्या २७ प्राप्तकर्त्यांची नावे उघड केली. तसेच ११ देणगीदारांची माहितीही त्याने दिली. एनआयएने जयकुमारच्या कोठडीची मुदत वाढवून त्याचा बेकायदेशीर अवयव व्यापारातून मिळालेल्या पैशाचा तपास करण्याची मागणी केली आहे. (वृत्तसंस्था)

# सापांपासून प्रेरणा घेऊन बनवला कॅमेरा

◆ **बीजिंग, २० डिसेंबर**

विज्ञानाच्या जगात निसर्गाकडून प्रेरणा घेऊन अनेक शोध लावले जातात. चीनमधील शास्त्रज्ञांनी असाच एक शोध लावला आहे. त्यांनी सापांच्या उष्णता शोधण्याच्या क्षमतेचा म्हणजेच हिट सेन्सिंगचा आधार घेऊन एक अत्याधुनिक आर्टिफिशिअल इमेजिंग सिस्टम विकसित केली आहे. हा जगातील पहिलाच असा सेन्सर आहे जो पूर्ण अंधारातही '४के रिझोल्यूशन' (३,८४० बाय २,१६० पिक्सेल्स) मध्ये इन्फ्रारेड फोटो घेऊ शकतो.



'पिट वायपर्स' सारख्या काही सापांच्या प्रजातींकडे नाकाच्या जवळ 'पिट ऑर्गन' नावाचे एक विशेष अंग असते. हे अंग त्यांना अंधारात भक्ष्याकडून उत्सर्जित होणारी उष्णता (इन्फ्रारेड लहरी) पाहण्यास मदत करते. याच संकल्पनेचा वापर करून 'बीजिंग इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या शास्त्रज्ञांनी नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. ज्या वस्तूचे तापमान उणे २७३ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते, त्यातून इन्फ्रारेड लहरी बाहेर पडतात. शास्त्रज्ञांनी या लहरी टिपण्यासाठी एका ८ इंची डिस्कवर विविध थरांची मांडणी केली. पहिल्या थरावर क्वांटम डॉटस् लेयर आहे. यात मर्क्युरी आणि टेल्युरियमपासून बनलेले सूक्ष्म कण आहेत. ते इन्फ्रारेड लहरी शोषून घेतल्यावर विद्युत प्रभार तयार करतात. दुसऱ्या थरावर अपकन्व्हर्टर लेयर आहे. हे विद्युत प्रभार एका विशिष्ट लेयरमधून जातात. तिथे त्यांचे रूपांतर हिरव्या दृश्य प्रकाशामध्ये केले जाते. तिसऱ्या थरावर सेन्सर आहे. अखेरीस हा प्रकाश एका सेन्सरद्वारे हाय-रिझोल्यूशन प्रतिमेत रूपांतरित होतो.

**फोटोग्राफी क्षेत्रात क्रांतीची शक्यता**

चिनी शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या या तंत्रज्ञानात सर्व लेयर्स एकावर एक असल्याने संकेतांची हानी होत नाही आणि कूलिंगची गरज भासत नाही. हे संशोधन २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध 'नेचर' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान भविष्यात संरक्षण क्षेत्र, वैद्यकीय तपासणी आणि रात्रीच्या वेळी केल्या जाणाऱ्या फोटोग्राफीमध्ये मोठी क्रांती घडवून आणू शकते. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# देवाचे दुसरे नाव...

अलिकडे समाज माध्यमांवर एक विनोद वेगाने फैलावला आहे. 'स्वच्छ भारत मोहीम महाराष्ट्रात शंभर टक्के यशस्वी होणार आणि राज्यात स्वैरपणे वावरणाऱ्या बिबट्यांचा त्या यशामध्ये सिंहाचा वाटा असणार' असा हा विनोद खरे म्हणजे अस्वस्थ करणारा, विरोधाभासावर बोट ठेवणारा म्हणावा लागेल. पण या निमित्ताने, स्वच्छ भारत मोहीम नावाचे एक राष्ट्रीय जनआंदोलन पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेत आले, याची खात्री पटते.

विरंगुळ्यासाठी असे काही समाजमाध्यमी साहित्य पचवून झाले की आपण आपल्या उद्योगाकडे वळतो. काहीच काम नसेल, तर जुने काहीतरी वाचत, ऐकत किंवा न्याहाळत बसतो. परवा माझेही तसेच झाले. काशी विश्वेश्वरधाम प्रकल्पाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने पंतप्रधानांचे एक जुने भाषण ऐकत मी घराच्या खिडकीत बसलो होतो आणि त्यांच्या भाषणातही स्वच्छ भारत मोहिमेचा तो उल्लेख ऐकला. पंतप्रधानांनी एखादी मोहीम सुरू केली की त्याचा सातत्याने पाठपुरावा करून समाजास सातत्याने त्याची आठवण करून देण्याची त्यांची सवय एव्हाना देशाला माहीत झाली आहे. त्या भाषणात स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख पुन्हा ऐकला, तेव्हा मी खिडकीतून बाहेरचा परिसर निरुद्देशपणे न्याहाळत होतो...

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील आमच्या घरापासून थोड्याच अंतरावर एक नाला आहे. कधीकाळी ती नदी, खाडी असावी एवढे ऐसपैस पात्र आहे त्याचे. खूप वर्षांपूर्वी आम्ही या घरात राहायला आलो, तेव्हा ती वाहती नदीच होती. थंडीच्या दिवसांत पहाटे त्या पात्रातील पाण्यावर वाफांची वर्तुळे नृत्य करायची आणि काठावर ध्यान करून बसलेले बगळे अचानक पाण्यात चोची बुडवून एखादा मासा गट्टम करायची. सकाळी उठून खिडकीबाहेर पाहिल्यावर दिसणाऱ्या या दृश्याला भुलून आम्ही हे घर घेतलं, तेव्हा भविष्याची जरादेखील शंका मनात डोकावली नव्हती. आता त्या नाल्यातून रसायनमिश्रित काळे पाणी वाहते. आता काठावर बगळे नाहीत, कावळे कलकलाट करत असतात. भरतीची वेळ सोडली, तर त्या नाल्यातलं ते प्रदूषित रसायन एकाच जागी संथ साचल्यागत स्वस्थ असतं. कधीतरी एखादा डंपर येतो आणि त्या काळ्या पाण्यात ट्रकभर कचरा ओतला जातो. कुणीतरी रस्त्यावरून जाता जाता पुलावर थांबून कचरा किंवा टाकाऊ वस्तूंनी भरलेली प्लॅस्टिकची पिशवी फेकतं. त्या संथ साचलेपणात थोडीशी खळबळ माजते. काही क्षण नाला ढवळला जातो आणि पुन्हा साचलेलं काळं पाणी संथ होऊ लागतं. कचरा आणि टाकाऊ वस्तूंचे ढिगारे माजले की, ते काळं पाणी संकोचून काठाकडचा कोपऱ्यात जमा होऊ लागतं, तोवर पावसाळ्याची चाहूल सुरू होते. मग महापालिका नालेसफाई वगैरे कार्यक्रम हाती घेते आणि मोठमोठी पोकलेनसारखी यंत्रे काठावर धडधडू लागता. काळं पाणी ढवळून निघतं. आधी टाकलेला कचरा उचलण्याचा कार्यक्रम घाईघाईने पार पाडून गाड्या निघून जातात आणि काळं पाणी उरलेला कचरा कवटाळत पुन्हा जागच्या जागी साचून स्वस्थ बसतं.

पंतप्रधानांच्या भाषणातील स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख कानावर पडला, तेव्हा मी किड्यांच्या वळवळण्यामुळे अस्वस्थ झालेल्या त्या काळ्या डबक्याकडे पाहात होतो. मला अलिकडे ते पाहताना आनंद वगैरे होत नाही. आता तो नाला पुन्हा पहिलेसारखा नदी होऊन नितळ पाण्याने वाहू लागणार नाही, याची मला पुरती खात्री असल्याने, नाल्याचे वास्तव मी मान्य केले आहे. नदीचा नाला होऊन पाण्याची जागा रसायनमिश्रित द्रवपदार्थांनी घेतली हा त्या नाल्याचा नव्हे, तर माणसाचाच दोष आहे, हे माहीत असूनही आपल्याला लाज का वाटली नाही असा विचारही मनात आला. त्याच वेळी स्वच्छ भारत मोहिमेचे काहीसे हसू देखील आले. स्वच्छता हा कोट्यवधी रुपये खर्चाचा सरकारी कार्यक्रम करावा लागतो, हा मानसिक विकासाच्या अनुशेषाचाच परिणाम आहे, हेही जाणवले आणि विचार करत करत मन मागे गेले.

पंतप्रधानांचं भाषण ऐकत असतानाच खिडकीतून पुन्हा माझी नजर त्या नाल्यात साचलेल्या काळ्या पाण्यावर पडली. आता पाण्याचे कोणतेच गुण त्याच्या अंगी राहिलेले नाहीत. त्यामध्ये मासा शोधूनही सापडणार नाही, पण त्याच्या तेलकट तवंगावर किडे वळवळताना दिसतात. उन्हाची किरणं त्या तवंगावर पडली की वळवळणाऱ्या किड्यांच्या हालचालींनी नाला अस्वस्थ चुळबुळताना दिसतो. कदाचित त्यातल्या रसायनालादेखील एकाच जागी साचल्याचा कंटाळा येत असावा...

मुंबईच्या मध्यावरून मिठी नदी वाहते. तिला अजूनही नदी म्हणत असले, तरी तो आता असाच एक नाला आहे. रसायनमिश्रित द्रवपदार्थ, कचरा आणि टाकाऊ म्हणून नकोसे झालेल्या असंख्य वस्तू पोटात घेणारे ते हक्काचे ठिकाण झाले आहे. काही वर्षांपूर्वी, मुंबईत वाझे नावाच्या पोलिस अधिकाऱ्यावर खंडणी वसुली प्रकरणी कारवाई सुरू झाल्यावर तर, या मिठीच्या पोटातून संगणक आणि महत्त्वाची माहिती असलेल्या हार्ड डिस्कस् देखील बाहेर काढल्या गेल्या होत्या. असंख्य गुन्ह्यांचे पुरावेदेखील या नाल्याच्या पोटात गडप झाले असल्याची वदंता आहे. तरीही पश्चिम उपनगरांतील अनेक जण उपनगरी गाड्यांतून ये-जा करताना सोबतच्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून आणलेले निर्माल्य, नारळ, पूजेचे साहित्य वगैरे वस्तू गाडी पुलावर आली की भक्तिभावाने मिठी नदीत फेकतात आणि नमस्कारही करतात. हेही मानसिकतेचेच एक रूप असते.

ते भाषण ऐकताना, स्वच्छ भारताच्या मुद्यापाठोपाठ मनात साचलेली ही काही दृश्ये जिवंत झाली आणि स्वच्छता हे मानसिक विकासाचे पहिले लक्षण आहे, असा निष्कर्ष मी काढला. आजकाल मुंबईत स्वच्छता राखण्यासाठी, रस्त्याकडेच्या भिंतींवर देवतांच्या वगैरे प्रतिमा रंगविल्या जातात. देवादिकांचे फोटोही लावले जातात. त्यांच्यासमोर कचरा वगैरे फेकण्याएवढा बेमुर्वतपणा माणसाच्या अंगी सरसकटपणे नसतो, असा त्यामागचा विचार असावा. पण



स्वच्छतेचे महत्त्व सांगणाऱ्या एखाद्या होर्डिंगच्या खालीच कचरापट्टी झालेलीही इथे पाहायला मिळते. मानसिक विकासाचा अनुशेष भरून काढायला आपल्याला किती वर्षे लागणार, या विचाराने मनात काहूर माजते. पंतप्रधान मात्र, आपल्या प्रत्येक भाषणात स्वच्छ भारताचा मंत्र देतच असतात...

अकरा वर्षांपूर्वी, २ ऑक्टोबर २०१४ रोजी गांधी जयंतीदिनी स्वच्छ भारत नारा देशभरात घुमला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: झाडू हातात घेऊन राजघाटावर स्वच्छता करत या मोहिमेची सुरुवात केली आणि देशातील चार हजार शहरांमध्ये रस्ते, नद्या आणि परिसराच्या स्वच्छतेचा संकल्प सोडला गेला. राष्ट्रीय पातळीवर ही मोहीम राबविण्यासाठी देशातील ३० लाख सरकारी कर्मचारी या मोहिमेत सहभागी होतील आणि २०१९ मध्ये महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीदिनी स्वच्छ भारताची त्यांची इच्छा पूर्ण केली जाईल, असा विश्वास पंतप्रधानांनी त्या दिवशी व्यक्त केला. यापुढे या देशात कोणीही कचरा करणार नाही आणि कोणीही कोणासही कचरा करू देणार नाही, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आणि देशातील प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी होऊन देश स्वच्छ राखावा, असे आवाहनही केले...

आता या मोहिमेने जनआंदोलनाचे रूप घेतले आहे, स्वच्छ भारत हा नारा देशाच्या नव्हे, जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे आणि या मोहिमेच्या यशाकडे उभे जग उत्सुकतेने पाहात आहे, असे म्हटले जाते. म्हणूनच, दहा-अकरा वर्षांनंतर आसपास पाहताना सहज दिसणाऱ्या काही बाबी नोंद करून ठेवाव्या असे वाटले...

स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे असा संदेश मिरवत यच्चयावत देवप्रतिमांपासून साईबाबांपर्यंत सारे रस्तोरस्तीच्या भिंतींवर वर्षानुवर्षे असूनही, अस्वच्छतेचा कलंक माथी मिरविण्याची सवय संपली नव्हती, ती या एका नाऱ्याने नष्ट होईल यावर विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती अजूनही निर्माण झालेली नाही. पंतप्रधानांनी ज्या विश्वासाने देशातील जनतेच्या खांद्यावर स्वच्छतेच्या जबाबदारीची पालखी सोपविली, ती पेलण्यासाठी अजूनही जनतेचे खांदे पुरेसे सक्षम झालेले नसावेत असे वाटण्याजोगी स्थिती आजही जागोजागी अनुभवास येते. आसपासच्या सहज जाणवणाऱ्या एखाद्या प्रसंगातून ही खंत उगीचच डोके वर काढू लागते.

कालच, एका शेअर रिक्षाने प्रवास करतानाच्या एका प्रसंगामुळे असं वाटायला लागलं. धूर, गाड्यांचे कर्कश हॉर्न, गर्दीचा सरमिसळलेला आवाज आणि प्रचंड वाहतूक कोंडीच्या पसाऱ्यातून कशीबशी वाट काढत आमची रिक्षा एका सिग्नलजवळ थांबली. रिक्षाचालकाने इकडेतिकडे पाहिले आणि गुटखा, मावा किंवा तंबाखूचा तोबरा भरून तोंडाचे तळे होईपर्यंत साठविलेली थुंकीची पिंक रस्त्यावर मोकळी करून ढणाढण वाजणाऱ्या गाण्याच्या सुरात त्याने आपलाही सूर मिसळला. पुढचा सिग्नल येईपर्यंत पुन्हा त्याचे तोंड भरले होते. या सिग्नलला थांबताच तो पुन्हा पचकन थुंकला. एक गिळगिळीत शहारा अंगावर आल्याने न राहवून मी त्या रिक्षावाल्याला सुनावू लागलो. बाजूचे दोन सहप्रवासीही साथीला आले. पण त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता. एवढे ऐकल्यानंतरही, काही फरक पडल्याची एकही रेषा रिक्षावाल्याच्या चेहऱ्यावर उमटली नव्हती.

''भैया, जिस रस्तेपर गाडी चलाके रोजीरोटी कमाते हो, उसीपर थूकते हुए शरम नहीं लगती क्या?'' शेजारच्या प्रवाशाने तळमळून प्रश्न केला आणि रिक्षावाल्याने मागे वळून पाहिले. तोच थंडपणा त्याच्या चेहऱ्यावर होता.

''देखो साब, मेरी रोजीरोटी इस रिक्षा से चलती है... रस्तेपरसे नहीं और रही बात, शरम लगनेकी... मुझे बताईये, रस्तेपर थूकनेवाला मैं अकेलाही हूँ क्या?... तो मेरे ना थूकनेसे क्या आपको लगता है कि मुंबई साफ रहेगी?... मैं तो थुकूंगा. और एक बात. मैं पूरा दिन रस्तेपर ही गाडी चलाता रहता हू... बीच में कभी पेशाब के लिए रुकना तो पडता है ना?... लेकिन अगर जगहजगह पर पेशाबघर हैही नहीं, तो क्या मैं ऐसेही, किसी रस्ते के बाजू में खडा होकर पेशाब नहीं करूंगा?... इससे भी तो गंदगी होती है. क्या उस गंदगी के लिए आप मुझे जिम्मेदार ठहराओगे या सिस्टमको?''

...उत्तराची वाट न पाहता रिक्षावाला समोर बघू लागला. सिग्नल पडला आणि पुन्हा एकदा रस्त्यावर पचकन थुंकून त्याने गाडी दामटली!

एका जुन्या पावसाळी दिवशी, मुंबईच्या रस्त्यावरून प्रवास करताना आलेला असाच एक अनुभव... 'बेस्ट'ची एक खच्चून भरलेली बस. पुरुष प्रवासी पॅसेजमधेही उभे आहेत. महिलांसाठी राखीव बाकडी मात्र, एका महिला प्रवाशासाठी पूर्ण बाकडे अशा हिशेबाने भरलेले! लक्षपूर्वक ध्यान दिले, तर जवळपास प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर, पुरुष प्रवाशांना खुन्नस दिल्याचा भाव दिसतोय! अचानक पावसाची सणसणीत सर आल्याने खिडक्यांच्या काचा फटाफट खाली ओढल्या जातात आणि पावसामुळे ट्रॅफिकही जाम होते. कितीतरी वेळ गाडी जागेवरच उभी होती! दोन-चार मिनिटांत उकाड्याने गर्दी कासावीस होऊ लागते. घामाच्या धारा सुरू होतात. अशा वेळी अस्वस्थता येते. चिडचिड होते. गर्दीतल्या कुणाचा स्पर्शही नकोसा वाटू लागतो आणि आपण असे हाल सोसत असताना दुसरं कुणी मात्र आराम एन्जॉय करतोय हे पाहणे तर आणखीनच बेचैन करणारे असते! अशाच वातावरणात, महिलांसाठी राखीव असलेल्या एका बाकड्यावर ऐसपैस बसलेल्या एका प्रवासी महिलेने पर्स उघडली. कंगवा काढला. केस मोकळे करून मनसोक्त मान हलवली. एखाद्या मोराने पिसारा फुलवून थिरकवावा, तसे आपले केस मान हलवूनच फुलविले आणि भरलेल्या बसमध्ये, स्वमग्नपणे, आत्मानंदी टाळी लागल्याच्या पारमार्थिक आनंदात, केस विंचरण्याचा सोहळा सुरू झाला... केसातून फिरणारा कंगवा बाहेर आला की त्यात अडकलेली गुंतवळ बोटाने सोडवून केसांना अलगदपणे बसमध्येच सीटखाली सोडणे सुरू झाले. केसांची गुंतवळ एकत्र केली तर बचकाभर तरी होईल, असे ते ऐतिहासिक दृश्य पाहणाऱ्या प्रत्येक प्रवाशास वाटत असावे, हे त्यांच्या मळमळलेल्या चेहऱ्यांवरच दिसत होते. ती महिला मात्र, आसपासची तमा न करता, बसला कचराकुंडी समजून केसांची गुंतवळ अर्पण करतच होती.

.... वाहतूक कोंडीत खोळंबून थांबलेल्या बसमधूनच रस्त्याकडेच्या एका भिंतीवर स्वच्छ भारतच्या जाहिरातीचे भलेमोठे पोस्टर दिसत होते. त्यावर मोदींचं चित्र पाहून एक प्रवासी उखडला.

''ये अकेला आदमी क्या करेगा स्वच्छ भारत?'' तो जोरात बोलला.

गर्दीकडे लक्षही न देता आत्मग्नपणे केस विंचरणाऱ्या त्या महिलेने कंगव्यातला अखेरचा पुंजका सीटखाली सोडला आणि केस पुन्हा बांधून ती नीटनेटकी झाली! स्वच्छ!!

...पण अजूनही या मोहिमेच्या यशाची आशा संपलेली नाही. स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे, हा सुविचार एव्हाना मुंबईसारख्या महानगरातील रस्त्यारस्त्यावर दिसूही लागला आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रत्येकास तो पाठ झाला आहे आणि मोदी नावाच्या माणसाने देशात राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेची मोहीम सुरू करून महात्मा गांधींचे स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्याचा ध्यास अजूनही सोडलेला नाही, हेही अनेकांस माहीत आहे. कदाचित म्हणूनच, एखादा टाकाऊ कागद, प्लॅस्टिक, बाटली वगैरे वस्तू वापर संपताच लगेचच फेकून देण्याआधी लोक हळूच इकडेतिकडे पाहातात, असे लक्षात येते. आपल्याला कुणी पाहात नाहीये ना, याची खात्री झाल्यावर मगच या वस्तू इतस्तत: फेकाव्यात एवढी समज निर्माण झाली आहे... याचा अर्थ, पहिलेसारखा बेदरकारपणा आता अशा कृतीत फारसा दिसत नाही.

एवढ्या बदलास दहा वर्षे लागली असा हिशेब केला, तर वाटेल तेथे फेकून कचरा माजवू नये हा संपूर्ण विचार मनात रुजण्यासाठी पुढची पंचवीस वर्षे तरी लागतील, असा अंदाज आहे. तसेही, उत्क्रांती ही संथपणे पुढे सरकणारीच प्रक्रिया आहे.

माणसाला पूर्वी शेपूट होते असे म्हणतात. ते नष्ट व्हायला हजारो वर्षांची वाट पाहावी लागली होतीच की!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### प्रवास अपूर्णतेकडून पूर्णतेकडे...

'ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णमेवावशिष्यते । ॐ शांति शांति शांतिः' हा शांतिमंत्र अनेक वर्षांपासून आपण ऐकतो आहे, वाचतो आहे, समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. जेथून उत्पन्न झालो ते पूर्ण, जिथे स्थित आहोत तेही पूर्ण, त्या पूर्णातून काढले तेही पूर्ण, त्या पूर्णात सामावले तेही पूर्ण, असे उपनिषदे सांगतात. गुरुमुखातून अनेकदा ऐकले, तरीही अपूर्णतेची जाणीव सतत का होत असते? ही विष्णू माया अनेक ज्ञानी लोकांना पुनःपुन्हा त्या मायेत अडकवते. ग्रंथसंपदा ग्रंथी सोडवतात म्हणे! अनेक ग्रंथ, पुस्तके, गाथा जवळ असल्या, तरीही त्यातील काय घ्यावे हे कोण सांगणार? प्रस्थान त्रयींमध्ये आपल्या ऋषिमुनींनी सांगितले आहे, श्रवण, मनन,? निदिध्यासन. म्हणजेच ग्रंथ आपल्याला कोणती शिकवण देत आहे, हे श्रवणाने उमगते. त्यातून काय साध्य करायचे आहे, हे प्रवचनातून समजले की, त्यानंतरच ग्रंथ वाचनाने काहीतरी आकलन होते. पूर्ण ब्रह्मांडाचे ज्ञान जरी झाले तरी तो ब्रह्मांड निर्माण करणाऱ्याचा शोध लागत नाही. तो 'दशांगुळे उरला' असे ज्ञानी म्हणतात. तत्त्वज्ञानाने मनाची शांती होत नाही. बालवाडीतील शिक्षिका बोट धरून भौतिक शिक्षणाचे धडे गिरवून घेतात. जगण्याचे धडे कोणी शिकवावे? येथे एकनाथांची शिकवण आठवते.

**'जरी होते ग्रंथ गुरू तरी का घेणे लागे अवतारु'**

प्रत्येक अपत्याच्या वृत्तीनुसार, पिंडानुसार आई आपल्या बाळाला घास भरवते, वाढवते, काळजी घेते. गुरुमाउली तशाच प्रकारे शिष्यास सांभाळते. मनुष्याचा एकांगी दृष्टिकोन बदलावा. आधिभौतिक प्रगती, आधिदैविक शक्ती, आध्यात्मिक समाधान या तिन्ही अंगाने शिष्याचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करते. याच त्रिविध तापांतून होरपळलेल्या जिवाला ईश्वरभक्तीची फुंकर गुरुमाउली घालते. प्रपंचात येणाऱ्या सुख-दुःखाला सामोरे जाण्याचे बळ देते. गरुडझेप घालून येणाऱ्या दुःखाने उद्ध्वस्त झालेल्या तनाला मनाला शांती मिळावी म्हणून प्रयत्न करते. गुरू वाक्य कानावर पडले की समाधानाचा, तृप्तीचा भाव जाणवतो. मात्र, काही क्षणातच पुन्हा मायेच्या, मोहाच्या, ममत्वाच्या गर्तेत मनुष्य सापडतो.

**'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी ।'**

गतजन्मीचे कर्म साथीला होते म्हणून भगवतीची उपासना घडली. सद्गुरूंचे चरणी नतमस्तक होणे घडले. देहधारी होऊन ईश्वर आपल्यासाठी ईश्वरतुल्य गुरुदेव पाठवतो. गुरू मळलेल्या, माखलेल्या या साधकाला शिष्यत्व बहाल करतात. त्याला स्वच्छ करून ईश्वराकडे जाण्याच्या मार्गावर अलगदपणे पोहोचवतात. प्रारब्धातील घटनेला अनुसरून आपण स्वतःला सांभाळावे असे शिकवतात, बळ देतात. अनपेक्षित धक्क्याने कोसळलेल्या, कोलमडून पडलेल्या, उन्मळून पडलेल्या या साधकाला पुन्हा नव्याने उभं राहायला मदत करतात. 'पुन्हा नव्याने जन्मले मी' ही भावना मनात येईपर्यंत गुरुमाउली सांभाळते. भौतिक सुखाच्या सोहळ्यात तू जशी समरसून जातेस तशीच आत्मिक सुखाच्या आनंदात रमशील, असे शिवधनुष्य माउली नादान लेकरासाठी उचलते. आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक अशा तीनही शांतीच्या या मंत्राच्या अनुभूतीसाठी गुरुकृपा हवी. गुरूंचा वरदहस्त हवाच. कुलमातेचा आशीर्वाद हवा. कर्तव्याचा मार्ग दाखविणाऱ्या गुरू चरणी समर्पित व्हावे, असे आशीर्वादही गुरूने द्यावेत, भगवतीने द्यावेत, एवढेच.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

**डॉ. उज्ज्वला सतीश देशमुख**/९४२२८०७२४७

### श्री नृसिंह सरस्वती महाराज जयंती

श्री नृसिंह सरस्वती महाराज यांची जयंती, यावर्षी पौष शुद्ध द्वितीया म्हणजे २२ डिसेंबरला आहे. श्री दत्तात्रेयांचे दुसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती महाराज यांचा जन्म १३७८ साली विदर्भातील कारंजा लाड येथे झाला. श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या नंतरचे दत्तात्रेयांचे पूर्ण अवतार नृसिंह सरस्वती स्वामींना मानले जाते. नृसिंह सरस्वती हे संन्यासी होते. श्री गुरुचरित्र या दत्त संप्रदायातील वेदतुल्य ग्रंथांमध्ये श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे जीवनकार्य आणि लीलांचे वर्णन आले आहे. हा ग्रंथ दत्तभक्तांचा वेद मानला जातो. नृसिंह सरस्वती महाराजांमुळे महाराष्ट्रात दत्त संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. गुरुचरित्र कथेनुसार नृसिंह सरस्वती यांनी जन्मताच ओंकाराचा उच्चार केला .सात वर्षे ते याशिवाय एकही शब्द बोलले नाही. त्यानंतर त्यांनी माता-पित्यांना उपनयन करण्याविषयी सुचविले. उपनयन होताच त्यांच्या मुखातून वेदवाणी बाहेर पडली. त्यानंतर ते माता-पित्यांचा आशीर्वाद घेऊन बद्रिकेदार येथे गेले. काशी मुक्कामी त्यांना संन्यासी कृष्ण सरस्वती यांनी संन्यास दीक्षा दिली. त्यानंतर एकदाच ते कारंजाला आले. नंतर सतत भ्रमंतीवरच राहिले. अमरापूर या कृष्णा पंचगंगा संगम असलेल्या गावी ते बारा वर्षे राहिले. त्यांच्या या प्रदीर्घ निवासामुळे या गावाला नृसिंहवाडी म्हणजेच नरसोबाची वाडी हे नाव पडले.

त्यानंतर गाणगापुरी (भीमा- अमरजा नद्यांचा संगम असलेलं कर्नाटकातील गाव) ते २४ वर्षे राहिले. नृसिंह सरस्वतींनी श्रीपाद श्रीवल्लभांचे कार्य पुढे चालवले आणि दत्त संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनी संपूर्ण भारतातच संचार केला. त्यांचा मोठा शिष्यवर्ग तयार झाला. त्यांचे प्रमुख सात शिष्य होते. माधव सरस्वती, कृष्ण सरस्वती, बाळकृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती आणि सिद्ध सरस्वती. यांनीही दत्तपरंपरेचा प्रसार केला. स्वामींनी जिथे जिथे तपश्चर्या केली, कार्य केले, ती ठिकाणे औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर ही दत्त संप्रदायातील अतिशय पवित्र स्थाने झाली. त्यांच्याच कार्यकाळात श्री गुरुचरित्र हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची महाराष्ट्रात दत्तभक्त पारायण करतात. नृसिंह सरस्वती हे या ग्रंथाचे चरित्र नायक आहेत. गुरुचरित्राच्या ११ ते ५१ या अध्यायात त्यांचे लीला चरित्र आले आहे. नरसोबाची वाडी, औदुंबर आणि गाणगापूर येथे त्यांच्या पादुका असून, लाखो भक्त दर्शनासाठी आणि सेवेसाठी येतात. दत्त जयंतीला सप्ताहात लाखो दत्तभक्त श्री गुरुचरित्राचे पारायण करतात आणि अनुभूती घेतात. कारंज्याला त्यांच्या जयंतीपासून त्यांच्या शैलागमनापर्यंत दीड महिना उत्सव असतो. या पुण्यकाळात दत्तभक्तांनी नक्की कारंजाला भेट द्यावी.

**माधवी पत्की**/नागपूर

### बांगलादेशातील जिहादी उन्माद




काल बांगलादेशात घडलेली घटना ही केवळ एका देशातील बातमी नाही; ती काळाच्या कपाळावर कोरलेली चेतावनी आहे. एका हिंदू युवकाला झाडाला बांधून जिवंत जाळले गेले आणि त्या अमानुष क्षणी जमावाच्या तोंडून अल्लाहू अकबरचे नारे निघाले. ही कट्टर जिहादी विकृत मानसिकतेची रणभेरी होती. ही आग शरीरापुरती मर्यादित नव्हती; ती माणुसकीच्या मुळांनाच जाळणारी होती. जिथे धर्म करुणेऐवजी क्रौर्य शिकवू लागतो, तिथे तो धर्म राहत नाही तो जिहादी उन्माद बनतो.

कट्टरतावादाचा चेहरा नेहमीच एकसारखा असतो: तो प्रश्नांना घाबरतो, विचारांना दडपतो आणि भीतीला देवत्व बहाल करतो. जमावाच्या नशेत विवेक हरवतो आणि मग माणूस माणसाचा शत्रू ठरतो. अशा उन्मादात सत्य गुदमरते, न्याय पळून जातो आणि कायदा थरथरतो. आज शेजारी घडलेली ही घटना उद्याचा आपला आरसा ठरू शकते जर आपण डोळे उघडे ठेवले नाहीत तर. भारताने शतकानुशतके सहअस्तित्वाचा धडा दिला आहे. इथल्या हिंदूने कधीही गैर हिंदूंना त्रास दिलेला नाही किंवा त्यांच्या विरोधात धार्मिक उन्मादाचे प्रकटीकरण सुद्धा केले नाही. परंतु हिंदूंच्या या सौजन्यतेचा अनेकदा चुकीचा अर्थ घेतला गेला आणि त्यांना सॉफ्ट टार्गेट समजून त्यांच्या श्रद्धा आणि मानबिंदूंवर आघात करण्यात आला. हिंदू समाज जैविकदृष्ट्या सहिष्णूच आहे. पण सहिष्णुतेचा अर्थ आत्मसमर्पण नसतो. शांततेचा अर्थ अन्याय सहन करणे नसतो. जिथे निर्दोषाला लक्ष्य केले जाते, तिथे ठाम भूमिका घेऊन प्रतिकार करणे हाच सहिष्णुतेचा खरा अर्थ आहे.

हिंदूंनी आणि समाजातील प्रत्येक सजग नागरिकाने संघटित व्हावे, कारण हिंदू संघटन हे कुठल्याही गैरहिंदूंच्या विरोधात नसून हिंदू समाज आणि सनातन संस्कृती यांच्या उत्कर्षासाठी उचललेले एक सकारात्मक पाऊल होय. असे करणे ही स्वाभिमानाची शिस्त आहे. सामाजिक जागृती म्हणजे उन्माद नव्हे; ती सत्याची मशाल आहे. सजग व्हावे, कारण सजगता म्हणजे कायद्याबाहेर जाणे नव्हे; तर कायद्याला बळ देणे आहे. विचारांनी, शब्दांनी आणि कृतींनी परंतु संविधानाच्या चौकटीत कट्टरतेला थोपवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

आपण इतिहासातून काही शिकणार आहोत का, की पुन्हा पुन्हा त्याच चुका करणार? ज्या आगी आज सीमापार पेटतात, त्या उद्या आपल्या अंगणात येऊ शकतात हे भाकीत नाही, हा अनुभव आहे. इकडे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित आहे ही लाट भारतात यायला वेळ लागणार नाही, आज बांगलादेशातील हिंदू जात्यात आहे तर भारतातला हिंदू सुपात आहे. आपला समाज स्वतःच्या घराला आग लागण्याची का वाट बघतो आहे? शेजारी लागलेली आग आज आपण विझवायला बाहेर आलो नाही तर उद्या तीच आग आपल्याही घराला लागू शकते तेव्हा आपण समाजाकडून काहीही अपेक्षा ठेवू शकणार नाही. म्हणूनच शिक्षण, संवाद, सामाजिक एकजूट आणि कायदेशीर ठामपणा या चार दिशांनी एकाच वेळी पावले टाकावी लागतील. पीडितांसाठी आवाज बुलंद करावा लागेल, असत्याचा मुखवटा फाडावा लागेल आणि मजहबी कट्टर जिहादी उन्मादाला चोख प्रत्युत्तर द्यावे लागेल.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

### रामदर्शनाने फरक पडेल

'संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध' हा २० डिसेंबरचा अग्रलेख वाचला. २०१४ पासून काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षनेत्यांना हिंदू धर्म आणि रामद्वेषाने एवढे पछाडलेले आहे की त्यांचे हे भूत उतरवणे सोपे नाही. हिरवा चष्मा घातलेल्या माणसाला जसे सगळे जग हिरवे दिसते, तसेच रामद्वेषाची कावीळ झालेल्या विरोधी पक्षांना सगळीकडेच प्रभू श्रीराम दिसू लागले आहेत. त्यांचा हा रोग पराकोटीचा वाढला आहे. एखाद्या योजनेला बापूंचे किंवा गांधी नेहरू परिवारातील एखाद्या सदस्याचे नाव दिले की भ्रष्टाचार करणाऱ्यांना भ्रष्टाचाराचे कुरण चरायला मोकळे मिळते, अशी सवय झालेल्या भ्रष्टाचाऱ्यांना प्रभू श्रीराम यांचे नाव कसे चालेल? कोणत्याही विषयावर संसदेत गोंधळ घालून करदात्यांचे पैसे वाया घालवणे एवढेच काम विरोधकांना राहिलेले आहे.

यावर एक उपाय सुचवावासा वाटतो. लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्वच विरोधी पक्षनेत्यांनी एकदा अयोध्येला जाऊन प्रभू श्रीराम यांचे मनोभावे दर्शन घेतले तर काही नेत्यांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडू शकतो. ते करूनही जर काही बदल घडला नाही तर विरोधी पक्षनेते जन्मोजन्मीचे कपाळकरंटे, कर्मदरिद्री आणि गलितगात्र आहेत असे समजून, त्यांच्या सगळ्या तमाशांकडे सरकारने संपूर्ण दुर्लक्ष करावे. कोणत्याही विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या वक्तव्यांना किंमत देऊ नये, प्रतिसाद देऊ नये आणि जनहितार्थ कामांसाठी संसदीय अधिवेशनाच्या वेळेचा सदुपयोग करावा. 'साथ दोगे तो साथ लेकर वरना तुम्हारे बगैर' हे धोरणच सद्यस्थितीत सरकारला साहाय्यभूत ठरेल.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जन संगोष्ठीतून लोकांचे मत परिवर्तन शक्य

समाजात परिवर्तन झाल्याशिवाय समाज एकसंध कसा होईल? राष्ट्र सामर्थ्यशाली कसे बनेल? यासाठी काही तथ्ये आणि पथ्याचे भान ठेवणे तितकेच गरजेचे ठरते. समाजाकडून योग्य दिशेने आणि प्रामाणिकपणे सत्य प्रयत्न करण्यामुळेच समाजातील तेढ कमी होईल. यासाठी योग्य दिशेने समाजात परिवर्तन झाले, नागरिकांमध्ये कर्तव्य जाणीव झाली पाहिजे. स्वदेशी तत्त्वांचे पालन करायला पाहिजे. मात्र हे स्व पासून सुरुवात केल्याशिवाय अशक्य आहे. प्रत्येक नागरिक आपल्या हक्काबद्दल सजग असतोच ना! ही तथ्ये विचारात घेतली, तरी प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करायला नको का? नागरिकांच्या कर्तव्याच्या संदर्भात उदाहरणादाखल राष्ट्रीय कर्तव्य समजून मतदान करणे आवश्यक आहे. यातच खरे नागरिकत्व दडले आहे. नागरी कर्तव्याची जाणीव झाल्याशिवाय कुटुंब प्रबोधनाचे खरे कार्य कसे करता येईल? खरे तर आपण संस्कृतीचे रक्षक असल्यामुळे तिचे रक्षण करणे हे आद्य कर्तव्य समजायला पाहिजे. यासाठीच कुटुंबाचे प्रामाणिकपणे प्रबोधन करणे आवश्यक असते. याचमुळे कुटुंबाला समाज जीवनाची शाश्वत पाठशाळा म्हटले आहे. परंतु कुटुंब प्रबोधनाची सुरुवात स्व पासून झाली पाहिजे. कुटुंबात जाणीव जागृती झाल्यास समाजातील द्वेष, तिरस्कार मत्सर, कमी होऊन कुटुंब खऱ्या अर्थाने समाज जीवनाची पाठशाळा बनेल आणि ती बळकट आणि मजबूत राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. आणि हे स्व प्रबोधनांसोबत दुसऱ्यांना सहकार्य करणे देशनिष्ठा ठरेल.

**प्रा. कमलाकर हणवंते**/९४२३६५४२८६

### मानसिक आरोग्यासाठी ध्यानधारणा

आज २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक ध्यान दिन संपूर्ण जगात साजरा केला जावा, या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघात मसुदा तयार करून प्रस्तावासाठी पाठविण्यात आला होता. लिकेस्टिन, श्रीलंका, नेपाळ, मेक्सिको आणि एडेरा या देशांच्या समूहाने १९३ सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत जागतिक ध्यान दिवस या शीर्षकाच्या प्रस्तावाला सर्वानुमताने पारित करण्यासाठी प्रयत्न केले होते. शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने ध्यान हे मानवी जीवनासाठी अत्यंत गरजेचे आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक विश्रांती, मानसिक आणि भावनिक शांतीसाठी ध्यान करणे हितावह ठरते. ध्यानामुळे चिंता, नैराश्य, रक्तदाब कमी करणे, शारीरिक वेदनेवर मात करणे किंवा



व्यवस्थापित करण्यासाठी ध्यान मोलाची भूमिका बजावते. ध्यान केवळ विश्रांतीसाठीच नव्हे, तर जीवनाला एक नवीन दिशा देण्यासाठी आवश्यक आहे. ध्यानाच्या नियमित सरावामुळे आपले मन वर्तमानावर केंद्रित राहते आणि भविष्यकाळातील चिंतेपासून दूर राहता येते. जीवनातील नैराश्य आणि स्ट्रेस आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि मानसिक शांती मिळविण्यासाठी आणि नियमितपणे ध्यान करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. ध्यानामुळे निव्वळ वैयक्तिक फायदाच नव्हे तर ध्यान सहानुभूती, सहयोग आणि सामाजिक उद्देशांची भावना वृद्धिंगत करते, असे जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे. म्हणून गतवर्षीपासून २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो.

बदलती जीवनशैली व वाढत्या ताण-तणावामुळे आज आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते. या वाढत्या आत्महत्येवर समुपदेशनासोबतच मानसिक आरोग्यासाठी ध्यान करणे तेवढेच महत्त्वाचे ठरत असते. त्यामुळे शरीरातील कोर्टीसॉल या स्ट्रेस हार्मोनची पातळी कमी होते. ज्यामुळे मानसिक शांती लाभते. ध्यानामुळे सकारात्मक विचार वृद्धिंगत होतात. परिणामी नैराश्य ताणतणाव कमी होण्यास मदत मिळते. स्वतःच्या विचारांकडे आणि भावनांकडे तटस्थ पाहण्याची दृष्टी विकसित होते. आज मानसिक तणावामुळे आपल्या नियमित कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ध्यानधारणेसारखा दुसरा सुलभ मार्ग नाही. एकंदरीत ध्यानधारणा म्हणजे तुमचे मन एकाग्र करण्यासाठी किंवा शांत करण्यासाठी, जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करण्यासाठी; एक प्रक्रिया आहे. ज्यात श्वासांवर किंवा एखाद्या विशिष्ट गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाते. ज्यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि आत्मिक शांती व जागरूकता वाढते. म्हणूनच आपल्या देशात ध्यानाला आध्यात्मिक व हजारों वर्षांची पौराणिक काळात सुद्धा महत्त्वाचे स्थान होते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

## आजचे संघगीत-७९

रविवार, २१ डिसेंबर २०२५

### भारत अमुचा असे अम्हाला प्राणाहुनिही प्यार

भारत अमुचा असे आम्हाला प्राणाहुनिही प्यार
या देशाच्या कणाकणास्तव वाहिल शोणित धार ॥धृ॥

ब्रीद आमुचे जरी शांतिचे
इथे तळपती सूर्य क्रांतिचे
नसात खेळे रक्त शिवाचे
या भूमीवर दानवतेचे बीज न कधि रुजणार ॥१॥

ईश्वर अमुचा भोळा शंकर
क्षणात होइल परि प्रलयंकर
कंपित होइल धरणी, अंबर
हिमालयाच्या बर्फातुनही उफाळेल अंगार ॥२॥

विश्वबंधुता इथली शिकवण
मानवता हे इथले जीवन
दुष्टांचे परि येथे मर्दन
होतिल त्यांच्या समिधा जे जे येतिल करण्या वार ॥३॥

इतिहासाच्या पानोपानी
इथे स्फूर्तिच्या अक्षय खाणी
दुबळी नच ही भारत जननी
अणूअणूतुन इथे शक्तिचा-घडेल आविष्कार ॥४॥

# बोरामणीच्या माळरानावर सापडला दगडी 'चक्रव्यूह'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातून इतिहासकार आणि पुरातत्व विभागाला अचंबित करणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. बोरामणीच्या माळरानावर तब्बल १५ घेरे असलेला एक विशालकाय 'चक्रव्यूह' सापडला आहे. हा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा दगडी चक्रव्यूह असल्याचे मानले जात असून, हा चक्रव्यूह प्राचीन रोमच्या इतिहासाशी जोडला गेला असल्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत.

एका वन्यजीव निरीक्षण मोहिमेदरम्यान या चक्रव्यूहाचा शोध लागला आहे. 'नेचर कंजर्वेशन सर्कल' या संस्थेच सदस्य बोरामणी वनक्षेत्रात माळढोक पक्षी आणि लांडग्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. यातील काही सदस्यांना दगडांची एक विशिष्ट रचना दिसून आली. त्यांनी तात्काळ याची माहिती पुरातत्वशास्त्रज्ञ सचिन पाटील यांना दिली. या चक्रव्यूहाचा अभ्यास आता अभ्यासक करीत आहेत. सोलापुरातून काही तरी ऐतिहासिक ठेवा मिळाल्यास सोलापूरकरांसाठी तो अभिमानाचा क्षण असणार आहे.

# सोलापूर महानगरपालिका मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मतदान केंद्रांची यादी नागरिकांच्या माहितीसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर http://www.solapurcorporation.org उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच, ही यादी सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व विभागीयकार्यालयांमध्येनागरिकांना पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदारांनी आपल्या प्रभागातील मतदान केंद्राचे ठिकाणाची पूर्वकल्पना याकरिता महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ही यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ यशस्वी, शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने पार पाडण्यासाठी सर्व मतदारांनी प्रशासनास सहकार्य करावे. आपल्या मतदानाच्या हक्काचा अवश्य उपयोग करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Farhat Sultana Abubakar Kadtal** HAS BEEN CHANGED TO **Farhat Gani Patel** Resi. - 93, Siddheshwar Nagar, 5 Majrewadi, Solapur North, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (60938 Dtd.19.12.2025)**

**ॲड. प्रसाद कि. अग्रिहोत्री**
**सोलापूर.**
नि. ६

## लिगल हेअरशीप प्रमाणपत्र जाहीर प्रसिध्दिकरण

कोर्टाचे नांव:- श्रीमती. एस.ए.आर. सय्यद सो
पुढील तारीख. २२/०१/२०२६
सि.कि.अर्ज क्र. ९३४/२०२५

### सोलापूर येथील मे. ३ रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात

**(एस.ए.आर. सय्यद)**

**शिवमंगला बसवराज हिप्परगी** **-- अर्जदार**
**विरुध्द**
१) शिवशंकर सिद्राम बुधाळकर
२) कलावती नागेश माळगे **-- सामनेवाले**
३) वंदना चंद्रशेखर कापसे
४) शिवलिंगम्मा म्हांतय्या कळ्ळीमठ

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मयत कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसदार या नात्याने लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

**१) मिळकतीचे वर्णन :**

अ) डि व सब डि सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. ३३/अ, त्यावर इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित त्यातील प्लॉट नं. सी-४३, इंदिरा नगर, विजापूर रोड, सोलापूर त्यांसी क्षेत्र २७०० चौ. फुट (२.५०.९३ चौ.मी.) त्यावर तळमजल्यावर व्हरांडा तीन खोल्या, पहिल्या मजल्यावर तीन खोल्याची रहिवासी मिळकत त्यांसी म्यु.पल मिळकत क्र. ३०२०९० त्यामध्ये स्वतंत्र विद्युत कनेक्शनसहची मिळकत.

ब) इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सोलापूर सोसायटी सभासद/भाग दाखला.

२) वर नमुद मिळकतीचे व कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे अर्जदार व सामनेवालाने १ ते ४ हे वारसदार असल्याचे सांगुन त्यांनी त्यासंदर्भात (लिगल हेअरशिप) वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रकरण दाखल केलेले आहे.

३) त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने लिगल हेअरशिप सर्टिफिकेट देण्यास कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आंत किंवा नेमलेली तारीख दि. २२/०१/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात गुणवत्तेवर आधारीत अर्जावर पुढील योग्य न्याय निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आज दिनांक. १९/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर**

**ॲड. प्रसाद कि. अग्रिहोत्री**
**सोलापूर.**
नि. ६

## वारस प्रमाणपत्र जाहीर प्रसिध्दिकरण

कोर्टाचे नांव:- श्रीमती. एस.ए.आर. सय्यद सो
पुढील तारीख. २२/०१/२०२६
सि.कि.अर्ज क्र. ९३५/२०२५

### सोलापूर येथील मे. ३ रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात

**(एस.ए.आर. सय्यद)**

**शिवमंगला बसवराज हिप्परगी** **-- अर्जदार**
**विरुध्द**
१) शिवशंकर सिद्राम बुधाळकर
२) कलावती नागेश माळगे **-- सामनेवाले**
३) वंदना चंद्रशेखर कापसे
४) शिवलिंगम्मा म्हांतय्या कळ्ळीमठ

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मयत कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसदार या नात्याने लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

१) अर्जदाराचे मामा कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे मृत्युवेळी त्याचे नावावर खालील जंगम मालमत्ता होती.

**अ) बँक खाते शिल्लक रक्कमा :**

| अं. क्र | बँकेचे नांव | खाते क्रमांक | खातेदाराचे नांव | खातेप्रकार | खात्यावरील शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक सोलापूर, जुळे सोलापूर शाखा | २०९४०००८७९ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी | बचत खाते (वैयक्तिक) | २,०५,२३६/- |
| २ | सेंट्रल बँक सोलापूर, जुळे सोलापूर शाखा | २०९३९४६६६८ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी, कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे संयुक्त खाते | बचत खाते (संयुक्त) | ३३,९२,४४२/- |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर जुळे सोलापूर शाखा | २००१६७४१४१० | कै. संगप्पा शरणाप्पा हिप्परगी व कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे संयुक्त खाते | बचत खाते (संयुक्त) | १२,५८२.४६/- |
| ४ | सोलापूर जनता सहकारी बँक, | ५८७०१२२०००० ११९६७ | कै . संगप्पा शरणप्पा हिप्परगी | वैयक्तिक बचत खाते | २२,४८५.६५/- |

**ब) शेअर्स सर्टिफिकेट : सोलापूर जनता सहकारी बँक लि. सोलापूर**

| अं. क्र | भागधारकाचे नांव | सभासद क्रमांक | भागदाखला क्रमांक | भाग संख्या | भाग क्रमांक | भाग रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी | २९५५३ | ४३४७४ | १०० | १३५४८२० ते १३५४९१९ | ५,०००/- |
| २ | कै. जयश्री संगप्पा हिप्परगी | २९५५४ | ४३४७५ | १०० | १३५४९२० ते १३५५०१९ | ५,०००/- |

**क) वाहनः** खाली नमुद वाहन हे कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे नांवे होती त्याचे वर्णन खालीप्रमाणे :

| Sr. No. | Make | Model | Engine Number | Chassis Number |
|---|---|---|---|---|
| 1 | Maruti | Maruti Omini 8 Seater | 3810395 | M3EVB11500861330 |

२) वर नमुद मिळकतीचे व कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे अर्जदार व सामनेवाला हे वारसदार असल्याचे सांगुन त्यांनी त्यासंदर्भात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रकरण दाखल केलेले आहे.

३) त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आंत किंवा नेमलेली तारीख दि. २२/०१/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात गुणवत्तेवर आधारीत अर्जावर पुढील योग्य न्याय निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आज दिनांक. १९/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर**

## बेवारस मोटारसायकलसाठी पंधरा दिवसात संपर्क करा

**बार्शी, दि. २० डिसेंबर-**

बार्शी शहर पोलीस ठाणे येथे ३४ बेवारस मोटारसायकल वाहने मिळुन आलेले आहेत. सदरच्या वाहनाच्या मालकीबाबत माहिती घेतली असता माहिती मिळून आलेली नाही. या मोटरसायकली ज्यांच्या असतील त्यांनी बार्शी पोलिस ठाण्याशी पंधरा दिवसात संपर्क साधावेत, असे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले. बऱ्याच वर्षांपासून सदरची वाहने बार्शी शहर पोलिस ठाणे येथे पडून आहेत. पोलिस ठाणे येथे वाहन ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहेत. सदर वाहनांच्या मालकांचा शोध घेवून त्यांना परत करावयाचे आहेत. यामध्ये पुणे, धाराशिव, पंजाब, तामिळनाडू, ओडिसा अशा निरनिराळ्या ठिकाणच्या गाड्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर वाहनाची यांदी पोलीस ठाणे येथील नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. वाहनाची मालकांनी वाहनाबाबतचे कागदपत्रासह पोलीस ठाणे येथे हजर राहून अर्ज करावा. याबाबत काही माहिती पाहिजे असल्यास पुढील कमांकावर संपर्क करण्यात यावा. बार्शी शहर पोलीस ठाणे कमांक ०२१८४-२२३३३३, सचिन कदम पोलीस हवालदार मो. नं. ८६६९५०२२९६.

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४ / २६२२९३३

### नमुना झेड

(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)
स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर c/o श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (धकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणार्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकत बाबत जप्तीची नोटीस देवून या पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्यानि त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणी सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ क्रं. | कर्जदार / जामिनदाराचे /मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिसनं / गट नं / क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा |
|---|---|---|---|---|
| १ | अंकित अशोक लुणावत व पायल अमित जैन (पार्श्वनाथ इंजिनिअर्स, प्रोप्रा. अंकित अशोक लुणावत कर्जदार व जामीनदार | डी. व सब डी. सोलापूर ता. उत्तर सोलापूर मौजे खेड हद्दीतील मिळकती | १. गट नं.३१/२ यांसी क्षेत्र ०.८२.०० हे. आर. चौ.मी. आकार १.६५<br>२. गट नं.३३ यांसी क्षेत्र २.०५.०० हे. आर.चौ.मी. आकार ३.४४ अंकित अशोक लुणावत व पायल अमित जैन यांच्या हिश्यावर | १०.०३.२०२५<br>३०.१०.२०२५<br>रु.२,७५,९५,६३५/-<br>दि. ३०.०६.२०२५ अखेर येणे बाकी |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडून या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून संपूर्ण थकबाकी भरून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे नं केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ३०/१०/२०२५**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर**

## जाहीर समन्स

### मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर, जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** **-- अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर
**विरूध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार**

| अ. नं. | केस नं. | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८१५/२५-२६ | ७३,१३३/- | १ | सरिता भीमराव कोगले<br>रा. कोगले वस्ती, मु पोस्ट कोन्हेरी, ता. मोहोळ, सोलापूर |
| २ | ८१६/२५-२६ | ८५,०१६/- | १<br>२<br>३ | स्वामी पुष्पा नागेश<br>रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>पार्वती नितीन शेळके<br>रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>वैशाली विनायक झुंजारे<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर |
| ३ | ८१७/२५-२६ | ५८,४१७/ | १<br>२<br>३ | झुंजारे सुरेखा विश्वास<br>रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>रेखा नवनाथ रणदिवे<br>रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>गोदावरी बाबा भिसे<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ४ | ८१८/२५-२६ | ७३,२१७/- | १<br>२<br>३ | रणदिवे रेखा नवनाथ<br>रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुरेखा विश्वास झुंजारे<br>रा.मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>गोदावरी बाबा भिसे<br>रा.मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ५ | ८२०/२५-२६ | ६३,२८५/- | १<br>२<br>३ | पोपसभट रुपाली चंद्रकांत<br>रा. कुंभारखानी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>गीता सीताराम कोळी<br>रा. गायकवाड गल्ली, मोहोळ, ता. मोहोळ, सोलापूर.<br>संगीता शिवाजी पाटील<br>रा. समर्थ नगर, मु पोस्ट मोहोळ, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ६ | ८२४/२५-२६ | ८५,१४२/- | १<br>२<br>३<br>४ | शेख खाजाबी हुसेन<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शालन सुखदेव सावंत<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>राबिया युनुस शेख<br>रा. लवटे गल्ली, मु पोस्ट विचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>नाजमीन आजम शेख<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर, |
| ७ | ८२५/२५-२६ | ८३,३७४/- | १<br>२<br>३<br>४ | शेख नाजमीन आजम<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शालन सुखदेव सावंत<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>राबिया पुनुस शेख<br>रा. लवटे गल्ली, मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>खाजाबी हुसेन शेख<br>रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ८ | ८२६/२५-२६ | ७८,०१५/- | २<br>३ | असराबी चांद तांबोळी<br>रा. मु पोस्ट खैराव, ता. माढा, सोलापूर<br>सुनिता अनिल नागटिळक<br>रा. मु पोस्ट खैराव, ता. माढा, सोलापूर |
| ९ | ८२७/२५-२६ | ७३,१०९/- | १<br>२<br>३<br>४ | इनामदार आरिफा जुबेर<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर,<br>राणी सुनील पवार<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुनिता मच्छिंद्र साळी<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर<br>असिफा फारुख इनामदार<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर, |
| १० | ८२८/२५-२६ | ७६,८०९/ | १<br>२<br>३<br>४ | इनामदार असिफा फारुख<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर<br>राणी सुनील पवार<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता मच्छिंद्र साळी<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर.<br>अरिफा जुबेर इनामदार<br>रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ११ | ८२९/२५-२६ | ८६,३४५/- | २<br>४ | अनिशा दगडू शेख<br>रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर<br>जयश्री सिकंदर धोत्रे<br>रा. गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १२ | ८३०/२५-२६ | ७९,५१४/- | १<br>४ | शेख अनिशा दगडू<br>रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>जयश्री सिकंदर धोत्रे<br>गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १३ | ८३२/२५-२६ | ९०,८१४/- | १<br>२ | धोत्रे जयश्री सिकंदर<br>रा. गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर<br>अनिशा दगडू शेख<br>रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १४ | ८३३/२५-२६ | ५२,०४१/- | १<br>२<br>३<br>४ | माने विद्या अनिरुद्ध<br>मु पोस्ट सौंदाणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>मनिषा राजाराम माने<br>रा. मु सौंदणे, पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>उमा सुरेंद्र माने<br>मु पोस्ट सौंदाणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>राजामती नामदेव माने<br>मु सौंदणे, पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर |
| १५ | ८३४/२५-२६ | ५१,४४६/- | १<br>२<br>३<br>४ | पाचफुले सुनिता केशव<br>मु पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>निशा दिपक मिसाळ<br>रा. मु यल्लमवाडी, पोस्ट देगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता निवृत्ती भोमाले<br>रा. मु यल्लमवाडी, पोस्ट देगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>वर्षा लहू देवकर<br>रा. मु पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १६ | ८३५/२५-२६ | ५३,१३८/- | १<br>२<br>३ | माने सोनाली अरुण<br>मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>रंजना लहू माने<br>माने वस्ती, मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुरेखा कृष्णदेव माने<br>रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १७ | ८३६/२५-२६ | ५५,२८८/- | १<br>२<br>३ | माने रंजना लहू<br>रा. माने वस्ती, मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सोनाली अरुण माने<br>रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुरेखा कृष्णदेव माने<br>रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १८ | ८३७/२५-२६ | ५२,५६१/- | १<br>२<br>३ | जाधव अश्विनी श्रीकांत<br>रा. मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>मंगल बजरंग जाधव<br>रा. मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुलन श्रीरंग जाधव<br>रा. जाधव वस्ती, वरवडे रोड, मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १९ | ८३८/२५-२६ | ८०,२०७/- | १<br>२<br>३ | भोसले शितल अमोल<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शशीकला शाहू उन्हाळे<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुनिता तुकाराम आगलावे<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| २० | ८३९/२५-२६ | ८०,७४३/- | १<br>२<br>३ | उन्हाळे शशीकला शाहू<br>रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शितल अमोल भोसले<br>रा.मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता तुकाराम आगलावे<br>रा.मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| २१ | ८४०/२५-२६ | ६२,८४४/- | १<br>२<br>३ | यमगर कलावती विष्णु<br>रा. मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनंदा विलास बटाने<br>रा. मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर<br>छाया सुरेश वाघमारे<br>रा. उखळे वस्ती, मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर |
| २२ | ८४१/२५-२६ | ५५,१४१/- | १<br>३<br>५ | वैशाली उत्तरेश्वर सिरसट<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>अत्त्यार सिकंदर मुलानी<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर<br>तुळसाबाई विष्णू शितोळे<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर. |
| २३ | ८४२/२५-२६ | ६०,९०२/- | २<br>४<br>५ | वैशाली उत्तरेश्वर सिरसट<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>अत्त्यार सिकंदर मुलानी<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>तुळसाबाई विष्णू शितोळे<br>रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर. |
| २४ | ८४३/२५-२६ | ६१,२२३/- | १<br>२<br>३ | सुरवसे वर्षा सखाराम<br>रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर<br>सिंदु सुमंत सुरवसे<br>रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>लक्ष्मी ज्ञानेश्वर सुरवसे<br>रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर, |
| २५ | ८४४/२५-२६ | ५१,५५८/- | १<br>३<br>४ | सिरसट सोनाली श्रीकांत<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>कमल गणपत सिरसट<br>रा. १७८, मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>उर्मिला लक्ष्मण भोसले<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २६ | ८४५/२५-२६ | ५२,८२२/- | १<br>२<br>३<br>४ | भोसले संध्या प्रभाकर<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>बिस्मिला ईसाक शेख<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>अश्विनी नानासाहेब सिरसट<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>लतिका ज्ञानेश्वर सिरसट<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २७ | ८४६/२५-२६ | ६१,१८१/- | १<br>२<br>३<br>५ | सिरसट कालिंदा राजेंद्र<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>स्वप्नाली संतोष नागाळे<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>सरस्वती दत्तात्रय वाघ<br>रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>संगिता रमेश दुधाळे<br>स. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २८ | ८४७/२५-२६ | ५५,७३२/- | १<br>२<br>३<br>४ | देशमुख कल्पना शरद<br>रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>विद्या प्रफुल्लित दगडे<br>रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर,<br>अनिता हनुमंत पवार<br>रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>अस्मिता नितीन आतकरे<br>रा. वीरूदेव गल्ली जवळ मु. देऊळगाव ता. मोहोळ जि. सोलापूर |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे परंतू जाव देणार समन्स रूजू न झाल्याने /त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दि. ०६.०१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला -बचाव रदद् समजण्यात येईल.

म्हणून दिनांक २०/१२/२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

**शिक्का**

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅक्स्**
**को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

**भाग - ३५**

### जोरात धावण्यापेक्षा हुशारीने धावणे महत्त्वाचे



ऑलम्पिकचे सुवर्णपदक विजेते व प्रशिक्षक अमेरिकेचे जॅक डॅनियल्सचे नियम सांगतात की हुशारीने धावणे हे जोरात धावण्यापेक्षा महत्त्वाचे आहे. योग्य गती, सातत्य, आणि रिकव्हरी यामुळे दीर्घकाळ चांगली कामगिरी करता येते आणि दुखापती टाळता येतात.

**डॅनियल्सचे १२ धावण्याचे नियम**

१. सध्याच्या फिटनेसप्रमाणे सराव करा. तुमचा सराव हा तुमच्या आजच्या फिटनेसवर आधारित असावा. पूर्वीची कामगिरी किंवा भविष्यातील लक्ष्य लक्षात घेऊन जास्त ताण दिल्यास दुखापत होऊ शकते.
२. सातत्य हे तीव्रतेपेक्षा महत्त्वाचे कधीकधी खूप जोरात धावण्यापेक्षा नियमित आणि सातत्यपूर्ण सराव केल्याने जास्त प्रगती होते.
३. इझी रन खरंच इझी असावेत बहुतेक धावा आरामात, बोलता येईल अशा गतीने असाव्यात. यामुळे एरोबिक क्षमता वाढते आणि शरीराची रिकव्हरी होते.
४. हार्ड सेशनला उद्देश असावा टेम्पो, इंटरव्हल किंवा लाँग रन हे ठराविक उद्देशानेच असावेत. विनाकारण कठीण सराव टाळावा.
५. सरावात कधीही रेस करू नका सराव हा तयारीसाठी असतो, स्पर्धे साठी नाही. पूर्ण ताकद रेस डे साठीच राखून ठेवा.
६. अंतर आणि वेग हळूहळू वाढवा अचानक किलोमीटर किंवा वेग वाढवल्यास दुखापतीचा धोका वाढतो. प्रगती नेहमी टप्प्याटप्प्याने असावी.
७. रिकव्हरीला महत्त्व द्या खरी प्रगती सरावानंतर विश्रांतीत होते. विश्रांतीचे दिवस आणि इझी रन अत्यंत आवश्यक आहेत.
८. सर्व ऊर्जा प्रणालींचा सराव करा इझी रन, टेम्पो रन, इंटरव्हल आणि लाँग रन सगळ्यांचा समतोल सराव केल्याने संपूर्ण फिटनेस तयार होतो.
९. लाँग रनचा उद्देश सहनशक्ती आहे, वेग नाही. लाँग रन आरामात आणि नियंत्रित गतीने असावा. त्याचा उद्देश इंडुरंस वाढवणे हा आहे.
१०. परिस्थितीनुसार सराव बदला उष्णता, दमट हवामान, चढ-उतार यानुसार गती कमी-जास्त करा. अहंकाराने धावू नका.
११. खरा वेग एरोबिक फिटनेसने येतो. फक्त जलद धावल्याने वेग वाढत नाही. मजबूत एरोबिक बेस तयार केल्यावरच खरा वेग येतो.
१२. शरीराचे ऐका दुखणे, जास्त थकवा किंवा कामगिरीत घसरण दिसल्यास सराव कमी करा. दुखापत होण्याआधीच काळजी घ्या.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

## पाकिस्तान हॉकी संघाचा व्यवस्थापक अडचणीत

**कराची** : वरिष्ठ पाकिस्तान हॉकी संघासोबत अर्जेंटिनामध्ये एफआयएच प्रो-लीगसाठी व्यवस्थापक म्हणून गेलेले ऑलिम्पियन हॉकीपटू अंजुम सईद, रिओ डी जनेरियो विमानतळावर विमानात इंधन भरत असताना विमानात धूम्रपान केल्याबद्दल ब्राझीलमध्ये विमानातून उतरवल्यानंतर अडचणीत सापडले आहेत. जेव्हा विमान इंधन भरण्यासाठी ब्राझीलमध्ये थांबले होते, तेव्हा अंजुम एका पाकिस्तानी खेळाडूसह धूम्रपान करताना आढळले, त्यानंतर त्यांना दुबईला जाणाऱ्या विमानात चढण्याची परवानगी नाकारण्यात आली. अंजुम यांना व्यवस्थापक म्हणून अर्जेंटिनाला पाठवण्यात आले होते, परंतु या आठवड्यात घरी परतल्यानंतर, ते आता दावा करत आहेत की दुबईतील काही वैयक्तिक कामामुळे ते संघासोबत परत आले नाहीत. परंतु पाकिस्तान क्रीडा मंडळाने पाकिस्तान हॉकी महासंघाला या घटनेची स्वतंत्र चौकशी करण्यास सांगितले आहे.

# गिलला वगळले; ईशान, रिंकूला पाचारण

◆ **मुंबई, २० डिसेंबर**

प्रतिष्ठेपेक्षा कामगिरीला महत्त्व देण्याचा धाडसी निर्णय घेत राष्ट्रीय निवड समितीने शनिवारी शुभमन गिलला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघातून वगळले आणि यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशन व रिंकू सिंगला संघात परत बोलावले.

मुंबईत झालेल्या निवड समितीच्या बैठकीतील गिलला वगळण्याचा निर्णय सर्वात लक्षवेधी आहे, तरीही त्याचा सध्याचा फॉर्म पाहता तो फारसा आश्चर्यकारक नव्हता.

कसोटी व वन-डे सामन्यांमध्ये भारताच्या सर्वात सातत्यपूर्ण फलंदाजांपैकी एक असूनही, गिलला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये, विशेषतः सलामीवीर म्हणून आपली जागा पक्की करता आलेली नाही. संघ व्यवस्थापन आता धावा जमा करण्याऐवजी प्रभावी सुरुवातीला प्राधान्य देत आहे.

पॉवरप्लेमधील त्याच्या संथ स्ट्राइक रेटची चिंता व अधिक स्फोटक पर्यायांचा उदय यामुळे त्याच्या विरोधात निर्णय गेल्याचे दिसते. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांमध्ये केवळ ४, ० आणि २८ धावा केल्या.

शुभमन गिल सध्या धावा काढण्यात अपयशी ठरत आहे व त्याने गत विश्वचषकातही भाग घेतला नव्हता, असे निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

याउलट, ईशान किशनच्या पुनरागमनातून निवडकर्त्यांनी डावखुरा-उजवा फलंदाज संयोजन आणि वरच्या फळीतील आक्रमक यष्टीरक्षक-फलंदाजांवर पुन्हा एकदा भर दिल्याचे दिसून येते.

**टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर**



तंदुरुस्ती व उपलब्धतेच्या समस्यांमुळे या वर्षातील बराच काळ संघाबाहेर असलेल्या ईशान किशनने अलीकडील सय्यद मुश्ताक अली चषकामध्ये प्रभावी कामगिरी केली व एका शानदार शतकाच्या जोरावर झारखंडला विजेतेपद मिळवून दिले.

हा गिलच्या फॉर्मचा प्रश्न नाही. आम्हाला वरच्या फळीत एक यष्टीरक्षक हवा होता, असे कर्णधार सूर्यकुमारने गिलला वगळण्याबद्दल सांगितले.

**जयस्वाल, जितेश शर्मा बाहेर**

किशनच्या समावेशामुळे प्रतिभावान यशस्वी जयस्वालला संघाबाहेर राहावे लागले, तर जितेश शर्मानेही संघातले आपले स्थान गमावले.



भारताने अव्वल आणि मधल्या फळीत फलंदाजीची ताकद वाढवली आहे. सूर्यकुमार, तिलक वर्मा व किशन यांच्यासोबत अभिषेक शर्माची निवड केली आहे, तर रिंकू सिंगच्या उपस्थितीमुळे भारताची एका विशेष फिनिशरवरील वचनबद्धता कायम आहे. रिंकू दबाव सहन करून अखेरच्या षटकांमध्ये जोरदार फटकेबाजी करू शकतो.

अष्टपैलू खेळाडूंची खोली हे संघाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हार्दिक पांड्या पुन्हा एकदा अंतिम एकादशचा समतोल साधण्याची जबाबदारी सांभाळेल, त्याला शिवम दुबेची साथ मिळेल. दुबेची फिरकी गोलंदाजांना लक्ष्य करण्याची क्षमता एक मोठी संपत्ती बनली आहे, आणि अक्षर-वॉशिंग्टन सुंदर ही जोडी वैविध्य, नियंत्रण व फलंदाजीची खोली प्रदान करेल. ◀(वृत्तसंस्था)

### गोलंदाजीत अनुभव-प्रयोगाचा मेळ

गोलंदाजी विभागात अनुभव व प्रयोग यांचा मेळ आहे. जसप्रीत बुमराह अर्शदीप सिंगसोबत वेगवान गोलंदाजीच्या आक्रमणाचे नेतृत्व करेल. अर्शदीप हा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचा सर्वात विश्वासार्ह डावखुरा गोलंदाज आहे.

हर्षित राणाच्या समावेशामुळे भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन दिसून येतो, यात निवडकर्त्यांनी वेग व उसळीला एक वेगळे वैशिष्ट्य म्हणून पाठिंबा दिला आहे. फिरकीची जबाबदारी कुलदीप यादव व वरुण चक्रवर्तीवर असेल, ही जोडी फिरकीची चतुराई व रहस्य प्रदान करते. ही जोडी विशेषतः खडबडीत खेळपट्ट्यांवर मधल्या षटकांमध्ये प्रभावी ठरते. वॉशिंग्टन सुंदर व अक्षर पटेल आवश्यक असलेली अष्टपैलुत्व आणतात. ■

### भारतीय क्रिकेट संघ असा-

सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल (उपकर्णधार), कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, ईशान किशन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग.


## संघात स्थान न मिळालेले खेळाडू

◆ **मुंबई, २० डिसेंबर**

मुंबईत टी-२० विश्वचषकासाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा झाल्यानंतर काही मिनिटांतच समाज माध्यमावर प्रश्न, गोंधळ आणि निराशेचा कल्लोळ माजला. प्रत्येक विश्वचषक संघाच्या निवडीमध्ये काही कठीण निर्णय घ्यावे लागतात, परंतु या निवडीमुळे इतर निवडींपेक्षा जास्त चर्चा झाली. पात्रतेचा दावा असलेले अनेक खेळाडू संघाबाहेर राहिले, जे थोडक्यात संधी हुकल्यामुळे दुर्दैवी ठरले.

**जितेश शर्मा** : विदर्भाच्या जितेश शर्माच्या वगळण्याइतका गोंधळ कदाचित इतर कोणत्याही गोष्टीमुळे निर्माण झाला नाही. या यष्टीरक्षक-फलंदाजाने भारताच्या टी-२० संघात आपले स्थान पक्के केले होते, सध्या, जितेश आधी संघात होता आणि त्याने खरं तर काहीही मोठी चूक केलेली नाही, असे आगरकरने स्पष्ट केले. जितेशच्या वगळण्याचा निर्णय पचायला अधिक कठीण जाण्याचे कारण म्हणजे त्याचा अलीकडचा फॉर्म आहे. त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी आयपीएल विजेतेपदाच्या मोहिमेदरम्यान प्रभावी कामगिरी केली. या कामगिरीमुळे त्याचे विश्वचषकातील स्थान निश्चित झाले आहे, असा विश्वास होता.

त्याऐवजी, निवडकर्त्यांनी संजू सॅमसन व ईशान किशन यांची दोन यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून निवड केली. २०२५ च्या सय्यद मुश्ताक अली चषकांत झारखंडसाठी ईशानच्या उत्कृष्ट देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीमुळे पारडे त्याच्या बाजूने झुकले.



जितेश शर्मा

**शुभमन गिल** : उपकर्णधार आणि भारताच्या मर्यादित षटकांच्या योजनांमधील शुभमन गिल हा एक महत्त्वाचा खेळाडू, त्याच्या अनुपस्थितीनेच बातम्यांमध्ये वर्चस्व गाजवले. हा गिलच्या गुणवत्तेबद्दलचा निर्णय नसून, संघाच्या संतुलनामुळे घेतलेला एक सामरिक निर्णय होता,

**यशस्वी जयस्वाल** : यशस्वी जयस्वालच्या निवडीकडे दुर्लक्ष झाले तरीही हा युवा सलामीवीर मागील विश्वचषक संघाचा भाग होता.

**मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज** : भारताचे सर्वात अनुभवी वेगवान गोलंदाज- मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज - यांना टी-२० विश्वचषक संघातून वगळण्याच्या निर्णयावर अनेक स्तरातून तीव्र टीका होत आहे.

**ऋतुराज गायकवाड** : भारताच्या टी-२० आंतरराष्ट्रीय संघाच्या योजनांमधून ऋतुराज गायकवाडच्या सततच्या अनुपस्थितीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत,

**श्रेयस अय्यर** : आयपीएलमधील प्रभावी कामगिरी करूनही, श्रेयस अय्यर जवळपास दोन वर्षांपासून भारतासाठी एकाही टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळलेला नाही. ◀(वृत्तसंस्था)

# महिलांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा आजपासून सोलापुरात

## जामश्री - इलिझियम सोलापूर ओपन : २०२५

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत महिलांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन २१ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे आयोजित केलेले आहे.

स्पर्धेची बक्षिस रक्कम ३०,०००/- अमेरिकन डॉलर असून स्पर्धेतील खेळाडूंना जागतिक मानांकन गुण देखील प्राप्त होणार आहेत. अशा प्रकारची अंतरराष्ट्रीय स्पर्धा सोलापूरात दहाव्यांदा भरविण्यात येत आहे. ही बाब सोलापूरसाठी अत्यंत अभिमानाची व प्रतिष्ठेची आहे. या स्पर्धेसाठी भारतासह १३ देशातुन एकूण ५६ महिला सहभागी होणार असुन यामध्ये २५ महिला खेळाडू या परदेशी आहेत.

सोलापूर व लगतच्या जिल्हयामध्ये लॉन टेनिस खेळाचा प्रसार व प्रचार व्हावा व सोलापूरचे नांव जागतिक पातळीवर व्हावे या उद्देशाने या स्पर्धा आयोजित केल्याचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय टेनीस फेडरेशनने पुण्याच्या शितल अय्यर व नितिन कन्नमवर यांची सामना पर्यवेक्षक तर राज्य संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांची सामना संचालक म्हणून नियुक्ती केलेली आहे.



या स्पर्धेसाठी पंच म्हणून अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेने श्रीराम गोखले (पुणे), श्रध्दा दलि (मुंबई), अमित देशपांडे (पुणे), पोन्नुसामी (चेन्नई), अतनु चक्रवर्ती (कलकत्ता), रिया चाफेकर (पुणे) यांची नियुक्ती केलेली आहे.

स्पर्धेसाठी फिजीओथेरपीस्ट निकिता चव्हाण (पुणे), आनंदी दवे (गुजरात), इव्हेंट मॅनेजर संध्याराणी बंडगर, दळणवळण समन्वयक पुजा संचेती, भोजन व्यवस्था सुनंदा पवार व संतोष पवार पाहणार आहेत. तर व्हेन्यु इंनचार्ज म्हणून सुधीर सालगुडे व पुजा सालगुडे काम पाहणार आहेत.

या स्पर्धेसाठी पुण्याच्या पुजा इंगळे व सोलापूरच्या पार्थसारथी मुंढे यांना मुख्य फेरीत तर सोलापूरच्या आकृती सोनकुसरे, युरोपस्थित (आईसलँड) कर्हाडच्या गरिमा काळुगडे व मुंबईच्या डॅनिका फर्नांडो यांना पात्रता फेरीत थेट प्रवेश देण्यात आला असल्याचे सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी जाहिर केले. स्पर्धेचा उदघाटन समारंभ सोमवार २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता एम राज कुमार , पोलीस आयुक्त , सोलापूर यांच्या शूभहस्ते व सुंदर अय्यर , अंतरिम महासचिव , अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना तसेच मानद सचिव महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेत उत्कृष्ट बॉल पिकरची सेवा बजावणा-या मुला-मुलींना भेटवस्तु देऊन गौरवण्यात येईल. स्पर्धेचे पात्रता फेरीचे सामने दि. २१ व २२ डिसेंबर रोजी तर मुख्य फेरीचे सामने दि. २३ ते २८ डिसेंबर पर्यंत सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत खेळिवले जातील.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी आली पंजवानी, मेहुल पटेल, ब्रिजेश गांधी, केशव रेड्डी, सुहास अदमाने, श्रीधर देवसानी, असिम सिंदगी, सुनिल मदन, राजेश पवार, अभिजित टाकळीकर, डॉ. वैभव मेरु, डॉ साजिद सय्यद, उज्वल कोठारी, परेश शहा, संतोष फाटक, सतीश भोसले यांचे सहकार्य लाभले.



# जागृती प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

जागृती विद्यामंदिर नेहरूनगर येथे क्रीडा सप्ताहास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

याचे उद्घाटन उत्तर सोलापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बापू जमादार, कुमठे केंद्राचे केंद्रप्रमुख वाघमोडे व तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विजयरत्न चव्हाण होते.

सर्वप्रथम ध्वजारोहण करून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांना प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून मानवंदना दिली. त्यानंतर खेळाडूंनी क्रीडा ज्योत घेऊन प्रमुख अतिथींना क्रीडाजोत समर्पित केले मैदानाची पूजा करून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थी खेळाडूंना विद्यार्थिनी पवित्रा पुजारी हिने क्रीडा शपथ दिली. प्रास्ताविकेत क्रीडाशिक्षक संतोष जाधव यांनी क्रीडा धोरण व प्रशालेतील क्रीडा विभागाचे कामकाज आणि खेळाविषयीचे महत्व याची माहिती दिली. शिक्षक एस. एस. कोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कुमठे केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. वाघमोडे यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना क्रीडा धोरण व खेळ यांचे महत्त्व पटवून दिले. क्रीडा धोरणानुसार राज्य पातळीवर राष्ट्रीय पातळीवर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या खेळाडूंना नोकरीमध्ये पाच टक्के आरक्षण असल्याबाबतची माहिती व तसेच पोलीस भरतीला अडीच इंच उंचीची सवलत या खेळाडूंना मिळते.

श्री. संगवे यांनी आपल्या मनोगतातून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर राज्यस्तरावर प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण मिळाले जातात याची माहिती सांगितली.प्रमुख उद्घाटक श्री. जमादार यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून देऊन सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य चव्हाण यांनी क्रीडा सप्ताह बाबत माहिती सांगून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा क्रीडा सप्ताह चे आयोजन करण्यात येतो आणि सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुकही मनोगतातून केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक संतोष जाधव यांनी केले. प्रा. श्रीयुत सगेल यांनी आभार मानले.

# धाराशिवचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत

## ६१ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : सोलापूरचे दोन्ही संघ पराभूत

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. २० डिसेंबर-**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत उपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट झाले आहे. महिला गटात धाराशिव विरुद्ध नाशिक आणि ठाणे विरुद्ध पुणे, तर पुरुष गटात धाराशिव विरुद्ध पुणे आणि मुंबई उपनगर विरुद्ध सांगली हे उपांत्य सामने रंगणार असून अंतिम फेरीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

महिला गटातील उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिवने मुंबई उपनगरचा १ डाव २३ गुणांनी (३३-१०) पराभव करत आपली ताकद सिद्ध केली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (४.१० मि. संरक्षण व २ गुण), मैथिली पवार (३.०० मि. संरक्षण), सुहानी धोत्रे (८ गुण), प्रणाली काळे (६ गुण), अश्विनी शिंदे (नाबाद १.५० व २.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयात निर्णायक भूमिका बजावली. मुंबई उपनगरकडून देविका अहिरे (१.१० मि. संरक्षण) आणि साक्षी वाफेलकर (१.२० व १.४० मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

महिलांच्या दुसऱ्या सामन्यात ठाण्याने सांगलीचा ८ गुण व ५.०० मिनिटे राखून पराभव केला. ठाण्याकडून धनश्री कंक (२.४५ मि. संरक्षण), साक्षी तोरणे (२.१९ मि. संरक्षण), गीतांजली नरसाळे (२.२० मि. संरक्षण), प्रियंका भोपी (१.४५ मि. संरक्षण), दीक्षा काटेकर (२ मि. संरक्षण) यांनी भक्कम कामगिरी केली. सांगलीकडून स्वप्नाली तामखडे (१.२० मि. संरक्षण), दीक्षा पाटील (१.१५ मि. संरक्षण), प्रतीक्षा बिराजदार (२, १.२० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी सामन्यात चुरस निर्माण केली.

महिलांच्या तिसऱ्या सामन्यात पुणे संघाने अहिल्यानगरचा १ डाव ४१ गुणांनी (५१-१०) पराभव केला. पुण्याकडून दिपाली राठोड (४.०० मि. संरक्षण व १० गुण), भाग्यश्री बडे (२.५० मि. संरक्षण व २ गुण), श्वेता वाघ (३.०० मि. संरक्षण व ४ गुण), साक्षी वसावे (२.४० मि. संरक्षण), श्वेता नवले (२.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चमकदार खेळ केला. अहिल्यानगरकडून भाग्यश्री उबळे व समीक्षा माळी यांनी लढत दिली.

महिलांच्या चौथ्या सामन्यात नाशिकने रत्नागिरीचा ८ गुणांनी (२८-२०) पराभव केला. नाशिककडून सरिता दिवा (२.२० व २.१० मि. संरक्षण व ४ गुण) हिने अष्टपैलू खेळ केला. रत्नागिरीकडून पायल पवार (१.१० व २.५० मि. संरक्षण व ८ गुण), अपेक्षा सुतार (१.५० मि. संरक्षण), दिव्या पाल्ये (४ गुण) यांनी चांगली कामगिरी केली.

पुरुष गटातील पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात मुंबई उपनगरने साताऱ्याचा १० गुण व ७ मिनिटे राखून (३०-२०) पराभव केला. मुंबई उपनगरकडून हर्षद हातणकर (२ मि. संरक्षण व ६ गुण), ऋषिकेश मुरचवडे (१ मि. संरक्षण व ६ गुण), रामचंद्र झोरे (१.२० व १.३० मि. संरक्षण व ४ गुण), धीरज भावे (१.५० मि. संरक्षण) यांनी भक्कम खेळ केला. साताऱ्याकडून दिग्विजय मासाळ (१.२० मि. संरक्षण व ६ गुण), लोकेश जाधव (नाबाद १.४० मि. संरक्षण), ओम बोडरे (१.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रयत्न केले.



पुरुषांच्या दुसऱ्या सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३३-२८ असा ५ गुण व ६.४० मिनिटे राखून पराभव केला. पुण्याकडून प्रतीक वाईकर (२ व १.४० मि. संरक्षण), रविकिरण काजवे (८ गुण), शुभम थोरात (१.२० मि. संरक्षण व १२ गुण), मिलिंद कुरपे (१.२० व १.३० मि. संरक्षण), शिवराम शिंगाडे (१.३० व १.२० मि. संरक्षण) यांनी निर्णायक खेळी केली. ठाण्याकडून शुभम उतेकर (१.४० मि. संरक्षण व १० गुण), शुभम जाधव (१ व १.३० मि. संरक्षण व २ गुण), आदित्य पाटील (१.३० व १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगली लढत दिली.

### सोलापूर-सांगलीतील लढत रंगतदार

0चौथा सामना सांगली विरुद्ध सोलापूर अत्यंत चुरशीचा ठरला. निर्धारित वेळेत ३६-३६ बरोबरी सुटल्यानंतर सांगलीने जादा डावात २ गुण व ५0 सेकंद राखून (५४-५२) विजय मिळवला. सोलापूरकडून सौरभ चव्हाण (१.२० मि. संरक्षण व १० गुण), नीरज कोळी (८ गुण), अजय कश्यप (१.१० व १.३० मि. संरक्षण व ६ गुण), जुबेर शेख (१.१५ व १.२० मि. संरक्षण व ४ गुण), सुजित मेटकरी (१.२५ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. सांगलीकडून आतिश तलप (१.२० व २.१० मि. संरक्षण व २ गुण), मिलिंद चावरेकर (१.०० व १.०० मि. संरक्षण व १० गुण), अक्षय मासाळ (१.१२ व १.१८ मि. संरक्षण व ६ गुण), प्रेम रणदिवे (१० गुण) यांनी शेवटपर्यंत झुंज दिली.

### धाराशिवने उडवला मुंबईला विरुध्द बार

पुरुषांच्या तिसऱ्या सामन्यात धाराशिवने मुंबईचा ३१-२६ असा ५ गुण व १.३० मिनिटे राखून चुरशीच्या खेळात पराभव केला. धाराशिवकडून जितेंद्र वसावे (१.३० मि. व नाबाद २.२० मि. संरक्षण व ४ गुण), श्याम ढोबळे (७ गुण), भारतसिंग वसावे (१.३० मि. संरक्षण), राज जाधव (१.३० व १.२० मि. संरक्षण व २ गुण), अनिकेत पवार (२.२० मि. संरक्षण), हरद्या वसावा (४ गुण) यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. मुंबईकडून वेदांत देसाई (२.१० व १.२० मि. संरक्षण व २ गुण), पियुष घोलम (१.०० मि. संरक्षण व ८ गुण), सम्यक जाधव (१.१० व २.१० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगली कामगिरी केली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### आमदार आवताडे यांनी सहकुटुंब केले मतदान

**मंगळवेढा,दि.२० डिसेंबर-**

आमदार समाधान दादा आवताडे यांनी मंगळवेढा नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने येथे आज सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला. लोकशाही अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान प्रक्रियेत सहभागी होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. सक्षम, पारदर्शक आणि जबाबदार स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन घडवण्यासाठी मतदान करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मा. उपनगराध्यक्ष अजित जगताप, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आकाश डांगे तसेच इतर सहकारी आणि मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.



### राज्य उत्पादन शुल्कतर्फे निराधारांना ब्लँकेट वाटप

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

राज्य उत्पादन शुल्कतर्फे गोर,गरिब, वंचित बेघर निराधारांना १५० ब्लँकेट वाटप करण्यासाठी आस्था सामाजिक संस्थेस सुपुर्द केले. ब्लँकेट वाटप करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षिका भाग्यश्री जाधव आणि पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील सीताराम महाराज साखर कारखान्याचे मुख्य अधिकारी डॉ राजलक्ष्मी गायकवाड यांच्या माध्यमातून आस्था सामाजिक संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले. हे सर्व ब्लँकेट एमआयडीसी अक्कलकोट रोड येथील गरीब, वंचित, बेघर, निराधार महिलांना व शिरापूर येथील गरीब शेतकरी महिलांना ब्लँकेट वाटप करण्यात येणार आहे यावेळी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, पिंटू कस्तुरे उपस्थित होते



### घरात बनवलेले अन्न खावे : डॉ. गुल्लापल्ली

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**


बाहेरील पदार्थ टाळून, घरात बनवलेले अन्न खावे यामुळे कुठलाही घोका निर्माण होत नसल्याचे मत 'पद्मशाली सखी संघम'च्या वतीने आयोजित 'स्त्रियांच्या दैनंदिन आरोग्य समस्या कर्करोग आहार व जीवनशैली यावर प्रतिबंधात्मक उपाय योजने संदर्भातील कार्यक्रमात डॉ. नम्रता गुल्लापल्ली (बिंगी) यांनी मार्गदर्शनवेळी व्यक्त केले. हल्ली बाजारात विक्री होणा-या पदार्थांमध्ये भेसळीचा प्रमाण वाढलेले आहे. गाय-म्हशींतून दूध जास्त प्रमाणात मिळावे म्हणून काही लोक इंजेक्शन देत आहेत. तसेच प्लॅस्टिकमधून दूधाची विक्री होत आहे. दूधापासून बनविणा-या पदार्थ सुध्दा धोकादायक, त्याचबरोबर प्लॅस्टिकमध्ये खाण्यासाठी गरम पदार्थ ठेवलेले खाल्यास आरोग्यावर परिणाम होतो. फ्रिजमधील खायचे पदार्थ पुन्हा-पुन्हा गरम करुन खाणे ते अतिरेक होऊन कँसरला आमंत्रण देतो. आजकाल अनेकांना सूर्यप्रकाशात जायला नको वाटते. गेल्याने 'व्हिटॅमिन डी' मिळतो. यावेळी डॉ. नवनीता रच्चा (गुल्लापल्ली), सखी संघम'च्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, यंत्रमाग धारक संघाचे खजिनदार अंबादास बिंगी, भाजपाचे ज्येष्ठ रामचंद्र जन्नू यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. डॉ. गुल्लापल्ली यांनी, कुठल्या पदार्थांपासून कँसर होतो याची माहिती दिले आहे. डॉ. नवनीता रच्चा यांनी महिलांनी दोन महिन्यातून एकदा तरी डॉक्टरांकडून तपासणी करुन घ्यावे. असे सांगून घरात असताना देखील स्वतःच तपासणी कसे करावे याचे प्रात्यक्षिके दाखवले. सल्लागार मेघा इट्टम यांनी प्रास्ताविक करुन सूत्रसंचालन केले तर हेमा मैलारी यांनी आभार मानले.

### राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीत विविध राजकीय पक्षांची मोर्चे मागणी सुरू आहे. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी. जात पडताळणी प्रमाणपत्र पाहूनच उमेदवारी द्यावी, अशी मागणी ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या वतीने ड. राजन दीक्षित यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. राज्यात २९ महापालिकेच्या निवडणुकीच्या कार्यक्रम जाहीर झाला आहे. सोलापूर महापालिकेत एकूण १०२ नगरसेवक आहेत. महापालिकेत ओबीसी वर्गासाठी २७ टक्के आरक्षण असून २७ जागा या ओबीसींसाठी आरक्षण ठेवले आहेत. दरम्यान, ओबीसी आरक्षणात घुसखोरी सुरू आहे असा आरोप करत सर्वच राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी देऊन सामाजिक न्याय द्यावा अशी अपेक्षा ड. राजन दीक्षित यांनी व्यक्त केली आहे. मूळ ओबीसींनाच राखीव जागेवर उमेदवारी देण्यासाठी काही राजकीय पक्षांनी भूमिका जाहीर केली आहे. इतर पक्षांनीही तशी भूमिका जाहीर करावी. येत्या महापालिका निवडणुकीमध्ये मूळ ओबीसी उमेदवारांना डावल्यास २५ डिसेंबर नंतर निर्णय घेणार आहे, असेही ॲड. राजन दीक्षित यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस डॉ. माधुरी पारपल्लीवार, शेखर बंगाळे, शिवराज बंगाळे आदी उपस्थित होते.

### शहाजी भालके यांचे निधन



**बार्शी, दि.२० डिसेंबर-**

तालुक्यातील गाडेगाव येथील शहाजी गजेंद्र भालके यांचे अल्पशा आजाराने दि. १७ डिसेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांना उपचारासाठी बार्शीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते पण उपचाराला प्रतिसाद मिळाला नाही. ते गाडेगावचे माजी उपसरपंच व उद्योजक अमोल भालके यांचे वडील होत.

# सिध्देश्वर यात्रा आणि निवडणुकीत काही गडबड केल्यास कारवाई

## पोलिस प्रशासनाचा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर -**

सिध्दरामेश्वर यात्रा व महापालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने सोलापुर आयुक्तलयात, फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून त्यांना सिध्दरामेश्वर यात्रा व सोलापूर महानगरपालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने शांतता राखण्याबाबत सुचना देण्यात आल्या, त्यांनी काही गडबड केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असा समज पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्याकामी अवघ्या चार तसातच सर्व डीबी पथकाने मेहनत घेवुन १८ वॉरंट व १३ समन्सची बजावणी केली.

मुख्य न्यायदंडाधिकारी, जिल्हा न्यायालय सोलापूर यांचेकडून प्राप्त वॉरंट व समन्स याची तात्काळ बजावणी होवुन न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्यासाठी फौजदार चावडी पोलीस ठाणे कडुन दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत डी.बी. अंमलदार यांचेमार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये १८ बेलेबल व नॉनबेलेबल वारंट बजावणी करण्यात आले. १३ समन्सची बजावणी अवघ्या चार तासातच करण्यात आले.

फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर कडील गुन्ह्यानुसार दोषी धरुन आजन्म करावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा झाली आहे. या गुन्ह्याच्या तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१ कमलाकर ताकवले तसेच सरकारी वकिल एस.ए. डोके, कोर्ट पैरवी विक्रांत कोकणे यांनी काम पाहिले. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त विभाग-१, प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राउत, दुय्यम पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोह प्रविण चुंगे, पोह बसवेश्वर परीट, पोह सचिन बाबर, पोना शिवानंद भिमदे, पोना सर्जेराव पाटील, पोकों ज्ञानेश्वर गायकवाड, पोकों अजय चव्हाण, पोकों सुरज सोनवलकर, पोकों महादेव शिंदे, पोकों अतिश पाटील, पोकों कृष्णा बडुरे, पोकों पंकज घाडगे, पोकों सुधाकर माने, पोकों विनोद व्हटकर, पोकों तोसिफ शेख, पोकों नितीन मोरे, पोकों शशिकांत दराडे, पोकों विनोदकुमार पुजारी, पोकों अमोल खरटमल यांनी केली.

## सोलापूर जनता बँक माढा शाखेचा ग्राहक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.२० डिसेंबर-**

सोलापूर जनता बँकेच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त गेले वर्षभर अनेक शाखेत सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्याअंतर्गत शुक्रवारी दि.१९ डिसेंबर रोजी माढा शाखेत ग्राहक मेळावा घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे उपाध्यक्ष मिलिंदराव कुलकर्णी होते. प्रमुख पाहुणे माढा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष मिनलताई साठे, मनकर्णा पतसंस्थेचे चेअरमन झुंजार नाना भांगे, लोकमंगल पतसंस्थेचे संचालक शहाजीराव साठे हे होते. या कार्यक्रमाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दिपप्रज्वलनाने झाले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार उपाध्यक्ष कुलकर्णी यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात राजेंद्र फडतरे, भारत गवळी यांना कर्ज मंजूरी पत्र देण्यात आले. बँकेच्या विविध कर्ज योजनांची व ठेवीची माहिती बँकेचे सुहास मुळजकर यांनी दिली. मगन सावंत, मदन मुंगळे, सुधीर कुलकर्णी व रहीम पठाण या खातेदारांनी मनोगत मांडले. प्रमुख पाहुणे ॲड. मीनल साठे यांनी बँकेची सेवा चांगली असल्याचे नमूद करुन बँकेच्या प्रगती साठी शुभेच्छा दिल्या. समारोपात उपाध्यक्ष कुलकर्णी यांनी सर्व सभासद ग्राहक खातेदारांना बँकेच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. माढा नगर परिषदेने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घर बांधकाम योजना तयार केल्यास त्यासाठी बँक अर्थ सहाय्य करेल असे आश्वासन दिले. स्वागत, प्रास्ताविक, विविध कर्ज योजनांची माहिती सांगणे, आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन सुहास मुळजकर यांनी केले. शाखा व्यवस्थापक दत्तात्रय मनसुखे व शाखेतील सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## भाळवणी हायस्कूलमध्ये माता-पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० डिसेंबर -**

तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता.माता पालक मेळाव्यासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून पंढरपूर येथील डॉ. वैभवी भोसले उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या उपप्राचार्या पी आर मोरे होत्या. तर पालक संघाच्या उपाध्यक्ष प्राची माळवदे उपस्थित होत्या.

याप्रसंगी मुख्याध्यापक के. डी. शिंदे यांनी मुलांना मोबाईल पासून जितके दूर राहता येईल तितके राहण्याचा प्रयत्न करा असे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक बेसिकराव उपस्थित होते.

प्रास्ताविक एस.पी.कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय एन.बी. विधाते यांनी करून दिला. सूत्रसंचालन एस.एच.लिंगे व एम.एस.नागणे यांनी केले. यू.व्ही. नागटिळक यांनी आभार मानले.

### उळे-कासेगाव रस्त्याची दूरवस्था; दुरूस्तीची मागणी

**सोलापूर,दि.२० डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे ते कासेगाव या रस्त्याचे रूंदीकरणीची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सोलापूरपासून अवघ्या १६ किलोमीटर अंतरावरील कासेगाव येथून दररोज उळे मार्गावर मोठी वाहतूक असते. उळे मार्गे सोलापूरला दररोज या गावातून विद्यार्थी, व्यवसायिक, नोकरदार, शेतकरी यांची मोठी वाहतूक असते. या मार्गाची सध्या दूरवस्था झाल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे. जागोजागी खड्डे पडले आहेत. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस साईडपट्टयाही नाहीत. त्यामुळे अपघात निमंत्रण मिळत आहे.

## हिवाळ्यात आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक काळजी घ्या

- पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे
- हीटर, शेकोटी लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे

घरात योग्य हवेशीर व्यवस्था ठेवावी; मात्र थंड वारा थेट अंगावर येणार नाही याची दक्षता घ्यावी. हीटर, शेकोटी किंवा आग लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे. श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे, तीव्र खोकला, थकवा किंवा वेदना वाढल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात संपर्क साधावा, असे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने स्पष्ट केले आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

हिवाळी हंगामात तापमानात लक्षणीय घट होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीटर, शेकोटी किंवा आग लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे. आरोग्याची योग्य काळजी घेतल्यास आजारांची तीव्रता टाळता येऊ शकते. सर्व नागरिकांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करून स्वतःचे व कुटुंबियांचे आरोग्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

थंडीमुळे सर्दी, खोकला, ताप, दमा, हृदयविकार तसेच सांधेदुखी यांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. विशेषतः सीओपीडी, दमा, हृदयविकार, एंजाइना तसेच संधिवात यांसारख्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना या काळात अधिक धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांनी, विशेषतः आजारग्रस्त व्यक्तींनी प्रतिबंधात्मक उपाय अवलंबावेत, असे आवाहन करण्यात येत आहे. थंडीपासून संरक्षणासाठी उबदार कपडे वापरावेत. सकाळी लवकर व रात्री उशिरा थंड हवामानात अनावश्यक बाहेर जाणे टाळावे. तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार व्यायाम, योग, प्राणायामचा सराव करावा. सीओपीडी व दम्याच्या रुग्णांनी डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमितपणे घ्यावीत व इनहेलर नेहमी सोबत ठेवावा. हृदयविकार व एंजाइना असलेल्या रुग्णांनी रक्तदाब व साखर नियंत्रणात ठेवावी व थंडीमध्ये जड श्रम टाळावेत.

संधिवात असलेल्या रुग्णांनी शरीर उबदार ठेवावे, हलका व्यायाम करावा व सांधे थंड होणार नाहीत याची काळजी घ्यावी. गरम, ताजे व पोषक आहार घ्यावा. धूम्रपान, मद्यपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळावे.

## वालचंद ज्युनिअर कॉलेजमध्ये गुणवत्तेचा जल्लोष

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात शैक्षणिक, क्रीडा व सहशैक्षणिक यशाचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**



वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी दि. २० डिसेंबर रोजी वालचंद सभागृहात उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव, शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान आणि शैक्षणिक गुणवत्तेचा उत्सव असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे हे प्रमुख पाहुणे होते. वालचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी अध्यक्षस्थानी होते. यावेळी समारंभाचे निमंत्रक डॉ. ए. एम. महाजन, डॉ. के. आर. राव, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे तसेच स्वयंअर्थसहाय्य विभागाच्या समन्वयिका सौ. सारिका महिंद्रकर यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलनाने सुरूवात झाली. सुकन्या साखरे हिने नमोकार महामंत्र व 'आईगिरी नंदिनी'वर नृत्याविष्कार सादर केला. उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ए. एम. महाजन यांनी परिचय करून दिला, प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ.कोटी यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी इयत्ता बारावीतील अनुष्का बिराजदार, प्रज्ञा बांगड (अनुदानित कला विभाग) आणि अथर्व गौर (स्वयंअर्थसहाय्य विज्ञान विभाग) यांना त्यांच्या सर्वांगीण प्रगती, शिस्तबद्ध वर्तणूक आणि नेतृत्वगुणांच्या आधारे आदर्श विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक वाचन उज्वला तांदळे, अंबिका माळी आणि आर. एस. हजारे यांनी केले. प्रा.चेतन तुपकर यांनी पसायदान सादर करून सूत्रसंचालन केले. सारिका महिंद्रकर यांनी आभार मानले.



## वीट गाडी चालकाचा तोल गेल्याने कारला जोराची धडक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.२० डिसेंबर -**

अक्कलकोट रोडवरील संगमेश्वर नगर, मणिधारीसमोर शनिवारी दुपारच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. वीट गाडी चालकाचा अचानक तोल गेल्याने समोरून येणाऱ्या कारला जोराची धडक बसली. या धडकेनंतर वीट गाडी रस्त्यावरच पलटी झाली. या अपघातात वीट गाडी क्र. एमएच४६ आर ५७०५ ने कार क्र.एमएच १३ ईसी ८७२५ ला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका भीषण होता की कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, सुदैवाने कारमधील प्रवासी थोडक्यात बचावले, मोठी दुर्घटना टळली.

अपघातात वीट गाडी चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेनंतर काही काळ अक्कलकोट रोडवरील वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली होती. दरम्यान, या परिसरात यापूर्वीही वारंवार अपघात घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. वाहनांचा वेग, अरुंद रस्ता आणि योग्य वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. भविष्यातील अपघात टाळण्यासाठी उड्डाणपूल उभारणे किंवा तातडीच्या वाहतूक सुधारणा करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास सुरू आहे. अपघात पाहण्यासाठी घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

## अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दिवस; २१ डिसेंबर, उत्तरायणाचा प्रारंभ

दि.२१ डिसेंबर हा दिवस जगभरात खगोलशास्त्रीय, ऋतूचक्रात्मक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यादिवशी हिवाळी अयनांत घडतो. उत्तर गोलार्धात हा दिवस वर्षातील सर्वात लहान दिवस आणि सर्वात मोठी रात्र म्हणून ओळखला जातो. निसर्गाच्या एका निर्णायक टप्प्याचे प्रतीक असलेला हा दिवस मानवी जीवनालाही अंतर्मुख होण्याची, विचार करण्याची आणि नव्या आशेने पुढे पाहण्याची प्रेरणा देतो.

खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, दि.२१ डिसेंबर रोजी सूर्य मकरवृत्तावर लंबवत असतो. पृथ्वीच्या अक्षाच्या झुकावामुळे उत्तर गोलार्धात सूर्यकिरण कमी प्रमाणात पडतात. परिणामी दिवसाचा कालावधी कमी होतो आणि रात्र मोठी होते. यानंतर सूर्याचा प्रवास हळूहळू उत्तर दिशेकडे सुरू होतो. त्यामुळे पुढील दिवसांपासून दिवस वाढू लागतात. हीच प्रक्रिया भारतीय परंपरेत उत्तरायणाची चाहूल म्हणून ओळखली जाते. जरी प्रत्यक्ष उत्तरायण मकर संक्रांतीपासून मानले जात असले, तरी दि.२१ डिसेंबर हा त्याचा खगोलशास्त्रीय पाया आहे. ऋतू व निसर्गाच्या दृष्टीने हा दिवस हिवाळ्याचा कळस दर्शवतो. थंडी तीव्र होते, सकाळी धुके वाढते आणि वातावरणात एक प्रकारची शांतता जाणवते. झाडांची वाढ मंदावते, अनेक वनस्पती विश्रांतीच्या अवस्थेत जातात. निसर्गाचा हा स्थिर आणि शांत काळ मानवी मनालाही अंतर्मुख बनवतो.



भारतीय जीवनपद्धतीत ऋतूंचा मानवी जीवनावर मोठा प्रभाव मानला जातो. त्यामुळेच ऋतुनुसार आहार, सण, व्रते आणि जीवनशैली ठरवली जाते. शेतीच्या दृष्टीने दि.२१ डिसेंबरचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. हा काळ रब्बी हंगामाच्या वाढीचा असतो. गहू, हरभरा, ज्वारी, कांदा यांसारखी रब्बी पिके थंडीच्या वातावरणात चांगली वाढतात. थंड हवामानामुळे कीड व रोगांचे प्रमाण तुलनेने कमी राहते. त्यामुळे शेतकरी वर्गासाठी हा काळ आशेचा असतो. निसर्गाच्या या बदलत्या चक्रावरच शेतीचे संपूर्ण गणित अवलंबून आहे, याची जाणीव हा दिवस करून देतो. सांस्कृतिक व पारंपरिक संदर्भात दि.२१ डिसेंबरला विशेष स्थान आहे. भारतीय परंपरेत सूर्याला जीवनदाता मानले जाते. सूर्याची गती म्हणजेच काळाची गती, असे मानले जाते. हिवाळी अयनांतानंतर सूर्याचा उत्तरमार्ग सुरू होतो, ज्याला शुभ परिवर्तनाची सुरुवात मानली जाते. अंधाराच्या कमाल मर्यादेनंतर प्रकाशाचा प्रवास सुरू होतो, ही संकल्पना भारतीय विचारधारेशी सुसंगत आहे. म्हणूनच हा दिवस संयम, आत्मचिंतन आणि नव्या संकल्पांचा मानला जातो. आध्यात्मिक अर्थाने पाहता, दि.२१ डिसेंबर हा दिवस आशा आणि नवचैतन्याचे प्रतीक आहे. अंधार जरी मोठा असला, तरी त्यानंतर प्रकाश वाढणारच, हा संदेश या दिवसातून मिळतो. मानवी जीवनात येणाऱ्या अडचणी, संकटे आणि निराशा यानंतरही आशेचा किरण असतो, याची आठवण हा दिवस करून देतो. जगातील अनेक संस्कृतींमध्ये हिवाळी अयनांताच्या दिवशी ध्यान, साधना, प्रार्थना आणि अंतर्मुखतेला विशेष महत्त्व दिले जाते. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात दि.२१ डिसेंबरसारखा दिवस आपल्याला थांबून विचार करण्याची संधी देतो. आपण निसर्गाच्या चक्राशी किती जोडलेलो आहोत, आपले जीवन निसर्गाशी किती सुसंगत आहे, याचा विचार करण्याचा हा काळ आहे. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा प्रवास हा केवळ निसर्गाचा नियम नाही, तर मानवी जीवनाचा मूलमंत्र आहे. अशा प्रकारे दि.२१ डिसेंबर हा दिवस केवळ कॅलेंडरवरील एक तारीख नसून, तो निसर्ग, विज्ञान, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम आहे. अंधाराच्या टोकावरून प्रकाशाकडे जाण्याची सुरुवात करणारा हा दिवस आपल्याला सकारात्मकतेचा, आशेचा आणि नव्या प्रारंभाचा संदेश देतो.

**शब्दांकन-प्रा.राजेंद्र ठोंबरे, सांगोला**
**संकलन-दिपक भाकरे, सांगोला**

# आ.कल्याणशेट्टींची जबाबदारीतून मुक्तता; शहरातील तीन आमदार, शहराध्यक्ष सक्षम

### महापालिका निवडणूक प्रमुख नियुक्तीबाबत पालकमंत्री गोरेंकडून खुलासा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने महानगरपालिका निवडणूक प्रमुख पदावर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची नियुक्ती केली होती. परंतु आ. कल्याणशेट्टी यांनी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पदाला न्याय देणे शक्य नसल्याचे सांगत या पदातून मुक्त करण्याची विनंती पक्षाला केली होती. याबाबत बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, पक्षाने आ. कल्याणशेट्टी यांची विनंती मान्य केली आहे.

महापालिका निवडणुकीसाठी शहरातील भाजपाचे तीन आमदार आणि शहराध्यक्ष सक्षम असल्याने यापदासाठी इतर कोणाचीही नियुक्ती पक्षाने केलेली नाही. सोलापूर भाजपामध्ये सध्या पक्षांतर्गत सर्वकाही अलबेल नसल्याची चर्चा होती. त्यातच भर म्हणजे आ. सुभाष देशमुख यांचा विरोध डावलून काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांना पक्षात प्रवेश देण्यात आला.

यावर कडी म्हणजे आ. सुभाष दशमुख आणि आ. विजयकुमार देशमुख या अनुभवी तसेच मंत्री राहिलेल्या आमदारांना डावलून त्यांचे ज्युनिअर असणारे आ. कल्याणशेट्टी यांना पक्षाने सोलापूर महापालिका निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्त केले. अगोदरच पक्षात नाराज असलेल्या दोन्ही देशमुखांची नाराजी आणखीन वाढणार हे लक्षात घेवून पक्षाने काही सूत्र हलविल्याचे वृत्त आहे. दरम्यान आ. कल्याणशेट्टी यांनी देखील आपल्याला या पदाला न्याय देता येणार नाही, कारण जिल्हा परिषद निवडणुका लागण्याची शक्यता असल्याने आपल्याला तिकडे लक्ष देणे क्रमप्राप्त असल्याचे पक्षाला कळविले होते. पालकमंत्री गोरे यांनी देखील शनिवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, आ. कल्याणशेट्टी यांची विनंती पक्षाने मान्य केली आहे. महापालिका निवडणूक प्रमुख पदावर पक्षाने इतर कोणाचीही नियुक्ती केलेली नाही. तसेच शहरातील भाजपाचे आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे आणि शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर या सक्षम आहेत.

पालकमंत्र्यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना याप्रकरणावर पडदा टाकून घडल्या प्रकारावर फुंकर घातली आहे. किमान दोन्ही आ. देशमुखांची नाराजी तरी यामुळे दूर होणार आहे.

# स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे निधन



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० डिसेंबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १९६० पासून पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्यास प्रारंभ करणारे मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराज यांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले. संघाशी असलेली आपली नाळ त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम जोपासली.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला.उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व. सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिले.राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले. सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले. तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री पर्रीकर, श्रीपादजी नाईक, चंद्रकांतदादा पाटील, विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले. त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते. स्वामी दुर्गानंद गिरी यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी सात वाजता औसा तालुक्यातील वानवडा रस्त्यावरील प्रा. उमाकांत होनरावांच्या शेतात मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मोहोळच्या दोन प्रभागात सरासरी ६६.९९ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२० डिसेंबर-**

मोहोळ नगरपालिकेच्या राहिलेल्या दोन प्रभागातील एकेक जागेसाठी आज दि.२० डिसेंबर रोजी सरासरी ६६.९९ टक्के मतदान झाले. मोहोळ नगर पालिकेत एकूण १० प्रभागात २० नगरसेवक आहेत. थेट जनतेतून नगराध्यक्ष यापैकी ३ डिसेंबर रोजी १८ नगरसेवकांसाठी मतदान पार पडले होते.

तथापि न्यायालयाच्या आदेशाने प्रभाग क्र. ३ आणि ५ मध्ये एक एक जागेची निवडणूक पुढे गेली होती. त्यासाठी शनिवारी मतदान झाले. यामध्ये प्रभाग क्र ३ मध्ये मोहोळचे माजी नगराध्यक्ष आणि शिवसेना (शिंदे) चे राज्याचे ओबीसी विभाग प्रमुख रमेश बारसकर आणि शिवसेना (उबाठा) चे माजी जिल्हा प्रमुख दीपक गायकवाड यांचे चिरंजीव शिवरत्न आणि भाजपाचे अझरुद्दीन शेख यांच्यात चुरशीची लढत झाली.

यामध्ये सरासरी ७०.५१% मतदान झाले, तर प्रभाग क्र. ५ मध्ये भाजपचे विक्रम फडतरे, शिवसेना (शिंदे) चे चंद्रकांत वाघमोडे आणि शिवसेना (उबाठा) चे गणेश क्षीरसागर यांच्यात लढत झाली. यामध्ये ६३.२% मतदान झाले.

काही किरकोळ प्रकार वगळता मतदान शांततेत पार पडले. यासाठी पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे आणि सहकारी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. उद्या रविवारी सर्व प्रभागांची आणि नगराध्यक्षा पदाची मतमोजणी होणार असून सर्वपक्षीय इच्छुकानी विजयासाठी देव पाण्यात ठेवले आहेत.

# सांगोला नगरपरिषदेच्या निवडणूकीची ११ टेबलद्वारे ४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० डिसेंबर-**

सांगोला नगरपरिषदेच्या सर्व ११ प्रभागाची मतमोजणी रविवार, दि.२१ डिसेंबर रोजी ११ टेबलद्वारे एकूण ४ फेऱ्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. मतमोजणी कक्षात मतमोजणी पाहणीसाठी एकावेळेस एकतर उमेदवार अथवा मतमोजणी प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार यांचे ११ मतमोजणी प्रतिनिधी असलेने, एकावेळेस सर्व मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी कक्षात उपस्थित राहू शकतात. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार यांना मतमोजणी कक्षात उपस्थित रहावयाचे झाल्यास एक मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी कक्षाबाहेर आले नंतरच उमेदवारास मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाईल, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

# ना हरकत प्रमाणपत्रासाठी नॉर्थकोर्ट प्रशाला येथे एक खिडकी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेतील विविध ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य राहणार आहे. यासाठी दि.२१ डिसेंबर २०२५ पासून ना हरकत प्रमाणपत्रासाठी नॉर्थकोट प्रशाला येथे एक खिडकी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. दुपारी २ ते सायंकाळी ६ यावेळेत ना हरकत दाखले वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसंदर्भात मालमत्ता कराची ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्याबाबत स्वतंत्र ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल. तसेच उमेदवाराच्या मालकीची खुली जागा असल्यास, त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याबाबतची कागदपत्रे जोडावी लागतील.

उमेदवार महानगरपालिकेमध्ये मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील देणे आवश्यक असून, त्यासंबंधीची माहिती लेखी स्वरूपात सादर करावी लागणार आहे. या सर्व बाबींविषयी उमेदवारांनी स्वयंघोषणापत्र सुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागेल. स्वयंघोषणापत्रामध्ये दिलेली माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. सर्व इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी. सर्व इच्छुक उमेदवारांनी शक्य होईल तितके लवकर आपले अर्ज एक खिडकी येथे सादर करण्यात यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



# एसव्हीसीएस प्रशालेत पालखी सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

परमपूज्य तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्याराधनानिमित्त एस.व्ही.सी.एस.हायस्कूल एम आयडीसी येथे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशीपीठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली.

यावेळी चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे पंडिताराध्य महास्वामी, बृहन्मठाध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. या मिरवणुकीत मुलींचा लेझीम पथक, मुलांचे ध्वज पथक, नमो शंकरा नृत्य पथक, विद्यार्थिनी डोक्यावर कलश घेऊन,शंकर-पार्वती व पूज्य महास्वामीजींचा वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभागी झाले होते. ही मिरवणूक राजीव नगर, किसान नगर या मार्गावरून निघाली. मिरवणूक मार्गात भक्तांनी घरासमोर रांगोळी काढून मिरवणुकीचे स्वागत केले. वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री हिरेमठ यांनी पौरोहित्य केले. या मिरवणुकीत मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते, पर्यवेक्षक संतोषकुमार तारके, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी होते.

# मंगळवेढा नगरपरिषदेसाठी ६९.७७ टक्के मतदान

### ● किरकोळ प्रकार वगळता मतदान शांततेत; लाडक्या बहिणींची आघाडी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० डिसेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषदेसाठी अत्यंत चुरशीच्या झालेल्या मतदानामध्ये सरासरी ६९.७७ टक्के इतके मतदान झाले असून सर्वाधिक मतदान महिलांचे १४ हजार ३८५ म्हणजेच पुरुषापेक्षा १३४ महिला मतदारांनी अधिक मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान कुठेही अनुचीत प्रकार न घडता शांततेत मतदान प्रतिक्रीया पार पडली.



मंगळवेढा नगर परिषदेच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी शनिवारी दि.२० रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अत्यंत चुरशीने मतदान झाले. सकाळी थंडीचे प्रमाण अधिक असल्यामुळे यावेळी मतदान केंद्रावर तुरळक गर्दी होती. सुर्याचा पारा जसजसा वाढत गेला त्या प्रमाणे मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी लांबलचक रांगा लागल्याचे चित्र होते. शहरामध्ये सर्वाधिक मतदानाची टक्केवारी प्रभाग क्रमांक ६ मध्ये ७९.६७ टक्के इतके नोंदविले गेले आहे. तर प्रभाग क्रमांक ५ मध्ये सर्वाधिक कमी म्हणजे ६२.८४ टक्के मतदान झाल्याचे नोंदविले गेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असल्यामुळे मतदाना करण्यामध्ये अधिक चुरस दिसून येत होती. शहरामध्ये २८ हजार ६३८ एकूण मतदार असून निवडणूकीसाठी १९ हजार ९८१ इतक्या मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावला आहे. मतदान केंद्रावर मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी अपंग,वृध्द आदी मतदारांनीही हजेरी लावली होती. दरम्यान एका मतदान केंद्रावर अपंगांना बसून जाण्यासाठीची व्हीलचेअर तुटल्यामुळे अपंग मतदारांना त्याचा त्रास सहन करावा लागला.

मतदान शांततेत होणेकामी डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे,गोपनीय विभागाचे पोलीस हवालदार दिगंबर गेजगे आदी सर्वजण मतदान केंद्रावर बारकाईने लक्ष ठेवून होते. मतदारांना मोठ्या प्रमाणात लक्ष्मीदर्शन निवडणूकीत दिल्याचा थेट आरोप माजी पालकमंत्र्यांनी प्रसार माध्यमाजवळ केल्याने मंगळवेढा तालुकयात चर्चेला उधाण आले आहे. इंग्लिश स्कूल प्रशालेत आदर्श मतदान केंद्र उभे करण्यात आले होते. ते फुग्याने सुशोभित केल्याने सर्व मतदारांचे लक्ष खेचून घेत असल्याचे चित्र होते.

# वानकर बंधू शिवसेना उबाठा पक्षातच

### पक्षाचा नव्हे तर पदाचा राजीनामा दिला होता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना उबाठाचे शहरप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी पक्षातील ज्येष्ठ व प्रमुख शिवसैनिकांना विश्वासात न घेता एकला चलोची भूमिका घेत असल्याच्या निषेधार्थ आम्ही पक्षाचा नव्हे पदाचा राजीनामा दिला होता. आम्ही शिवसेना उबाठा पक्षातच राहणार आहोत, असे वानकर बंधुंनी शनिवारी पत्रपरिषदेत सांगितले.

प्रा.डॉ.अजय दासरी यांच्या त्या भूमिकेला आम्ही सहमत नव्हतो. निवडणूका शिवसेना पक्षाला ताकतीने लढवायची असेल तर ज्येष्ठ मंडळींना सोबत घेऊन लढवली पाहिजे अशी भूमिका वरिष्ठांकडे कळवली होती. परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने पदाचा राजीनामा दिला. आता आमच्या मागण्या मान्य झाल्याने आम्ही पदावर कार्यरत राहू, असेही त्यांनी सांगितले. आमच्या पदाचा राजीनामा आम्ही पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आणि संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्याकडे दिला होता. परंतु तो त्यांनी नामंजूर केला. आमचे म्हणणे पक्षाने ऐकले. त्यामुळे आमचे मतभेद संपलेले आहेत. महापालिका निवडणूक समितीमध्ये पुरुषोत्तम बरडे, गणेश वानकर, संतोष पाटील, अस्मिता गायकवाड, प्रिया बसवंती या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# पंढरपुरात प्रभाग क्रमांक ७ (ब) साठी ६०.८१ टक्के झाले मतदान

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.२० डिसेंबर -**

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक ७ (ब) साठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान ६०.८१ टक्के इतके झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान या प्रभागातून निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला रविवारी मतमोजणी नंतर समोर येणार आहे.



२ डिसेंबर २०२५ रोजी पंढरपूरच्या नगराध्यक्षपदासह अठरा प्रभागातील ३४ नगरसेवकपदासाठीचे मतदान प्रक्रिया पार पडलेली होती. प्रभाग क्रमांक ५ (अ) मधून भाजपाच्या कुसुम जगन्नाथ परचंडे ह्या बिनविरोध निवडून आल्या. प्रभाग ७ (ब) मधील एका उमेदवारावरील घेण्यात आलेल्या आक्षेपा नंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यामुळे न्यायालयाने मतदानाच्या आदल्या दिवशी अर्थात १ डिसेंबर रोजी या प्रभागातील मतदान प्रक्रिया स्थगित केली होती. निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमा नुसार शनिवारी (दि.२० डिसेंबर) रोजी या एका प्रभागातील उमेदवारांसाठी मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. शहरातील प्रभाग क्रमांक ७ (ब) मधून सुर्यकांत शंकर कदम, वासुदेव उर्फ भागवत त्रिंबक बडवे, साईनाथ शंकर बडवे, ज्ञानेश धनंजय बागडे, प्रज्योत अशोक भोसले हे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. रिंगणातील सर्वच उमेदवारांकडून विजयाचा दावा केला जात असला तरी खरी लढत ही सुर्यकांत शंकर कदम विरुध्द भाजपाचे वासुदेव उर्फ भागवत त्रिंबक बडवे यांच्यात झाल्याचे सांगण्यात येते सकाळी ७.३० ते ९.३० पर्यंत १२० पुरुष आणि ७३ स्त्री मतदार असे एकूण १९३ जणांनी आपला मतदाना हक्क बजाविला होता. या काळात केवळ २.९८ टक्के इतका मतदानाचा टक्का नोंदविला गेला. मात्र दुपारनंतर मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी दिसून आली. दुपारी ५.३० पर्यंत एकूण २०२३ पुरुष आणि १९०९ स्त्री मतदारांनी आपला मतदाना हक्क बजाविला.

# योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या पादुकांची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्रीगुरुंच्या पादुकांची मिरवणूक काढण्यात आली.



संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या निवासस्थानी 'श्री'च्या पादुकांची महापूजा काशीपीठाचे जगद्गुरु मल्लिकार्जून विश्वाराध्य शिवाचार्य यांच्या सानिध्यात पार पडली. यावेळी बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री बालपस्वी चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, चिट्टगुपाचे श्री गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे श्री पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित होते. विठ्ठल कुंभार व रूपा कुंभार या दांपत्याच्या हस्ते श्री गुरुंच्या पादुकांची विधिवत महापूजा पार पडली. ओंकार भाईकट्टी (शंकर), श्रद्धा आहेरवाडी (पार्वती), विशाल सुलगुडले (गणपती), हर्षिता उसाकोयल (रिद्धी), वैष्णवी पलवंचा (सिद्धी), आदित्य बिराजदार (सिद्धेश्वर महाराज), राज दोडमणी (महात्मा बसवेश्वर), स्वराज्य जाधव (मन्मथ स्वामी), समृद्धी पगड्याकुल (अक्क महादेवी) श्रेया काटमोरे (हेमरेड्डी मल्लम्मा), प्रांजल बनसोडे (झाशीची राणी), ओंकार डोंगराजे (महादेव) ऋषिकेश वन्नम (महास्वामीजी) ओंकार सानप (विठ्ठल) नैनाक्षा मेरगु (रुक्मिणी) आदी बालकलाकारांनी विविध संत, महात्मा व देवदेवतांच्या वेशभूषेत आकर्षक दिसत होते. सिद्धाराम खजूरगी, राहुल गंदुरे, पवन देसाई, उडचान, मामड्याल यांनी विद्यार्थ्यांना पाणी वाटप केले. या मिरवणुकीत संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, ललिता कुंभार, गुरुशांत धुतरगावकर, राजशेखर फताटे, सिद्धेश्वर नरोळे, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, रेवणसिद्ध रोडगीकर, राजशेखर स्वामी, महांतेश कौलगी, षडाक्षरी स्वामी, सिद्धलिंग मठमारी, ज्ञानेश्वर म्हेत्रे, धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, जयश्री बिराजदार, अशोक पाटील, सुरेश बिराजदार, अंगद तोरणे, चंद्रशेखर पाटील, विनायक कोरे, शिवानंद पुजारी, सिद्धाराम कुंभार, संतोष प्रचंडे, हनुमंत कुरे, वैशाली गुजर, प्रशांत बत्तुल, जगदेवी निंबर्गी, राजश्री कोळी, शितल पाटील आदी सहभागी झाले होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जात वैधता पडताळणीसाठी मनपात आता स्वतंत्र कक्ष

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** येथील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत जात वैधता करण्यासाठी अर्ज स्वीकारून ते अर्ज जात पडताळणी समितीकडे पाठवण्यासाठी लातूर मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाने निश्चित केलेल्या आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे जात वैधता करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी अर्ज करावा लागतो. असे अर्ज स्वीकारून ते जिल्हा जात पडताळणी समितीकडे




पाठविण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात हा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून २२ ते ३० डिसेंबर या काळात अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज या कक्षाकडे आवश्यक कागदपत्रांसह संतोष लाडलापुरे व फजल शेख यांचेकडे सादर करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.



# लातुरात भावी नगरसेवकांचा जनसंपर्कावर भर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाकडून अद्याप प्रत्यक्ष उमेदवारीची घोषणा झालेली नसली तरीही अनेक भावी नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागात जाऊन जनसंपर्कावर भर दिल्याचे पाहावयास मिळत आहे. एकंदर मनपा निवडणुकीसाठीचे वातावरण आता तापायला सुरुवात झाल्याचे पदोपदी निदर्शनास येत आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नव्या वर्षात, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. लातूर मनपाची दुसरी सार्वत्रिक निवडणूक २०१७ ला झाली होती. मनपाचा कालावधी उलटून आता जवळपास तीन साडेतीन वर्षांचा काळ उलटला आहे. दरम्यानच्या काळात मनपावर प्रशासकराज होते. आजही मनपाचा गाडा हाकण्याचे काम मनपा आयुक्तच प्रशासक या नात्याने करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दि. ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घेण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला वेग आला आहे. पहिल्या टप्प्यात नगर पंचायत - नगर परिषद, दुसऱ्या टप्प्यात राज्यातील २९ मनपाच्या तर तिसऱ्या व अंतिम टप्प्यात जिल्हा




परिषद - पंचाय समितीच्या निवडणुका होणार आहेत. आता नगर परिषद - नगर पंचायतचा एक टप्पा पूर्ण होत आला आहे. दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी प्रमुख राजकीय पक्षांचे संभाव्य उमेदवार आपल्याला पक्षाकडून निश्चित उमेदवारी मिळेल या आशेने कामाला लागल्याचे पाहावयास मिळत आहे.

लातूर शहरात एकूण १८ प्रभागातून ७० नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. नगरसेवकपदाच्या आरक्षणाच्या सोडतीत अनेक प्रभागाचे आरक्षण बदलले आहे. त्यामुळे अशा प्रभागात पूर्वीपासून मनपा निवडणुकीची तयारी करणाऱ्या पुरुष उमेदवारांना आपोआप बाजूला व्हावे लागले. त्यामुळे त्यांनी नाराज न होता आपल्याऐवजी आपल्या पत्नीला उमेदवारीसाठी पुढे केल्याची उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष नामनिर्देशनपत्रे दाखल व्हायला आणखी दोन दिवसांचा अवधी आहे. त्यातच कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने अद्याप कोणत्याही उमेदवाराची घोषणा केलेली नाही.

पक्ष आपले आजपर्यंतचे काम पाहून आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आशेने अनेकांनी जनसंपर्कावर भर देण्यास सुरुवात केली आहे. शहराच्या विविध प्रभागात सकाळच्या वातावरणात असे अनेक संभाव्य उमेदवार आपल्याला मतदान करावे, अशा आशयाचे आवाहन करताना फिरत असल्याचे निदर्शनास येत आहे. महिला राखीव प्रभागात महिला मतदार - कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भावी नगरसेविका आपल्या पक्षाला व आपल्याला मतदान करून विजयी करण्याचे आवाहन करताना दिसत आहेत.

भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे इच्छुक उमेदवार उमेदवारीच्या अपेक्षेने आतापासूनच कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी एकत्रित या निवडणुका लढविणार असल्याचे सांगण्यात येत आहे. जर असे झाले तर अनेक इच्छुकांचा पत्ता आपोआप कट होण्याची भीती आहे. कारण त्या त्या घटक पक्षाला त्यांच्या प्रभावानुसार जागांचे वाटप ह्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनेक इच्छुकांना डावलले जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

या निवडणुका प्रत्येक राजकीय पक्ष स्वतंत्रपणे लढला तरच इच्छुक कार्यकर्त्यांची उमेदवारीची अपेक्षा पूर्ण करणे त्या त्या पक्षाच्या संबंधित नेत्यांना शक्य होणार आहे. महायुती - महाविकास आघाडीने ही निवडणूक एकत्रित लढल्यास अनेक दिवसांपासून निवडणुकीची तयारी करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून बंडखोरी होण्याची भीती आहे. प्रत्यक्षात काय होईल याबद्दल आत्ताच ठामपणे बोलणे शक्य नाही. मात्र, तूर्तास संभाव्य उमेदवारांनी जनसंपर्कावर भर देण्यास सुरुवात केली आहे.

# टीईटीचा विषय निकाली निघेपर्यंत पदोन्नतीबद्दल संभ्रम



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** जिल्हा परिषद, खाजगी शाळांतील शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याची केलेली सक्ती आणखी संपुष्टात आलेली नाही. आता मोठा प्रश्न असा आहे की, टीईटीचा विषय निकाली निघेपर्यंत शिक्षकांना पदोन्नती मिळेल का नाही, याबद्दल शिक्षकांत संभ्रम आहे. शिक्षकांना पदोन्नती मिळण्याची अपेक्षा असली तरी टीईटीचा विषय अडसर ठरण्याची भीतीच आहे.


टीईटी परीक्षा आणि २०२४ मध्ये काढलेले जाचक अध्यादेश मागे घ्यावेत म्हणून शिक्षकांनी गेल्या पाच डिसेंबर २०२५ रोजी शाळा बंद करून मोर्चा काढला. याचा परिणाम फारसा झालेला दिसत नाही. अजून राज्य सरकारने टीईटीसंबंधी पुनर्विचार याचिका न्यायालयात दाखल केलेली नाही. त्यामुळे टीईटीचे संकट पूर्णपणे टळलेले नाही. या टीईटीमुळे शिक्षकांना पदोन्नती मिळण्यात अडचण होणार आहे. राज्य सरकार ठोसपणे शिक्षकांच्या पाठिशी उभे राहात नसल्याने मोठी अडचण होत असून, शिक्षकांची मानसिकता टीईटी देण्याची नाही. शिक्षक म्हणतात, आम्ही जिल्हा निवड समितीद्वारा परीक्षा, मुलाखत देऊन सेवेत आलो आहोत. पुन्हा टीईटी देण्याची अट चुकीची असून, आम्हाला यातून सूट द्यावी, अशी प्रमुख मागणी शिक्षकांनी आहे.

वास्तविक, शिक्षकांची मागणी खरी आहे. त्यांना शाळा करण्याबरोबरच प्रशासकीय कामे, शाळा सांभाळणे आणि आता टीईटी परीक्षा ही अट चुकीचे असल्याचे वाटते. हे खरे असले तरी सरकारने शिक्षकांबाबत सहानुभूतीने विचार करण्याची गरज आहे. पदोन्नतीस टीईटी अट अडसर ठरण्याची शंका शिक्षक बोलून दाखवत आहेत.

# ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांचे आज जाहीर व्याख्यान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना आज, रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी प्रदान केला जाणार आहे. त्यावेळी ते 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देतील. हा कार्यक्रम सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृहात होणार आहे.



**मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराचे आज वितरण**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री दिलीपराव देशमुख व समाजवादी नेते सुभाष वारे उपस्थित राहणार आहेत.

ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज इंडियाचे संयोजक व भारत ओडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

प्रशांत भूषण हे भारतातील सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता, लेखक, सामाजिक आणि जनहित याचिका (पीआयएल) लढवणारे प्रसिद्ध व सार्वजनिक हिताचे वकील आहेत. ते भ्रष्टाचार, राजकीय आणि प्रशासकीय दुरुपयोग, पर्यावरणीय समस्या आणि नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्यांचा कायदेशीर आवाज म्हणून ओळखले जातात.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी मंचातर्फे करण्यात आले आहे.


# स्व. शिवराज पाटील चाकूरकरांच्या नावाने राज्य, केंद्रीय विद्यापीठाची मागणी

**व्यापक पाठपुरावा करणार; लवकरच बैठक-डॉ. जगन्नाथ पाटील यांची माहिती**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** स्व. माननीय शिवराज पाटील (चाकूरकर) यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ लातूर येथे त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी डॉ. जगन्नाथ शामराव पाटील यांनी राज्य व केंद्र शासनाकडे औपचारिक निवेदनाद्वारे केली आहे. राज्य शासनाकडे स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) राज्य विद्यापीठ स्थापन करण्याची, तर केंद्र शासनाकडे केंद्रीय विद्यापीठाची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व माननीय केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केंद्रीय विद्यापीठासाठी सविस्तर निवेदन पाठवण्यात आले असून, ई-मेलद्वारेही याचा पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच राज्य विद्यापीठाच्या मागणीसाठी माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडेही निवेदने सादर करण्यात आली आहेत.



या मागणीच्या अनुषंगाने लवकरच व्यापक स्वरूपात बैठक बोलावण्यात येणार असून, या बैठकीत शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, शिवराज पाटील यांचे प्रेमी, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व सर्वपक्षीय कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. सर्व संबंधित लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकार्यांकडे प्रत्यक्ष भेटीची वेळ घेऊन निवेदन देण्याचे नियोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून संघटित व प्रभावी पाठपुरावा करण्यात येणार आहे. याचबरोबर स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) यांच्या कुटुंबीयांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात येणार आहे. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना निवेदन सादर करून या मागणीच्या पाठपुराव्यासाठी सहकार्य करण्याची विनंती करण्यात येणार आहे. शिवराज पाटील यांचे महाराष्ट्रभरातील व देशभरातील समर्थक, अनुयायी आणि सुजाण नागरिकांना आवाहन करण्यात येणार असून, त्यांनी एकत्र येऊन राज्य विद्यापीठ व केंद्रीय विद्यापीठ या दोन्ही मागण्यांसाठी सक्रिय पाठपुरावा करावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) हे सुमारे सहा ते सात दशके सार्वजनिक जीवनात कार्यरत राहिलेले, अतिशय शिस्तप्रिय, चारित्र्यवान, अभ्यासू व चिंतनशील व्यक्तिमत्त्व होते. नगराध्यक्ष, आमदार, विधानसभा अध्यक्ष, खासदार, केंद्रीय गृहमंत्री, संरक्षणमंत्री तसेच लोकसभेचे अध्यक्ष अशी अनेक सर्वोच्च पदे भूषवूनही त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीवर कधीही भ्रष्टाचाराचा डाग लागला नाही. संविधाननिष्ठ विचार, साहित्यिक जाण तसेच विज्ञान व अध्यात्माची सांगड हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. मराठवाड्यासारख्या मागास भागातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतिनिधित्व करणार्या या महान नेतृत्वाच्या नावाने विद्यापीठ स्थापन झाल्यास मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनाची प्रेरणा भावी पिढीला मिळेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# आगामी महानगरपालिका निवडणुकीत जैन समाज निर्णायक भूमिकेत : संदीप भंडारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** व्यापार, उद्योग, सहकार, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात देशाला दिशा देणारा जैन समाज आता राजकारणातही निर्णायक व नेतृत्वाची भूमिका घेण्यासाठी पूर्णतः सज्ज झाला

**एकट्या भाजपाकडून १५० हून अधिक जैन उमेदवार निवडणूक लढण्यासाठी इच्छुक, प्रत्येक महापालिकेत भाजपाचा भगवा फडकवण्याचा निर्धार**

आहे. संकटाची वेळ असो वा नैसर्गिक आपत्ती, जैन समाजाने नेहमीच तन-मन-धनाने समाजसेवेत पुढाकार घेतला आहे. देशाच्या जीडीपीमध्ये भरीव योगदान देणारा हा समाज आता संघटितपणे राजकारणात उतरून आपली ताकद दाखवत आहे, असे प्रतिपादन भाजपा जैन प्रकोष्ठाचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांनी केले.

जैन समाज हा भारतीय जनता पक्षाचा पारंपारिक, विश्र्वासू व विचारांशी बांधील मतदार राहिला आहे. २०२१ मध्ये तत्कालीन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनी महाराष्ट्रात देशात प्रथमच भाजपा जैन प्रकोष्ठाची स्थापना करून जैन युवकांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले. या प्रकोष्ठाच्या प्रदेशाध्यक्षपदी संदीप भंडारी



यांची नियुक्ती झाल्यानंतर अल्पावधीतच राज्यभर हजारो जैन समाजातील सामाजिक कार्यकर्ते भाजपाशी जोडले गेले आणि भाजपा जैन प्रकोष्ठ एक मजबूत, शिस्तबद्ध व प्रभावी संघटन म्हणून उभे राहिले.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा जैन प्रकोष्ठाच्या कार्यकर्त्यांनी बूथ पातळीवर प्रभावी कामगिरी करत जैन समाजातील मतदानाचा टक्का लक्षणीयरीत्या वाढवला. या यशानंतर आता आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक महापालिकेत भाजपाचा भगवा फडकवण्याचा ठाम संकल्प जैन समाजाने केला आहे. अखिल भारतीय अल्पसंख्यांक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी व भाजपा जैन प्रकोष्ठाचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांच्या नेतृत्वाखाली एकट्या भाजपाकडून १५० हून अधिक जैन कार्यकर्ते महानगरपालिका निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. जैन समाजाच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर संघटित व आक्रमक राजकीय सहभाग पाहायला मिळत असून, ही बाब येणाऱ्या निवडणुकांत निर्णायक ठरणार आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर भाजपा जैन प्रकोष्ठाने मागील ८ महिन्यांपासून नियोजनबद्ध व व्यापक निवडणूक तयारी सुरू केली आहे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी महापालिका-निहाय कोअर कमिट्या जाहीर करण्यात आल्या असून, प्रत्येक प्रभागात जैन समाजाची प्रभावी राजकीय उपस्थिती निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जैन समाज तन-मन-धनाने भाजपाच्या पाठीशी उभा राहून महापालिकांमध्ये भाजपाला अधिक बळकट करेल, असा ठाम विश्र्वास संदीप भंडारी यांनी व्यक्त केला.

भाजपाने नेहमीच जैन समाजाच्या हितासाठी ठाम भूमिका घेत ठोस निर्णय राबवले आहेत. जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ ची स्थापना व निधीची तरतूद, मरीन ड्राईव्ह येथे जैन जिमखान्यासाठी अडीच एकर भूखंड, भगवान महावीर २५५० वा निर्माण कल्याणक महोत्सव प्रथमच राज्यस्तरावर साजरा करणे, मुख्यमंत्री जेष्ठ नागरिक तीर्थयात्रा योजनेत १२ जैन तीर्थस्थळांचा समावेश, गोमातेला 'राज्यमाता' घोषित करणे व गोवंशासाठी प्रतिदिन १०० अनुदान यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांमुळे जैन समाजाचा विश्र्वास भारतीय जनता पक्षावर अधिक दृढ झाला आहे. युती सरकारने व्यापार व उद्योग क्षेत्रासाठी घेतलेल्या दूरदृष्टीपूर्ण व विकासाभिमुख निर्णयांमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये जैन समाज महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभा राहील असा विश्वास जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला आहे.

## आज राज्यस्तरीय धनगर समाज वधु-वर परिचय मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळ, लातूर यांच्या विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धनगर समाजाचा २० वा राज्यस्तरीय वधु - वर परिचय मेळावा आज सकाळी १०.०० वा. विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड लातूर येथे संपन्न होणार आहे.

तरी या मेळाव्यासाठी उद्घाटक म्हणून होळकर घराण्याचे वंशज स्वप्निलराजे होळकर हे तर प्रमुख पाहुणे म्हणून होळकरशाही अभ्यासक प्रा. डॉ. कुंभारगावे उपस्थित राहणार आहेत.

तरी या भव्य दिव्य वधु वर परिचय मेळाव्यास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून उपरोक्त मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यातून लम्पी साथ हदपार होतेय!

लातूर : गेल्या पावसाळ्यात गोवंशास लम्पी साथीने घेरल्याने पशुसंवर्धन विभागाची मोठी पंचाईत झाली. लम्पी साथीवर रामबाण लस अथवा औषध गोळ्या नसल्याने पशुसंवर्धन विभागाने कोरोना पॅटर्नसारखी लस जिल्ह्यातल्या गोवंशास दिली. ही लस प्रतिकारशक्ती वाढविणारी असली तरी त्याचा लाभ होईलच, असे सांगता येत नाही, असे एका पशुसंवर्धन विभागातल्या अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

आता लम्पी साथ जिल्ह्यातून हदपार होत असल्याचे चित्र आहे. तरी समूळ उच्चाटन आणखी झालेले नाही. गोवंशास लम्पी साथीने घेरल्याने लातूर जिल्ह्यातील गोवर्गीय जनावरांची संख्या रोडावली. परिणामी, जनावरांच्या बाजारात बेभाव गाय, कालवड, बैल विक्रीचा सपाटा पशुपालक, शेतकऱ्यांनी लावला होता. ऐन पावसाळ्यात लम्पी साथीने डोकेवर काढल्याने ती अटोक्यात आणण्याचे आव्हान पशुसंवर्धन विभागासमोर होते. सततचा पाऊस अन् साथीचा पसरता आवाका पाहून पशुसंवर्धन विभाग हतबल होण्याच्या स्थितीत आला होता. आता एक महिन्यापासून लम्पी साथ हळूहळू कमी होत असून, आणखी संपूर्ण प्रभाव ओसरलेला नाही.

गोवंशावर हे क एक प्रकारचे संकटच होते. जसे माणसावर कोरोनाचे होते तसे. आता परिस्थिती अटोक्यात येत असली तरी गोवंशाची संख्या रोडावल्याचे चित्र असून, नेमके किती कमी झाले अजून स्पष्ट झालेले नाही. गेल्या मार्च-एप्रिल महिन्यात झालेल्या पशुगणनेचा अहवाल प्रसिद्ध न झाल्याने गोवंशाची संख्या किती आहे, हे स्पष्ट होऊ शकले नाही. केंद्र सरकार पशुगणनेचा अहवाल जाहीर करणार आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यात नेमकी पशु संख्या किती हे कळू शकलेले नाही. मात्र, गोवंशावरील लम्पी साथीचे संकट हादपार होत असून, ते लवकरच संपुष्टात येईल, असे पशुसंवर्धन विभागाच्या सूत्रांनी सांगितले

# पोलिसांनी पकडलेल्या गुटख्याची केली होळी



**त.भा. वृत्तसेवा,**
**किनगाव, २० डिसेंबर :** किनगाव पोलीस स्टेशन येथे २१८ ते २२५ या कालावधीत वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये वेळोवेळी गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. दर गुन्ह्याचा तपास करून मान्य, न्यायालयात आरोप पत्र दाखल करण्यात आले आहे. परंतु जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशन येथे पडून होता. स पो नि डोके यांनी सदरचा मुद्देमाल नष्ट करण्याची परवानगी मागितली होती.

### १५,१४,८५७ रुपये किमतीचा गुटखा नष्ट केला

माननीय न्यायालयाने सदरचा मुद्देमाल नष्ट करण्याबाबत अन्न व औषध प्रशासनाला आदेश दिले होते. आज रोजी अन्न व औषध प्रशासनाचे अन्नसुरक्षा अधिकारी श्री लोंढे साहेब हे त्यांच्या पत्रासह किनगाव पोलीस स्टेशन येथे आले.

यावेळी सपोनि डोके, पोलीस उपनिरीक्षक शिरसाट, सहायक फौजदार डोईजड, हवालदार इस्थळकर, काळे, पोलीस अंमलदार कोतवाड यांनी दोन पंचा समक्ष सदरचा गुटख्याचा मुद्देमाल पंचनामा करून व व्हिडिओ ग्राफी करून नष्ट केला.

# दुग्धविकास विभागाचे सचिव रामास्वामी यांची उदगीर शासकीय दूध डेअरीला भेट

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २० डिसेंबर :** महाराष्ट्र शासनाच्या दुग्धविकास विभागाचे सचिव मा. रामास्वामी ख-ड यांनी आज उदगीर शासकीय दूध डेअरी प्रकल्पाला भेट दिली. या वेळी शासकीय दूध योजना पुनर्जीवन समितीच्या वतीने त्यांचे उदगीर शासकीय दूध डेअरी येथे स्वागत करण्यात आले.

या भेटीदरम्यान त्यांनी प्रकल्पाची सखोल पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी मा. रामास्वामी यांनी सांगितले की, उदगीर शासकीय दूध डेअरी प्रकल्पाची जमीन राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळकडे हस्तांतरित करण्याबाबत महाराष्ट्र शासन सकारात्मक आहे. या निर्णयामुळे उदगीर व परिसरातील शेतकरी, दूध उत्पादक आणि स्थानिक रोजगाराला मोठा लाभ होणार आहे. तसेच, प्रकल्पकडे हस्तांतरित झाल्यानंतर सध्या चांगल्या स्थितीत असलेली यंत्रसामग्री उदगीर डेअरी कॉलेजकडे हस्तांतरित करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शासन स्तरावर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लवकरच पुढील निर्णय घेतला जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



# समाज विकासात अल्पसंख्याकांचे योगदान समजून घ्या : प्रा. शहाजिंदे




**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २० डिसेंबर :** अल्पसंख्यांक समाज व जातीचा विचार केला तर त्यात अनेक जाती व धर्मांचा समावेश होतो. परंतु अलीकडे अल्पसंख्याकांची व्याख्या बदलत चाललेली आहे. ही भूमिका बदलण्याची गरज आहे. वारकरी संप्रदायाबरोबरच सुफी संप्रदायानेही महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेला समृद्ध केलेले आहे. शेख महंमद, शहामुनी यासारख्या सुफी संत कवींनी मराठीत साहित्य निर्मिती करून ही भक्ती परंपरा समाजात रुजवलेली आहे. समाज विकासातील त्यांचे हे कार्य महत्त्वपूर्ण आहे असे मत कवी, कादंबरीकार ज्येष्ठ साहित्यिक प्रा.फ.म.शहाजींदे यांनी व्यक्त केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा उद्देश व भूमिका डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी मांडली. विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महात्मा गांधी महाविद्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, २० डिसेंबर :** येथील विचार विकास मंडळ संचलित, महात्मा




गांधी महाविद्यालयात अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'अल्पसंख्याक हक्क दिवस' साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे प्रा. अमोल राजपंखे यांनी अल्पसंख्याक समुदाय हा धार्मिक व भाषिक या पार्श्र्वभूमीवर कसा ठरवला जातो हे सांगून अल्पसंख्याकांचे हक्क, अधिकार, संरक्षण तसेच, राज्यघटनेतील कलम २९ व ३० नुसार संविधानाने अल्पसंख्याक समुदायासाठी केलेल्या तरतुदींची माहिती देऊन अल्पसंख्याक दिवसाचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. डॉ. अनिल कांबळे हे उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी मानव समुदाय हा एकच आहे. तरी पण या जगात अनेक धर्म, अनेक जाती, अनेक पंथ माणसाने निर्माण केले. जो समुदाय विकासा पासून कोसो दूर आहे, त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले पाहिजे, तसेच मानवी जीवन सुखकर करण्यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे. आपल्या संविधानाने सर्वांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयीन शिक्षण घेत स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. तसेच जिद्द, चिकाटी या गुणावरच तो आपल्या यशाच्या उंच शिखरावर जातो. असे सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. डॉ. आर. डी. भामरे मॅडम यांनी केले.

आपल्या प्रास्ताविकात त्या म्हणाल्या की, आपला देश विविधतेने नटलेला आहे. येथे वेगवेगळे धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असलेले लोक राहतात. हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने घोषीत केला, त्यामुळे समाजात एकता, बंधुता, व सहिष्णुता वाढवून शांततामय समतावादी समाज निर्माण करणे हेच या दिवसाचे खरे महत्व आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. आर. डी गुळवे यांनी केले.

याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा.ए.एन. शिंदे, प्रा. पी.पी. डवरे, प्रा. बी.डी. गुरनाळे, प्रा. एच.एम. खिंडीवाले तसेच महाविद्यालयतील विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राम मुंढे, सुधाकर कदम, सुनिल राठोड, संभाजी मुंढे यांनी परिश्रम घेतले.



# शास्त्री विद्यालयात संत गाडगे महाराजांना अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २० डिसेंबर :** उदगीर येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्ताने कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे अँड. शिवाजी बिराजदार उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर,गौतम शिंदे,पर्यवेक्षक कृष्णा मारावार माधव मठवाले किरण नेमट नीता मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या वक्त्या नीता मोरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच स्वच्छतेविषयी माहिती दिली गाडगे गाडगेबाबा कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देत व समाज प्रबोधन करत असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वागत परिचय, प्रास्ताविक व आभार निलेश मांडवकर यांनी मानले.



# आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे यश

**त.भा. वृत्तसेवा,**
**देवणी, २० डिसेंबर :** सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन रसिका शैक्षणिक संकुलनामध्ये पार पडले. यामध्ये माध्यमिक विभागातून देवणी तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. यामध्ये हुले साक्षी व हडबे उमेश या विद्यार्थ्यांनी सोलार सिस्टम वरती आपला प्रयोग सादर केला. या प्रयोगासाठी मार्गदर्शक म्हणून माने शुभांगी व गणेश खोंडे यांनी मार्गदर्शन केले.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये प्राथमिक गटातून पवार उमाकांत यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर माध्यमिक गटातून तारीख भट्ट यांनी तृतीय क्रमांक पटकावला. परिचारक म्हणून शाळेने भाग नोंदवला होता. त्यामध्ये देवणी तालुक्यातून प्रथम क्रमांक कांबळे ज्योती यांनी पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपाणीकर, सचिव गजानन भोपाणीकर यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्राचार्य शफी अहमद भट, डॉ. सत्यवान सोनटक्के, उपप्राचार्य रामदास नागराळे व सौ श्रद्धा घोलपे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पदव्युत्तर व्यवसाय व्यवस्थापन संस्थेस कै.चाकूरकरांचे नाव द्या

## ■ पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी चाकूर काँग्रेसची सहकारमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, २० डिसेंबर :** चाकूर नगरीचे भुमिपुत्र कै.शिवराज पाटील चाकूरकर यांचे नाव चाकूर शहरातील पदव्युत्त कृषी व्यवसाय व्यवस्थापन संस्थेला देण्याची मागणी सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्याकडे चाकूर काँग्रेसच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली.

स्वर्गीय शिवराज पाटील चाकूरकर यांचे नाव चाकूर येथील पदव्युत्त कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयास कै. शिवराज पाटील चाकूरकर यांचे नाव द्यावे तसेच चाकूर येथील तहसील कार्यालया समोरील प्रांगणात किंवा पंचायत समिती कार्यालया समोरील प्रांगणात कै.शिवराज पाटील चाकूरकर यांचा पुतळा उभा करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

स्वर्गीय शिवराज पाटील चाकूरकर यांचे जन्म गाव हे आपल्या मतदार संघातील असुन स्वर्गीय शिवराज



चाकूरकर यांच्या आयुष्यात चाकूरचे नव्हे तर आपल्या जिल्हाचे नाव संपूर्ण भारतात प्रसिद्ध केले आहे. यांच्या आयुष्यातील ६० वर्षाच्या राजकीय प्रवासात यांनी लातूर नगराध्यक्ष, लातूरचे आमदार, महाराष्ट्राचे मंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष, अध्यक्ष, तसेच लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार, भारताचे केंद्रीय मंत्री, लोकसभा उपाध्यक्ष, लोकसभा अध्यक्ष, भारताचे केंद्रीय गृहमंत्री तसेच पंजाबचे राज्यपाल असे विविध पदे भूषविली आहेत. या संपूर्ण कार्यकाळ त्यांनी जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून देश सेवा केली आहे.यांच्या आयुष्यात यांनी स्वतःचे कधीही हित समोर ठेवून कार्य केले नाही. यांच्या पुर्ण राजकीय काळात यांच्या वर कोणताही डाग लागला नाही. त्यांनी देश सेवा करत आपल्या जन्म गावाला विसरले नाही. त्यांच्याच शिफारशी वरून चाकूर तालुका झाला, त्यांच्यामुळे चाकूर येथे बी. एस. एफ चे मोठे ट्रेनिंग सेंटर झाले. आणि कै.चाकूरकर यांच्याच शिफारशीवरून महाराष्ट्र शासनाने चाकूर येथे कृषी विभागाचे पदव्युत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय स्थापना केले आहे. अशा निष्कलंक, विद्वान, राजकीय संत असलेल्या अशा महान व्यक्तीची पुढच्या पिढीला आठवण रहावी म्हणून चाकूर येथील महाराष्ट्र शासनाच्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयास स्वर्गीय शिवराज पाटील चाकूरकर पदव्युत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय असे नाव देऊन खरीआदरांजली अर्पण करण्यात यावी. याच बरोबर चाकूर येथील तहसील कार्यालया समोरील प्रांगणात किंवा पंचायत समिती कार्यालया समोरील प्रांगणात स्वर्गीय शिवराज पाटील चाकूरकर यांचा पुर्ण आकृती पुतळा उभारण्यात यावा.ही मागणी महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करवून घेऊन कै.शिवराज पाटील चाकूरकर यांचा आदर्श आपल्या माध्यमातून पुढे चालवावी अशी विनंती वजा मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने केली आहे.

निवेदनावर शहर अध्यक्ष हुसेन शेख, गंगाधर केराळे, सलीम तांबोळी, सचिन चाकूरकर, शिवकुमार गादगे, शेख युसुफ, असलम हरनमारे, अझर सौदागर, शेख गौसपाशा, मनोज बिरादार आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# उदगीर-निलंगा मार्गावर एस.टी.चा बोजवारा

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, २० डिसेंबर :** उदगीर-निलंगा या प्रमुख मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एस.टी.) शिवशाही बस प्रवासी नसतानाही नियमितपणे धावत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. दिवसभर ठराविक फेऱ्यांमध्ये ही बस जवळजवळ रिकामीच धावत असल्याने महामंडळाच्या आर्थिक नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

संबंधित मार्गावर प्रवाशांची संख्या ग्रामीण भागातील असतानाही शिवशाहीसारखी वातानुकूलित व खर्चिक बस चालवली जात असल्यामुळे इंधन, चालक-वाहक वेतन तसेच देखभाल खर्चात मोठी वाढ होत आहे. प्रवाशांच्या अभावामुळे उत्पन्न नगण्य राहात असून तोट्याचा फटका थेट महामंडळालाच बसत आहे. स्थानिक प्रवाशांच्या मते, या मार्गावर साधी लालपरी किंवा वेळापत्रकात बदल करून बससेवा चालवणे अधिक योग्य ठरेल. शिवशाही बस प्रामुख्याने लांब पल्ल्याच्या व प्रवासी गर्दी असलेल्या मार्गांवरच चालवाव्यात, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, एस.टी. प्रशासनाने प्रवासी मागणीचा आढावा घेऊन वेळापत्रकात

### एसटी महामंडळाची जत्रा आणि कारभारी सतरा

बदल करावा, आवश्यक नसलेल्या फेऱ्या रद्द कराव्यात तसेच आर्थिक शिस्त राखावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. योग्य नियोजन न झाल्यास सार्वजनिक पैशाचा अपव्यय थांबवणे कठीण होणार असल्याचे मत प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.उदगीर-निलंगा या महत्त्वाच्या मार्गावर एस.टी. महामंडळाची बससेवा सध्या पूर्णतः विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. कधी साध्या बसेस एकामागोमाग चार-चार येतात, तर कधी तब्बल दोन-दोन तास एकही बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे, या मार्गावर शिवशाही बस विना प्रवासी फिरत असताना साध्या बसेसच्या वेळापत्रकाचे कोणतेही नियोजन नसल्याचे दिसून येते. एकाच वेळी अनेक बसेस आल्यामुळे प्रवाशांची संख्या विभागली जाते, तर त्यानंतर बराच काळ बससेवा खंडित राहिल्याने विद्यार्थी, नोकरदार, महिला व ज्येष्ठ नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बस वेळेत न आल्यामुळे कामावर पोहोचण्यास उशीर होतो, तर ग्रामीण भागातील प्रवाशांचे हाल अधिक वाढतात. एस.टी. प्रशासनाने प्रवासी मागणीचा अभ्यास करून बसेसचे योग्य नियोजन करावे, फेऱ्यांमध्ये योग्य अंतर राखावे अशी जोरदार मागणी होत आहे.

योग्य नियोजनाअभावी एकीकडे शिवशाही बस रिकामी धावत आहेत, तर दुसरीकडे साध्या बसेसच्या प्रतीक्षेत प्रवाशांना तासन्तास थांबावे लागत असल्याने एस.टी. महामंडळाच्या कारभारावर नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. आणि मग हेच महामंडळ नंतर आरडाओरड करते ही एसटी ही तोट्या मध्ये आहे असे ढिसाळ नियोजना असेल तर एसटी फायद्यात कशी येईल?

प्रवाशांच्या सेवेसाठी म्हणून शिवशाही बस सुरू करण्यात आली असली तरी ग्रामीण भागातील प्रवाशांना परवडणारे तिकीट या बसला नाही. त्यामुळे नेमकी सेवा ही प्रवाशांची चालू आहे की, महामंडळाची आहे? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

# तुगाव विकासासाठी ७५ लाखांचा निधी मंजूर

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, २० डिसेंबर :** भालकी तालुक्यातील तुगाव (हा) येथील गावाच्या सर्वांगीण विकासासाठी बिदर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कर्नाटक राज्याचे कॅबिनेट जैव-वन मंत्री मा. ईश्वर खंडरे यांच्या विशेष प्रयत्नातून एकूण ७५ लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून गावातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर सिमेंट काँक्रिट रस्ते व गटार बांधकामाची कामे सुरू करण्यात आली आहेत.

ग्रामस्थांची ही मागणी लक्षात घेऊन पालकमंत्री मा. ईश्वर खंडरे यांनी तात्काळ प्रतिसाद देत अजून १५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले. यामुळे तुगावच्या विकासासाठी एकूण ७५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला



असून, गावातील रस्ते व गटारांची समस्या कायमची मार्गी लागणार आहे.

या सर्वांगीण विकासकामांचे भूमिपूजन ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. सविता सतीश पिचरुटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीचे पीडीओ मगर गणपत पाटील, गुत्तेदार संगमेश हुनजे, तसेच माधव पिचारे, सुधाकर सूर्यवंशी, केशव कलबोने, सुरेश बावगे, कामाजी लिंबोणे, संभाजी लिंबोणे, वसंत साळुंखे, मकबूल पटेल, मधुकर बावगे, रमेश बावगे, शिवराज बावगे, सतीश मिरकले, जाफर मुजावर, बालाजी डोंगरे, गुरुनाथ बावगे, बालाजी आडबोळे, शिवलिंग चिटमे, सौ. शिवकांता चिटमे, महालिंग लासोने, बसवराज स्वामी, पाशा शेरीकार यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतशिवार बहरले, गावागावांत शुकशुकाट; वेळा अमावास्या साजरी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० डिसेंबर -**

देवधानोरा परिसरात पारंपरिक 'वेळा अमावस्या' हा सण मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या दिवशी शेतात वनभोजनासाठी शेतकरी कुटुंबीय, मित्रमंडळी एकत्र आल्याने शेतशिवार अक्षरशः फुलून गेले होते.

मात्र, याच वेळी गावोगावी शुकशुकाट जाणवत होता. जणू काही गावे अघोषित बंद असल्याप्रमाणे ओस पडली होती.

देवधानोरासह परिसरातील गोविंदपूर, बोरगाव (बुद्रुक), गौरगाव, नागुलगाव, हासेगाव (शि.), एकुरका, जवळा (खुर्द), बोरवंटी, भाटशिरपुरा, डोळा, पिंपळगाव, मंगरूळ, माळकरंजा, देवळाली आदी गावांतील शेतकऱ्यांनीही वेळा अमावस्या मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातून आलेल्या पाहुण्यांनी शेतशिवारातील गावरान मेवा, निसर्गसौंदर्य व आपुलकीचा अनुभव घेत आनंद व्यक्त केला.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कडब्याची कोपी उभारून लक्ष्मी व पाच पांडवांची विधीवत पूजा केली. पूजेनंतर शेतात सर्वत्र अंबिल शिंपडत चांगभलं, चांगभलं, पाऊस आला घरला चला असा जयघोष करण्यात आला.



## गुंजोटी येथे महिलांसाठी आरि वर्क्स प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० डिसेंबर -**

दिक्षा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने महिलांना स्वावलंबी, सक्षम व आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने आरि वर्क्स प्रशिक्षण कार्यक्रमाचा भव्य शुभारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सरपंच कौशल्य सुनील बेळमकर उपस्थित होत्या.

अध्यक्षस्थानी विभावरी शाईवाले काकू (अध्यक्ष श्रीकृष्ण शिक्षण संस्था, गुंजोटी) होत्या, तर समारोप अध्यक्ष म्हणून धनश्री रवींद्र ढंगे (माजी जिल्हा परिषद सदस्य) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर डॉ. अनिस शेख, ऋतुजा पाटील, सरस्वती कारे, रेखा पवार, विजया चव्हाण, सुरेखा भोसले, शैला लोखंडे, शितलताई रंगदळ, अस्मिता सूर्यवंशी, विद्या ताकमोगे व वैशाली जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात मान्यवरांनी महिलांनी कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराकडे वाटचाल करावी, शासकीय योजना, बचतगट, पंचायत राज व्यवस्था व महिलांच्या नेतृत्वाच्या संधींचा प्रभावी वापर करावा, असे मार्गदर्शन केले. महिलांनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता समाज व गावाच्या सर्वांगीण विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. तन्मय शेटगार यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन दिक्षा साखरे यांनी मानले.

या कार्यक्रमास गावातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

दिक्षा बहुउद्देशीय सामाजिक संस्था भविष्यातही महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

## स्काऊट-गाईडतर्फे 'खरी कमाई' स्टॉलला प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० डिसेंबर -**

हायस्कूल लोहारा भारत स्काऊट-गाईडच्या वतीने आयोजित ५३ व्या तालुका विज्ञान प्रदर्शनात 'खरी कमाई' या उपक्रमांतर्गत दि. १७ डिसेंबर रोजी खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले. या स्टॉलवरील विविध खाद्यपदार्थांचा तालुक्यातील विविध शाळांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला.

लोहारा पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने हायस्कूल लोहारा येथे तालुका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने हायस्कूल लोहारा स्काऊट-गाईडच्या टीमने भेळ, रस, पाणीपुरी, चहा, वडापाव, केक आदी खाद्यपदार्थांचे एकूण आठ स्टॉल उभारले होते. खाद्यपदार्थ खरेदीसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या स्टॉलचे संचालन वैष्णवी बायस, हर्षदा घोडके, वैष्णवी पाटील, वैष्णवी गुरव, दिक्षा कार्ले, महादेवी गिराम आदी विद्यार्थिनींनी केले.

'खरी कमाई' या उपक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी शिवशरण बिराजदार यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापक दयानंद पोतदार, विस्तार अधिकारी चंदनशिवे, स्काऊट मास्टर वैजनाथ पाटील, शिल्पा साबणे व स्वाती माशाळकर उपस्थित होते.

## मोहेकर महाविद्यालयाला विद्यापीठ अंकेक्षणात 'अ' ग्रेड




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० डिसेंबर -**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आलेल्या प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षण तपासणीत महाविद्यालयाला 'अ' ग्रेड प्राप्त झाला आहे. या मानांकनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जा व विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.

विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयाला भेट देऊन विविध निकषांवर सखोल आढावा घेतला. यामध्ये अध्यापन व संशोधनातील नाविन्यपूर्ण पद्धती, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय व पायाभूत सुविधा, विद्यार्थी विकासासाठीचे उपक्रम, प्लेसमेंट सेल, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम, तसेच आर्थिक पारदर्शकता व प्रभावी अंतर्गत गुणवत्ता हमी प्रणाली या बाबींचा समावेश होता. समितीने महाविद्यालयातील विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन व गुणवत्ता वृद्धीसाठीचे सातत्यपूर्ण प्रयत्न यांचे विशेष कौतुक केले.

या यशामागे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल मोहेकर, उपाध्यक्ष प्रा. आबासाहेब बारकुल, सचिव डॉ. अशोकराव मोहेकर तसेच सर्व संचालक मंडळाचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. हेमंत भगवान यांच्या नेतृत्वाखाली उपप्राचार्य डॉ.के.डी. जाधव, नॅक समन्वयक प्रा.ए.आर. मुखेडकर, तसेच समिती सदस्य डॉ. महाजन, डॉ. मीनाक्षी जाधव, प्रा. अंकुशराव, डॉ. वेदपाटक, डॉ. राठोड, डॉ. पावडे, डॉ. साठे, डॉ. वाळके, डॉ. चांदोरे, डॉ. फाटक, डॉ. दत्ता साकोळे, डॉ. सूर्यवंशी, डॉ. गुंडरे, डॉ. सावंत, डॉ. अदाटे, डॉ. उंदरे, डॉ. ढोले, डॉ. भोसले, डॉ. म्हस्के, अधीक्षक हनुमंत जाधव, संतोष मोरे, अरविंद शिंदे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या नियोजनबद्ध कार्याचे हे फलित मानले जात आहे.

या मानांकनामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला असून, आगामी चतुर्थ नॅक मूल्यांकनासाठी हे यश अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाच्या अधिक संधी व स्पर्धात्मक शैक्षणिक वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल कळंब परिसरासह शैक्षणिक क्षेत्रातून मोहेकर महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## लढण्याची प्रेरणा बाबा आढाव व पन्नालाल सुराणा यांच्याकडूनच मिळाली : अण्णा तोडकर



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० डिसेंबर -**

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, हक्क, माणुसकी आणि समाजबांधिलकी पोहोचवण्याची शिकवण ज्येष्ठ समाजसुधारक डॉ. बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा (भाऊ) यांच्याकडूनच मिळाली. त्यांच्या विचारांमुळेच माझ्या जीवनाला दिशा मिळाली, असे भावनिक उद्गार पर्याय सामाजिक संस्थेचे सर्वेसर्वा व लोकविकास मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांनी काढले.

ते डॉ. बाबा आढाव यांच्या श्रद्धांजली सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी डॉ. बाबा आढाव व पन्नालाल सुराणा यांनी समाजातील शेवटच्या वंचित घटकांसाठी-हमाल, माथाडी तसेच कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांसाठी-आयुष्यभर दिलेल्या लढ्याची आठवण करून दिली व त्यांच्या सहवासातील अनुभव सांगितले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनीही डॉ. बाबा आढाव, पन्नालाल सुराणा व माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील (चाकूरकर) यांच्या सामाजिक कार्यावर आपले विचार व्यक्त केले.

स्वराज इंडिया, स्वराज अभियान व भारत जोड अभियान यांच्या वतीने ही श्रद्धांजली सभा दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरातील विरंगुळा केंद्रात संपन्न झाली.

या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी जन सुरक्षा विधेयक विरोधी कृती समिती, कळंब तालुका अध्यक्ष सी. आर. घाडगे होते.

यावेळी पन्नालाल सुराणा व शिवराज पाटील (चाकूरकर) यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात सी. आर. घाडगे यांनी, डॉ. बाबा आढाव यांचे विचार केवळ स्मरणापुरते न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे सांगत जन सुरक्षा विधेयकाबाबत जनजागृती व लोकशाही मार्गाने होणाऱ्या संघर्षाची भूमिकाही स्पष्ट केली.

या सभेचे सूत्रसंचालन स्वराज इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुभाष घोडके यांनी तर प्रस्तावना शहराध्यक्ष माधवसिंग राजपूत यांनी केली. दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या सभेस ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, ज्येष्ठ साहित्यिक के.व्ही. सरवदे, रमेश बोर्डेकर, शीलवंत बाप्पा, यशवंत हौसलमल, बाबुराव पौळ, सेवानिवृत्त मुख्याध्यापक दादा हरी मोराळे, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ज्येष्ठ नेते भास्कर सोनवणे, मुख्याध्यापक संतोष भोजने, सुभाष गायकवाड, सुरेंद्र चिलवंत, सचिन क्षिरसागर, अविनाश घोडके यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षणाधिकाऱ्यांच्या निलंबनाच्या मागणीसाठी पुण्यात बेमुदत आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके यांच्या कथित भ्रष्ट व बेकायदेशीर कारभाराविरोधात कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, या मागणीसाठी प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी संघटनांच्या वतीने पुणे येथे बेमुदत आंदोलन व उपोषण सुरू करण्यात आले आहे.

हे आंदोलन महाराष्ट्र राज्य शिक्षण आयुक्त, पुणे तसेच शिक्षण संचालक कार्यालयासमोर दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू आहे. संघटनांच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयाचे शिक्षक कोहिनूर सय्यद हे दि. ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले असून, सेवानिवृत्तीनंतर चार महिने उलटूनही त्यांचे पेन्शन प्रकरण मंजुरीसाठी पुढे पाठविण्यात आलेले नाही.




संघटनांचा आरोप आहे की, कोणतेही ठोस कारण नसताना व अनावश्यक आक्षेप घेत संबंधित प्रकरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आले आहे. यावेळी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा संदर्भ देत स्पष्ट केले की, शिक्षक अथवा कर्मचारी दोषी असला तरीही पेन्शन मिळणे हा त्याचा कायदेशीर हक्क आहे आणि शासन किंवा अधिकारी पेन्शन अडवू शकत नाहीत.

या प्रकरणी शिक्षणाधिकारी यांच्याकडे वेळोवेळी आवश्यक कागदपत्रे सादर करूनही पेन्शन प्रकरण मंजूर करण्यात आले नसल्याने संघटनांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. अशाच प्रकारची अनेक प्रकरणे प्रलंबित असून, त्यामुळे जिल्ह्यातील अनेक शिक्षक व कर्मचारी पीडित असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकारी सुधा साळुंके यांच्या तात्काळ निलंबनाची मागणी करत हे बेमुदत उपोषण सुरू असल्याची माहिती शिक्षक संघटनेचे नेते अंबादास सैदु शिंदे यांनी दिली.

या उपोषणात कोहिनूर सय्यद, सचिन कुदळे, प्रदीप काळे, शंकर तळेकर, दगडू धावारे, मीना दळे, सरला घरटे यांच्यासह अनेक शिक्षक व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरुण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

- अनिल आगलावे
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

## धाराशिव येथे अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

अल्पसंख्यांक नागरिकांची संस्कृती, भाषा, धर्म व परंपरांचे संवर्धन करण्यासोबतच त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी अल्पसंख्यांक हक्क दिवस आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती कार्यालयाच्या सभागृहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे व जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील म्हणाल्या की, मुस्लिम, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, जैन व पारशी हे समाज अल्पसंख्यांक समुदायात येतात. त्यांच्या विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. योजनांचा लाभ मिळाल्यास त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती मिळेल. शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकजुटीने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे यांनी सांगितले की, अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अल्पसंख्यांक कल्याण समिती गठित करण्यात आली आहे. अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक दर्जा देण्यासाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली कार्यान्वित आहे. तसेच निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम, डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, अल्पसंख्यांक बहुल शाळांमध्ये पायाभूत सुविधा अनुदान योजना तसेच नागरी व ग्रामीण अल्पसंख्यांक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्याच्या योजना राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनीही अल्पसंख्यांकांसाठी असलेल्या इतर शासकीय योजनांची माहिती उपस्थित नागरिकांना दिली.

अल्पसंख्यांक प्रतिनिधी जुल्फीकार काझी यांनी सांगितले की, अल्पसंख्यांक समाजासाठी अनेक योजना उपलब्ध असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. भारतीय राज्यघटनेत अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नाही.

अल्पसंख्यांकांसाठी स्वतंत्र कार्यालय, पुरेसा अधिकारी-कर्मचारी वर्ग व अर्थसंकल्पीय तरतूद राखीव ठेवावी तसेच विद्यार्थ्यांना ७ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी समाजभूषण शंकर खुणे यांनी अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे सांगितले. सय्यद खलील यांनी योजनांची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांची मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त करत मदरसा आधुनिकीकरण योजनेत अधिक सुलभता यावी, असे मत मांडले. अतुल अजमेरा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी विष्णू ठोंबरे व चंद्रकांत भगत, समाजभूषण पुरस्कारप्राप्त शंकर खुणे, अल्पसंख्यांक अधिकारी-कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेख खुद्बुद्दीन हुसेन, खलील सैफ सय्यद, जुल्फीकार काझी, अम्ड. अश्विनी सोनटक्के, ॲड. मायादेवी सरवदे, ॲड. ज्योती बेडकर, ॲड. प्रियंका साबळे, विनीत तेलोरे, इकबाल पटेल, सलीम मणियार, सिद्दिकी मोजुद्दीन यांच्यासह विविध मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार जिल्हा नियोजन अधिकारी विष्णू ठोंबरे यांनी मानले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हाधिकारी पुजार यांच्या हस्ते पत्रिकेचे विमोचन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**

तुळजापूर येथील विशेष स्पर्धा तुळजाभवानीची, वक्ता महाराष्ट्राचा या स्पर्धेचे विषय पत्रिकेचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.




यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोकर, उपसंचालक जनसंपर्क महासंचालय तथा जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी युवास्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कावरे, प्रशांत कावरे स्पर्धा प्रमुख भैरवनाथ कानडे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांच्या वतीने सन २०२६ च्या अधिकृत दिनदर्शिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, लेखाधिकारी संतोष भेंकी, तसेच मंदिर संस्थानचे नागेश शितोळे, रविंद्र भराटे, अभय रावळे, रमेश कवडे आदी उपस्थित होते.

### डॉ. अर्चना गंगावणे यांना पीएचडी प्रदान

**नळदुर्ग, दि.२० डिसेंबर -**

डॉ. अर्चना गंगावणे उर्फ भाले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या वतीने



नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. अर्चना गंगावणे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनावर लिहिलेल्या निवडक गीतांचा विवेचक अभ्यास या विषयावर आपला संशोधन प्रबंध सादर केला. हा प्रबंध त्यांनी आदर्श महाविद्यालय, उमरगा येथील मराठी विषयाचे संशोधक व मार्गदर्शक डॉ. प्रभाकर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. या संशोधनातून माता रमाई आंबेडकर यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीमध्ये असलेले मोलाचे योगदान प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे.



### आढाळा येथे गाडगेबाबांची पुण्यतिथी सामाजिक उपक्रमांनी साजरी

**कळंब, दि.२० डिसेंबर -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आढाळा येथे राष्ट्रसंत व स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड व विद्यार्थ्यांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपक्रमशील शिक्षक तुकाराम कराळे यांनी संत गाडगेबाबांच्या अंधश्रद्धा निर्मूलन व स्वच्छतेविषयक कार्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. संत गाडगेबाबांनी केलेल्या स्वच्छता कार्याची रुजवण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी आणि स्वच्छतेचा संदेश घराघरात पोहोचावा, या उद्देशाने यानिमित्ताने शालेय परिसरासह आढाळा गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय व आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन व आयोजनासाठी व्याख्याते महादेव खराटे व उपक्रमशील शिक्षिका शिवानंद स्वामी यांनी विशेष परिश्रम घेतले.



### मंगरुळच्या प्रोक्टिव्ह अबॅकसच्या ११ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**मंगरूळ, दि.२० डिसेंबर -**

सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या रिजनल अबॅकस स्पर्धेत मंगरुळ (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथील श्री प्रोक्टिव्ह अबॅकस संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत संस्थेच्या एकूण ११ विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये जयरुद्र जाधव, अपूर्वा डोंगरे, हृदया जगताप, असद बागवान, सागर हजारे, श्रेया हजारे, सई डोंगरे, यश डोंगरे, प्रविण डोंगरे, समेरा मकानदार आणि अदनान मकानदार यांचा समावेश आहे. या यशाबद्दल श्री प्रोक्टिव्ह अबॅकस, मंगरुळचे संचालक आशिष साठे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### धाराशिव शहर पोलिसांचा जुगारविरोधी छापा

**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

धाराशिव शहर पोलीसांनी जुगारविरोधी कारवाईत दि.१९ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता जुनी गल्ली, धाराशिव येथे छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना तिरट जुगाराच्या साहित्यासह ४,४५० रुपये रोकड मिळाली. यावेळी आरोपी राहुल भारत मोरे, प्रशांत भागवत घोरपडे, लिंबाजी किसन देवकते, जगदिश मुरली मडके, उत्तम गणपत कुंभार ( यांना घटनास्थळी ताब्यात घेतले. पोलिसांनी जुगार साहित्य व रोकड जप्त करून आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# जयप्रकाश विद्यालय देश पातळीवर चमकले : आ. राणादादा

**संस्थेला सभागृहासाठी ५० लाख निधी उपलब्ध करून देणार; आ. राणाजगजितसिंह पाटील यांची संस्थेला ग्वाही...**

### जयप्रकाश विद्यालय रुईभर येथे गौरव सोहळा संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

जीवनात परिश्रमाला अत्यंत महत्त्व आहे. कष्ट, सातत्य व वेळ दिल्याशिवाय ध्येय गाठता येत नाही. आपण केलेल्या कामाचे कौतुक झाले तर काम करण्याची ऊर्जा आणखी वाढते. आई-वडील, राज्य व राष्ट्राला विद्यार्थ्यांकडून मोठ्या अपेक्षा असतात. त्यामुळे प्रत्येकाने आपले काम पूर्ण ताकतीने व प्रामाणिकपणे करावे, असे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.



ते जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ग्रामीण भागातील संस्था असूनही जयप्रकाश विद्यालय राष्ट्रीय पातळीवर चमकते, यामागे प्रचंड परिश्रम आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी संस्थेच्या सभागृहासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. याप्रसंगी शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे यांना दैनिक लोकमत आयकॉन धाराशिव २०२५ पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यालयातील विद्यार्थी सुयश आडे याने मध्यप्रदेशातील देवास येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सॉफ्ट टेनिसमध्ये संघिक (महाराष्ट्र राज्य) व वैयक्तिक सुवर्णपदक पटकावल्याबद्दल त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच १९ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेत विजय मिळवल्याबद्दल खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे होते. प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात मेहनत, कौशल्य व चिकाटीच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर आपली ओळख निर्माण करावी, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास नितीन काळे, भगवान आबा गिरी महाराज, रामदास अण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी श्रीमती शिवकन्या साळुंके, आगतराव भोईटे, सुब्राराव लोमटे, गोपाळ निंबाळकर, मारुती कस्पटे, राजाराम कोळगे, राजेंद्र गव्हाणे, अशोक सिरसाटे, विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले तर आभार काकासाहेब डोंगरे यांनी मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

### मशिद व्यवस्थापनाच्या वादातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

रहिमनगर नळदुर्ग येथील नुरानी मशिदीच्या व्यवस्थापनाच्या कारणावरून वाद होऊन एका व्यक्तीस मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी आरोपी नामे वाहेद उर्फ अमीर सत्तार शेख, अलीम सत्तार शेख, अ. सलाम उर्फ हुजूर कचरू शेख, गौस मैनोद्दीन ईनामदार, इकरार आरीफ मौजन व सलमान रियाज कुरेशी (सर्व रा. रहिमनगर नळदुर्ग) यांनी दि.१४ डिसेंबर रोजी नुरानी मशिदीसमोर, रहिमनगर नळदुर्ग येथे फिर्यादी मैनुद्दीन अब्दुल हकीम कुरेशी (वय ४० वर्षे, रा. रहिम नगर नळदुर्ग) यांना मशिदीचे व्यवस्थापन मुज्जमील अब्दुल हकीम कुरेशी यांच्याकडे दिले, या कारणावरून गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. यावरून नळदुर्ग पोलीसात गुन्हा नोंदविला आहे.

### पवनचक्की प्लॅन्टवरील साहित्याची तोडफोड; ५.४८ कोटींचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

सरमकुंडी शिवारातील शेत गट क्रमांक ११२/ए येथील पवनचक्की प्लॅन्टवरील स्टोअर यार्डमध्ये अज्ञातांनी मोठ्या प्रमाणावर तोडफोड करून कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी आरोपी नामे दिपक केळे (रा. केळेवाडी ता. वाशी), रोहन गपाट (रा. इंदापूर ता. वाशी), रोहित भालेकर (रा. वाशी), उमेश क्षिरसागर (रा. वाशी), विजय गपाट (रा. इंदापूर ता. वाशी) व मंगेश मेटे (रा. विजोरा ता. वाशी जि. धाराशिव) यांनी दि.१४ डिसेंबर रोजी रात्री पवनचक्की प्लॅन्टवरील एकूण नेसल बॉक्सपैकी ३ नेसल बॉक्स मधील ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, गिअर बॉक्स फोडून नुकसान केले. तसेच इतर तांब्याच्या केबलची तोडफोड केली. या तोडफोडीमुळे ५ कोटी ४८ लाख रूपये इतके नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादी दत्तात्रय शिवाजी माने यांनी दि.१९ डिसेंबर रोजी दिलेल्या अहवालावरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### विदेशी देवीभक्तांसाठी पासपोर्टवर अभिषेक पास देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**

विदेशी देवीभक्त व परदेशातून आलेल्या पर्यटकांना पासपोर्ट क्रमांकाच्या आधारे अभिषेक पास उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी तहसीलदार तथा श्री तुळजाभवानी देवी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, श्री तुळजाभवानी देवी मंदिर हे संपूर्ण देशातील तसेच परदेशात स्थायिक असलेल्या असंख्य भक्तांचे कुलदैवत आहे. परराज्यातून तसेच मोठ्या प्रमाणात विदेशात स्थायिक झालेले मूळ भारतीय भक्त अभिषेक व कुलाचार करण्यासाठी तुळजापूर येथे येत असतात. परंतु विदेशात स्थायिक असलेल्या भक्तांकडे बहुतेक वेळा आधार कार्ड उपलब्ध नसल्यामुळे अभिषेक पाससाठी रजिस्ट्रेशन होत नाही. त्यामुळे अशा भक्तांना त्यांच्या मूळ कुलाचार अभिषेकापासून वंचित राहावे लागते. तसेच परदेशातून पर्यटनासाठी आलेल्या भाविकांनाही मूळ मूर्तीचे अभिषेक दर्शन घेता येत नाही. परिणामी, मंदिर संस्थानची माहिती व आई तुळजाभवानीचे महात्म्य जागतिक स्तरावर पोहोचण्यास मर्यादा येत आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासाठी अभिषेक पास रजिस्ट्रेशनसाठी पासपोर्टवरील क्रमांक ग्राह्य धरण्यात यावा व त्यानुसार संगणकीकरण प्रणालीत आवश्यक बदल करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर ओमकार टोले, विजय कदम व दत्तात्रय शेळके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नळदुर्ग मतमोजणीच्या दिवशी जमावबंदी; आठवडी बाजार राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि. २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या दिवशी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नळदुर्ग येथील आठवडी बाजार पूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, धाराशिव यांनी जारी केले आहेत.

या आदेशानुसार, दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नळदुर्ग नगरपरिषद हद्दीतील मतमोजणी केंद्रांच्या २०० मीटर परिसरात जमावबंदी लागू राहणार आहे. या कालावधीत मोबाईल फोन, कॅमेरा, पेजर, वायरलेस सेट, ध्वनिक्षेपक तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

मतमोजणी केंद्र परिसरात घोषणा, मिरवणुका, गोंगाट, जल्लोष, विजय मिरवणुका तसेच कोणतेही सार्वजनिक उत्सव साजरे करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी कामाव्यतिरिक्त अनावश्यक व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. केवळ अधिकृत पासधारक, उमेदवारांचे प्रतिनिधी, कर्मचारी व सुरक्षादलांनाच प्रवेश दिला जाणार आहे.

तसेच मार्केट अँड फेअर क्ट १८६२ अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार नळदुर्ग नगरपरिषद क्षेत्रातील आठवडी बाजार मतमोजणीच्या दिवशी बंद ठेवण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या दिवशी बाजार भरविणे, तात्पुरती दुकाने, फेरीवाले अथवा अनधिकृत विक्री करण्यास बंदी राहणार असून संबंधित बाजार पुढील कार्यदिवशी भरविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या संदर्भात अप्पर तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड, पोलीस निरीक्षक सचिन यादव तसेच नळदुर्ग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नळदुर्ग शहरातील सर्व नागरिक, व्यापारी व फेरीवाल्यांना आवाहन केले आहे की, मतमोजणी प्रक्रिया शांततेत, निर्भय व कायद्याच्या चौकटीत पार पाडण्यासाठी प्रशासनास पूर्ण सहकार्य करावे. आदेशांचे उल्लंघन करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच मतमोजणीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## जि.प. हायस्कूल उमरग्याच्या विद्यार्थिनींचे विज्ञान प्रदर्शनात यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० डिसेंबर -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील वैष्णवी केदारे व पूजा मोरे या विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी सादर केलेल्या 'होम फूड प्रिझर्वेटिव्ह' या प्रयोगाला तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळाला असून त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे.

गटशिक्षण कार्यालय, पंचायत समिती उमरगा यांच्या वतीने माऊली इंटरनॅशनल स्कूल, उमरगा येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जिल्हा परिषद हायस्कूल उमरग्याच्या विद्यार्थिनींनी प्राथमिक गटातून द्वितीय क्रमांक मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला. या यशस्वी विद्यार्थिनींना शाळेतील विज्ञान शिक्षक विद्यानंद सुत्रावे व भाग्यश्री पंडित, तसेच तालुका एन-पॉवर समन्वयक ताजोद्दीन सरवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, अमर वरवटे, अशोक पतंगे, सदानंद शिंदे पाटील, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, विस्तार अधिकारी जोशी, केंद्रप्रमुख शिला मुदगडे तसेच शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

## उमरग्यात 'महाविस्तार एआय' ॲप नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० डिसेंबर -**

तालुका कृषी अधिकारी ज्ञानोबा रीतापुरे यांच्या प्रेरणेने व मंडळ कृषी अधिकारी प्रदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा येथील शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात 'महाविस्तार एआय' ॲप नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेल्या महाविस्तार कृषी एआय पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक व तंत्रज्ञानाधारित सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात महाविस्तार एआय पची वैशिष्ट्ये, नोंदणी प्रक्रिया, पीक सल्ला, हवामान आधारित मार्गदर्शन, कीड-रोग व्यवस्थापन, खत व बियाणे शिफारसी तसेच विविध शासकीय योजनांची माहिती कशी मिळते, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी ज्ञानोबा रीतापुरे यांनी उपस्थितांना पचा प्रत्यक्ष वापर करून दाखवित शेतकऱ्यांसाठी या डिजिटल साधनाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, इटले सर, धाडगे सर, मंडळ कृषी अधिकारी प्रदीप भोसले, प्रविण पाटील, उप कृषी अधिकारी सुनील कुलकर्णी, सहाय्यक कृषी अधिकारी उत्कर्षा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. उमरगा परिसरातील विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी पची नोंदणी करून घेतली.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना वेळेत व अचूक माहिती मिळून शेती अधिक उत्पादनक्षम व किफायतशीर करण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## सास्तुर येथील उपजिल्हा रुग्णालय 'स्पर्श' मध्ये मोफत डायलिसिस सुविधा सुरू

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथील उपजिल्हा रुग्णालय स्पर्श येथे आता मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध झाली असून त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब व गरजू किडनी रुग्णांची मोठी अडचण दूर झाली आहे.

यापूर्वी डायलिसिससाठी रुग्णांना जिल्हा ठिकाण किंवा मोठ्या शहरात जावे लागत होते. त्यामुळे किडनी आजाराने त्रस्त रुग्णांना आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत होता. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांना हा खर्च परवडणारा नव्हता. ही बाब लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालय स्पर्श, सास्तुर येथे क्ळङ च्या सहकार्याने ८ खाटांचे अद्यावत डायलिसिस उपचार केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या केंद्रासाठी आवश्यक अत्याधुनिक मशिनरी, उपकरणे तसेच प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची नेमणूक करण्यात आली आहे. या सुविधेचा ग्रामीण भागातील




गोरगरीब रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर व स्पर्श उपजिल्हा रुग्णालयाचे प्रकल्प व्यवस्थापक रमाकांत जोशी यांनी केले आहे.

डायलिसिस केंद्राबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, डायलिसिस ही एक वैद्यकीय प्रक्रिया असून मूत्रपिंड (किडनी) नीट कार्य करत नसल्यास ती करावी लागते. शरीरातील अनावश्यक द्रव्ये, मीठ व अतिरिक्त पाणी काढून टाकण्यासाठी ही प्रक्रिया उपयोगी ठरते. किडनीचे कार्य जेव्हा १० ते १५ टक्क्यांपेक्षा कमी राहते, किडनी फेल्युअर, उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा दीर्घकालीन मूत्रपिंड विकार असल्यास रुग्णाला डायलिसिसची गरज भासते.

डॉक्टरांच्या सल्ल्यानेच डायलिसिसचा प्रकार व वेळ ठरवावी. डायलिसिसदरम्यान स्वच्छता, योग्य आहार व औषधोपचार यांचे काटेकोर पालन आवश्यक असून नियमित रक्त तपासणी करणे गरजेचे आहे. हेमोडायलिसिसनंतर थकवा, अंगदुखी, कमी रक्तदाब, मळमळ, उलट्या, डोकेदुखी, खाज, कोरडी त्वचा, भूक न लागणे, रक्ताची कमतरता, शरीरातील क्षारांचे प्रमाण कमी होणे, झोप न येणे अशा काही किरकोळ समस्या उद्भवू शकतात.

तरीही किडनी पूर्णपणे निकामी होऊ नये यासाठी डायलिसिस उपचार अत्यंत आवश्यक असल्याने प्रत्येक रुग्णाने या महाडायलिसिस केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.